वर्ष ४५
अंक १०, ११

वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ

|| मराठी तितुका मेळवावा ||

ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२५
आश्विन/कार्तिक/मार्गशीर्ष शके १९४७

# बृहन्महाराष्ट्र वृत्त



## संपादक समिती



प्रसाद पानवळकर



अनिता कांत



नीता धोपेश्वरकर



शुभदा सावरगावकर



विदुला कोल्हटकर



अपर्णा कोळेकर



शीतल रांगणेकर



कोमल कुलकर्णी

## या अंकात


**अध्यक्षीय** २

**बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादकीय** ३

**उत्तर अमेरिका - गणेशोत्सव २०२५** ४

**जिना इसी का नाम है** - यजुर्वेंद्र महाजन ५

**जागते रहो मेरे दोस्त!** - उदेश वैद्य ७

**उत्तररंग** - कादंबिनी धारप, जुई करकरे नवरे ८

**मुलाखत:** सौरभ नेत्रावळकर ११

**कविता: सण सोहोळ्यांची मांदियाळी** - राहुल घाणेकर १३

**सुहाना सफर** - शुभदा सावरगावकर १४

**ग्रंथ तुमच्या दारी** - संजय कंक १६

**मुलाखत:** श्री. अमित उपाध्ये १८

**आरिगातो जपान!** - अमित भावे २०

**आनंदाचे देणे** - प्रल्हाद वामनराव पै २२

**कौन आया घरमे , छप्पर फाडके?** - अश्विनी चौथाई २४

**जाहिरात** २६

**मोतियाचे क्षण**- प्रमोद तेंडुलकर, डॉ. विजया बापट २७

AbbasStories.com - राजन गडकरी २७

**साहित्यातील आई** - आनंद देशमुख ३०

**कविता: अमेरिकन दिवाळी** - सौरभ तांबे ३१

**शब्दकोडे** - गुरुप्रसाद पणदूरकर ३२

**हवा पलंग आणि न्याहारी** - गिरीश देसाई ३४

**शिकागोची छुपी रमणीय स्थळे** - वैशाली बेलसरे ३६

**लग्नस्वातंत्र्य** - प्रवीण कारंजकर ३७

**आठवणींचा माग** - ज्योत्स्ना काटकर नारनवरे ३९

**महाराष्ट्रीयन थाळीत लपलेलं प्रोटीन** - सोनाली सुर्वे ३९

**आरोग्यदायी ए-आय** - संदीप कामत ४०

**कविता: ऋतुरंग** - स्वप्निल देशपांडे ४३

**मुक्तता....** - अंकिता कार्ले ४३

**कविता: प्रिय बाबा** - सारिका मतकर ४४

**२१ व्या शतकातील गुरू** - माधूराज ४५

**हृदयस्पर्शी आठवणी** - डॉ. शिरीष कीर्तने ४६

**दरवळ** - प्राजक्ता पाडगांवकर ४८

**पाककृती:** राजगिरा लाडू - संध्या विरगी ५०

**कविता: बाप्पा मला सांगा नां!**- डॉ. सतीश कानविंदे ५०

**जाहिरात** ५१

**कविता: मराठी अस्तित्व** - शैलेश पोतदार ५२

**मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी मदतीची हाक** ५२

**नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांची भेट**
- मुकुंद चोरघडे ५३

**मुलाखत: डॉ. सौरभ गाडगीळ** ५४

**शब्दफोड** - अरविंद नारळे ५६

**Youth Section :**

**Art** - Nikita Marathe ५७

**Diverging Musical Paths,**
**One Shared Passion** ५७

**Art** - Aarohi Sangle ५८

**The Land I Love** - Asmi Kulkarni-Zambre ५८

**Art** - Tejashree Moghe ५९

**Help Me, Please** - Arnav Watkar ६०

**Story** - अर्णव देवकुळे ६२

**Art** - Radha Marathe ६२

**Discovering My World!!** - Riya Ner ६२

**MANA Paintings** ६४

## अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,



सर्वप्रथम तुम्हा सर्वांना नवरात्रीच्या, दसऱ्याच्या, आणि येणाऱ्या दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

३ ऑक्टोबर २०२४ रोजी भारत सरकारने मराठी भाषेला “अभिजात भाषेचा” दर्जा देऊन गौरविले. मराठी माणसांसाठी अत्यंत अभिमानास्पद अशी ही बातमी होती. या घटनेच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त सर्व मराठी बंधू-भगिनींना हार्दिक शुभेच्छा! मराठी भाषा टिकवणे, तसेच तिचे संवर्धन करणे ही आपली जबाबदारी आहे. त्यासाठी आपण आपल्या मुलांबरोबर मराठीत बोलले पाहिजे, त्यांना मराठीमध्ये बोलण्यास प्रवृत्त केले पाहिजे, त्याचप्रमाणे आपले मराठी सण आवर्जून साजरे केले पाहिजेत. आपली भाषा आणि संस्कृतीचा अभिमान आपण सर्वांनी बाळगलाच पाहिजे.

भारत आणि अमेरिका यांच्यातले संबंध अजूनही तणावपूर्वक आहेत. प्रत्येक आठवड्याला नवीन बातम्या येत आहेत. नुकतीच H-1B व्हिसा संदर्भातील बातमी अमेरिकेतील भारतीय जनतेत खळबळ माजवून गेली. पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर जसे बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे एक चर्चासत्र आयोजित केले होते, तसेच एक चर्चासत्र आम्ही H-1B व्हिसा बद्दल आयोजित केले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. अनेक मंडळींनी आपले प्रश्न विचारून शंका निरसन केले. या नव्या नियमांचा सध्या अमेरिकेत स्थायिक असलेल्या भारतीयांना तरी त्रास होऊ नये अशी अपेक्षा आहे. तसेच H-1B व्हिसाच्या प्रक्रियेतून जाणाऱ्या सर्व भारतीयांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा! व्हिसातील या नियमांमुळे जर तुमची गैरसोय होत असेल तर वैयक्तिक पातळीवर तुमच्या शहरातील किंवा राज्यातील राजकीय प्रतिनिधींना तुमचे विचार नक्की पाठवा. कदाचित ते तुमच्या विचारांवर चर्चा पण करतील.

बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे ऑक्टोबर महिन्यात ज्येष्ठ विनोदी अभिनेते ‘प्रशांत दामले’ यांचे “शिकायला गेलो एक” हे नाटक येत आहे. १६ वेगवेगळ्या शहरांमध्ये या नाटकाचे प्रयोग होत आहेत. लोकाग्रहास्तव काही मंडळे आठवड्याच्या दिवसात पण प्रयोग करीत आहेत. या सर्व मंडळांचे कार्यकर्ते नाटकाचे देखावे बनवण्याच्या कामात व्यस्त आहेत. त्या सर्वांना शुभेच्छा, तसेच सर्व प्रयोग “हाउसफुल” होवोत हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

गेल्या महिन्यात जवळजवळ सर्व मंडळांनी उत्साहात गणेशोत्सव साजरा केला. त्याबद्दल मी सर्व मंडळांकडे त्यांनी गणेशोत्सव कसा साजरा केला याबद्दल विचारणा केली होती. उदाहरणार्थ - उपस्थितीचे काही नवे विक्रम स्थापन झाले का? किंवा कोणत्या सामाजिक संस्थेसाठी निधी संकलन केले का? किंवा कार्यक्रमाची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत का? या सर्वेक्षणाला उत्तम प्रतिसाद मिळाला. या संदर्भातला विशेष लेख या अंकात जोडला आहे, तरी तो अवश्य वाचावा. या सर्व मंडळांच्या अध्यक्ष, पदाधिकारी, आणि स्वयंसेवकांचे मी अभिनंदन करतो.

‘गुरुपीठ’ या उपक्रमातर्फे आम्ही उत्तर अमेरिकेतील मराठी भाषिक प्राध्यापकांचे जाळे विणत आहोत. नुकतीच या गटाची बैठक पार पडली. या महिन्यात अमेरिकेतील काही विद्यापीठांमध्ये होणाऱ्या परिसंवादाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. तरी तुमच्या परिसरात कोणी मराठी भाषिक प्राध्यापक असतील तर त्यांना या उपक्रमाबद्दल माहिती द्या.

‘रेशीमगाठी’ उपक्रमातर्फे कॅलिफोर्नियातील ‘बे एरिया’ येथे शनिवार, १२ ऑक्टोबर रोजी, ‘वधू-वर मेळावा’ आयोजित केला आहे. तरुण पिढीतील अनेक मंडळी आपल्या जोडीदाराच्या शोधात आहेत. या मेळाव्यातून त्यांना त्यांचा जीवन साथीदार मिळो ही अपेक्षा.

‘रेशीमगाठी’ संकेतस्थळाचे नूतनीकरण मागेच पूर्ण झाले आहे. आता आम्ही नूतनीकरणाचा दुसरा टप्पा सुरू करत आहोत. आमच्या सभासदांना उत्कृष्ट सेवा मिळावी यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू.

उत्तर अमेरिकेतील चित्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे MANA (Maharashtrian Artists of North America) हा उपक्रम आहे. नुकतीच या गटातील सदस्यांबरोबर बैठक घेण्यात आली आणि या उपक्रमाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने कोणते नवे कार्यक्रम राबवावेत या विषयावर चर्चा झाली.

लवकरच "आरोग्य संपदा" नावाचा एक नवा उपक्रम आम्ही सुरू करीत आहोत. यात आरोग्य विषयातील विविध गोष्टींवर तज्ञ डॉक्टर मंडळींकडून माहिती सत्र आयोजित करण्याचा विचार आहे.

‘समाजरंग’, ‘उत्तररंग,’ आणि ‘ध्यान (मेडिटेशन)’ उपक्रमांतर्फे आम्ही ज्येष्ठ समाजसेवक ‘डॉ. प्रकाश बाबा आमटे’ यांचा कार्यक्रम नोव्हेंबर महिन्यात आयोजित करीत आहोत.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या विविध उपक्रमांबद्दल माहिती मिळवण्यासाठी bmmonline.org या संकेतस्थळाला भेट द्या.

परत एकदा येणाऱ्या दसरा आणि दिवाळीच्या शुभेच्छा! दसरा-दिवाळीनिमित्त अनेक मंडळी भारतात जाणार असतील, त्या सर्वांना प्रवासासाठी शुभेच्छा - भरपूर फटाके उडवा, फराळ खा, आणि मजा करा! जय हिंद - जय महाराष्ट्र!

आपला,

**प्रसाद पानवळकर**

अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर
अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-


**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**


**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75

**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**

**मताधिकार असलेले सदस्य**

अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी

**नियुक्त सदस्य**

माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो

**विश्वस्त समिती**

अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका



**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


## संपादकीय

**दोन शब्द आमच्याकडून**

**लक्ष लक्ष दिवे उजळुनी, आली दिवाळी प्रकाश – उल्हास लेवूनी!!!**

ह्या दिवाळीतील उजळलेले प्रकाशमयी दिवे सभोवतालचा अंधःकार दूर करोत आणि वृत्ताच्या सर्व वाचकांचे जीवन लख्ख उजळवून टाको; बृहन्महाराष्ट्र मंडळ वृत्ताच्या संपादकीय समितीतर्फे दिवाळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

या वर्षी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वृत्ताचे ४९वे वर्ष आहे. या वर्षीच्या दिवाळी अंकात बृहन्महाराष्ट्र मराठी मंडळाच्या वेगवेगळ्या उपक्रमांच्या अनुषंगानी वैचारिक आणि माहितीपूर्ण लेख आहेत. तसेच, प्रथितयश मराठी माणसांच्या मुलाखती; प्रसिद्ध मराठी व्यक्तींच्या लेकींनी सांगितलेल्या वडिलांच्या आठवणी, उत्तर अमेरिकेतील आणि महाराष्ट्रातील लेखकांचे, कवींचे आणि युवा पिढीचे साहित्य आहे. उत्तम कथा, कविता, आठवणी, प्रवासवर्णनं, वैचारिक लेख, पाककृती अशा दर्जेदार साहित्याने नटलेला हा अंक वाचकांना नक्की पसंत पडेल याची आम्हाला खात्री आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे वृत्त हे मंडळाचे मुखपत्र आहे. त्याला अनुसरुन आम्ही यावर्षीच्या अंकांमधून बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या – मराठी शाळा, मराठी पॉडकास्ट, उत्तररंग, अध्यात्म, तत्वज्ञान, बालक- पालक, समाजरंग, लक्ष्यवेध अशा उपयुक्त कार्यक्रमांची जडणघडण आणि त्यांचे कार्य तसेच या कार्यक्रमांना यशस्वी करण्यासाठी कटिबद्ध असलेले स्वयंसेवक यांच्यावर प्रकाशझोत टाकला. याचबरोबर बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सभासद असलेल्या महाराष्ट्र मंडळांबद्दल विशेष लेख प्रकाशित केले. या वर्षी आम्ही वृत्तातील लेख आणि कविता यांचे ध्वनिमुद्रण प्रसारित केले. आता आपले वृत्त श्रवणीयही झाले आहे. वृत्त दर महिन्याला डिजिटल स्वरुपात प्रकाशित होते तसेच मागील वर्षीप्रमाणे वृत्ताचा दिवाळी अंक छापील स्वरुपात महाराष्ट्रातील मुख्य शहरांमधील वाचनालयात उपलब्ध राहील. वृत्ताचे नवीन संकेतस्थळ नवीन वर्षापर्यंत सर्वांसाठी खुले होईल.

याही वेळी आम्हाला जगाच्या कानाकोपऱ्यातून लेख आणि कविता पोहोचल्या आहेत. तसेच तुम्ही दिलेल्या रचनात्मक अभिप्रायांवर ध्यान देऊन आम्ही त्या सूचना अंमलात आणल्या आहेत. या अंकाबाबतच्या आपल्या प्रतिक्रिया आम्हांला जरूर कळवाव्या.

ह्या प्रयत्नात सहभागी झालेल्या सर्व साहित्यिकांचे, वाचकांचे आणि आमच्या प्रायोजकांचे मनःपूर्वक आभार!

कळावे लोभ असावा,
आपली नम्र, वृत्त संपादक समिती.

मुखपृष्ठ निर्मिती : शीतल रांगणेकर

## उत्तर अमेरिका - गणेशोत्सव २०२५




सालाबाद प्रमाणे यावर्षी पण उत्तर अमेरिकेतील सर्व मंडळांनी प्रचंड उत्साहात गणेशोत्सव साजरा केला. काही मंडळांनी नवे विक्रम प्रस्थापित केले, तर काही मंडळांनी विशेष कामगिरी केली.

आपण या मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांचे, कार्यकर्त्यांचे आणि गणेश भक्तांचे कौतुक करूया आणि त्यांच्या विशेष कामगिरीचा आढावा घेऊया.

या मंडळांच्या कामगिरींकडे बघता इतर मंडळे पण पुढील वर्षी तसे उपक्रम करण्याचा प्रयत्न करतील आणि ज्या मंडळांनी या वर्षी विशेष कामगिरी केली आहे ती मंडळे पुढील वर्षी नवा विक्रम करण्याचा नक्कीच प्रयत्न करतील. या सर्व मंडळांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि त्यांना खूप खूप शुभेच्छा!

**सामाजिक संस्थांना मदत करणारी मंडळे:**

फिलाडेल्फिया $१०,००० | जॅक्सनविल $७,८०० |
पिओरिया $४,८०० | ऑस्टिन | मराठी विश्व (न्यू जर्सी) महाराष्ट्र स्नेहमंडळ इंडियाना | बे बेरिया | सॅन डियागो
मराठी कला मंडळ (वॉशिंग्टन डीसी) | मायबोली (टॅम्पा)
त्रिवेणी (सिनसिनाटी) मंडळ (दिवाळीमध्ये निधी संकलन)

**खालील मंडळांनी मराठी मंडळीं शिवाय इतर भाषिक मंडळीं बरोबर यावर्षीचा गणेशोत्सव साजरा केला:**

फिलाडेल्फिया | युटा | सेंट लुईस | कॅलगरी
मायबोली (टॅम्पा) | सेंट्रल व्हॅली |
नॉर्थ ईस्ट ओहायो (क्लीव्हलंड) | त्रिवेणी (सिनसिनाटी)
कोलंबस गणेश मंडळ (इंडियाना) | महाराष्ट्र स्नेहमंडळ इंडियाना

**उपस्थितीचे नवे विक्रम:**

फिलाडेल्फिया १०,००० | सेंट्रल व्हॅली २,५००
म मं. बे एरिया २,०००+ | नॉर्थ ईस्ट ओहायो (क्लीव्हलंड) २,०००+
रॅले टेक्नॉलॉजी पार्क (आर टी पी) १,५००
मराठी कला मंडळ (वॉशिंग्टन डीसी) १,४७५
त्रिवेणी (सिनसिनाटी) १,०५० | अटलांटा १,०००
मराठी विश्व (न्यू जर्सी) ९५० | रिचमंड
कोलंबस (ओहायो) | महाराष्ट्र स्नेहमंडळ इंडियाना

**विशेष उल्लेख : लास वेगास मंडळाने** पहिल्यांदाच सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला.

**नॉर्थ ईस्ट ओहायो (क्लीव्हलंड)** तसेच **रिचमंड** मंडळांनी पहिल्यांदाच दहा दिवसांचा गणपती साजरा केला.

**डेलावर व्हॅली** मंडळाने पहिल्यांदाच ढोल ताशा पथक स्थापन करून कार्यक्रम सादर केला.

**कोलंबस** शहराने (इंडियाना राज्य) ऑगस्ट १५ ते सप्टेंबर १५ हा "गणेशोत्सव महिना" म्हणून जाहीर केला, तसेच येथील कोलंबस गणेश मंडळाने सात दिवसांचा गणेशोत्सव साजरा केला.

**सेंट्रल व्हॅली** शहर आणि काउंटीने गणेशोत्सवाची दखल घेतली.

**फिलाडेल्फिया** मंडळाच्या दहा दिवसाच्या गणेशोत्सवात १०,०००+ लोक आले. सोमवार ते गुरुवार सरासरी ६००, तर शुक्रवार, शनिवार, रविवार सरासरी १,३०० लोकांनी भेट दिली. या मंडळातील गणेशभक्तांनी अथर्वशीर्षाचे १,००१ वेळा पारायण केले.

**मायबोली (टॅम्पा)** मंडळाने दहा दिवसांचा गणपती साजरा केला.

**पिट्सबर्ग** मंडळाने हलता देखावा सादर केला.

**मराठी कला मंडळ (वॉशिंग्टन डीसी)** मंडळाने दगडूशेठ हलवाई मंदिराचा भव्य देखावा सादर केला.

**मराठी विश्व (न्यू जर्सी)** मंडळाने गणपती समोरील दानपेटीत जमलेली दक्षिणा 'दीपस्तंभ फौंडेशन' ला देणगीदाखल देण्याचे ठरवले आहे. तसेच यावर्षीपासून कमीत कमी एका विद्यार्थ्यांचा शिक्षण किंवा संपूर्ण वार्षिक खर्च उचलण्याचे ठरवले आहे.

**महाराष्ट्र स्नेहमंडळ इंडियाना** मंडळातील गणेशभक्तांनी गणपती अथर्वशीर्षाची २१ आवर्तने केली. मंडळातर्फे मुलांसाठी, गणेशस्तोत्र पठणस्पर्धा,आणि गणपती चित्रकला स्पर्धा, तर प्रौढांसाठी, पाककला आणि गणपती आरास/देखावे स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

**बफेलो** मंडळाने दुसऱ्या मंडळातील कलाकारांना आमंत्रित केले.

**ईस्ट बे** मराठी मंडळाने दोन दिवसांचा गणेशोत्सव आयोजित करून त्यांचे रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे केले.

**डिट्रॉईट** मंडळाने १५५ विद्यार्थ्यांचा सहभाग असलेले कार्यक्रम सादर केले.

**कॅलगरी** मंडळाने अन्नदान केले.

**त्रिवेणी (सिनसिनाटी)** आणि **जॅकसनविल** मंडळांच्या स्वयंसेवकांनी १,००० हून अधिक लोकांचे जेवण स्वतः बनविले.

**लास वेगास** आणि **सॅन अँटोनियो** या मंडळांनी स्वतःच्या मंडळासाठी निधी संकलन केले.

**म मं. बे एरियाने** $१५,००० ची वर्गणी जमवली (मंडळ यातील काही रक्कम सामाजिक संस्थाना देणगीदाखल देणार आहे).

**संकलन - प्रसाद पानवळकर,** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

## जिना इसी का नाम है

निसर्गाने, समाजाने, आपल्या कुटुंबीयांनी आपल्यावर अनेक गोष्टींची उधळण केली आहे. त्याची कृतज्ञता सदैव मनी असावी. आपल्या संस्कारात ती भिनावी. रानकवी ना. धो. महानोर म्हणतात तसं -

या नभाने या भुईला दान द्यावे
आणि या मातीतून चैतन्य गावे
कोणती पुण्ये अशी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लगडून जावे..

नभ, भुईपासून आपण हेच शिकावे. निसर्ग देत राहतो. परतफेड करतो. पावसाच्या एका थेंबाला जमीन पालवी देते. माणूस म्हणून आपण हेच करायला हवं. याच भावनेतून आम्ही दीपस्तंभ फाउंडेशनच्या मनोबलमध्ये काम करतो. माझ्या वयाच्या गध्देपंचविशीत मला समाजातील श्रांत, विकल समुदायाचे जगणे उमगले. गुणवत्ता आहे पण संधी नाही, विद्वत्ता आहे पण त्याचे चीज होईल अशी संसाधने नाही. मूलभूत गरजांसाठी मारामार. गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रशिक्षण तर लक्झरीच ठरावी, अशा निमशहरी, ग्रामीण, अतिग्रामीण, दुर्गम, अतिदुर्गम भागात मी खूप फिरलो. तिथे जाणीव समृद्ध झाली. ते अनुभव आल्यानेच जगण्याचे ठिक पण अर्थपूर्ण जगण्याचे काय – असा प्रश्न पडला.

शहरात सहज शक्य असलेले नोकरीवजा करिअर न निवडता मी मूळ जळगावी गेलो नि पूर्णवेळ सामाजिक काम सुरू केले. लोकं म्हणतात मी वाहून घेतले – प्रत्यक्षात तसे नाही. मला समाजाला काय द्यायचं आहे – याचा शोध नि बोध घेत असतो. हे काम विलक्षण अनुभव देणारे आहे. भारतातल्या दिव्यांग, अनाथ, व गरजू विद्यार्थ्यांसाठी पहिला निवासी, उच्च शिक्षण, व स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाचा प्रकल्प जळगाव व पुणे येथे सुरू केला.

एक इंग्रजी वाक्य आहे. One is equal to Zero and two is equal to infinity – विनय हर्डीकरांना एका लेखात या वाक्याला इंग्रजीत म्हटले – 'जेव्हा समान हृदयाची माणसं एकत्र येतात तेव्हा संकटाच्या पहाडाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात...' समान सहवेदनेची माणसे माझ्या या सामाजिक कामात जुळत गेली. त्यातील सहृदय 'दीपस्तंभ' चे ग्लोबल सदस्य अमित वाईकर यांनी माझी व बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष प्रसाद पानवळकर व त्यांची पत्नी, सौ. निवी पानवळकर, यांची भेट घडवून आणली. श्री. पानवळकरांनाही बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक योगदान देण्याचीही अनेक वर्षांपासून इच्छा होती. आमचे विचार जुळले. माझ्या पूर्वनियोजित अमेरिका दौऱ्यात त्यांनी काही मंडळांमध्ये माझे कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरवले. विश्व मराठी संमेलनाच्या निमित्ताने ते पुणे येथे आले असता त्यांनी आणि समाजरंगच्या विद्याताईनी 'दीपस्तंभ मनोबल' प्रकल्पाला भेट दिली. कुठल्याही संवेदनशील व्यक्तीप्रमाणे प्रसाद व विद्याताई सुद्धा या प्रकल्पाला भेट देऊन भारावले. त्यानंतर त्यांनी माझा दौरा अधिक विस्तारण्याची सूचना केली. नव्हे तर लगेच नियोजन सुरू केले. दीपस्तंभ मनोबलविषयी अनेक मराठी मंडळांना कळवले. माझा अमेरिका दौरा सांस्कृतिक नव्हता. पण आपल्या संस्कृतीसाठी होता. सेवाभाव, सामाजिक सद्भावाची संस्कृती. ही संस्कृती दीपस्तंभ मनोबलची आहे. माझ्या प्रवासाविषयी विस्ताराने कळवून श्री. पानवळकरांनी इतर संस्थांना माझा कार्यक्रम घेण्यासाठी प्रेरित केले. अमेरिका दौऱ्याचे पंधरा दिवसांचे नियोजन होते. ते बदलावे लागले. १५ ऐवजी ३५ दिवस. अमेरिकेत व नेदरलँड मध्ये ४५ दिवस, ३५ कार्यक्रमात २३ शहरांमध्ये मला प्रवास करता आला. स्वयं टॉक्स चे संस्थापक माझे मित्र नवीन काळे माझ्यासोबत होते. कार्यक्रमांच्या माध्यमातून मी हजारो मराठी आणि भारतीय व्यक्तींना अमेरिकेत भेटलो.

अमेरिका हा देश विलक्षण आहे. त्याला गती आहे, प्रगती आहे. शिस्त आहे. विकासासाठी आवश्यक व्यावसयिक दृष्टी आहे. ती तेथील समाजमनावर देखील आहे. व्याख्यान त्यातही सामाजिक क्षेत्रातील काम – म्हणजे लोकांची दृष्टी बदलते. तसे कार्यक्रमही अमेरिकेत हल्ली होत नसल्याचे ऐकिवात होते. कारण आयोजनच कुणी करत नाही. पण मराठी मंडळाचे अध्यक्ष, सचिव , पदाधिकारी व संवेदनशील मराठी माणसांनी माझे सर्व कार्यक्रम अतिशय उत्कृष्टपणे आयोजित केले. त्यासाठी खूप श्रम घेतले. नियोजन केले. वेळ खर्ची घातला. त्यात दीपस्तंभच्या देणगीदारांचाही मोठा सहभाग होता. जे जे कार्यक्रमात सहभागी झालेत त्यांचा प्रतिसाद विलक्षण होता. अमूल्य वेळ लोकांनी दिला. तन, मन नि धनानेदेखील सहभाग नोंदवला. सदैव या कामी सहभागी राहण्याचे पाठबळही मला व संस्थेला दिले.

कार्यक्रम होता - "जिना इसी का नाम है. यश म्हणजे काय – स्थिरता, पैसा, उत्तम आरोग्य, मुलंबाळं. हे सारं असलं की मग यश म्हणता येते का- तर नाही. महानोर आपल्या कवितेत पुढे म्हणतात –

गुंतलेले प्राण या रानात माझे

फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदुन बेहोष होता
शब्दगंधे तू मला वाहून घ्यावे
या नभाने या भुईला दान द्यावे
आणि या मातीतून चैतन्य गावे...

रानकवी नभ नि भुईचं नातं उलगडतो. दोन्ही एकमेकांसाठी काय करतात हे सांगतो. या माती ते मेघ प्रवासालाच आनंद म्हणतात नि देण्यातूनच तो सर्वाधिक मिळतो. इतरांसाठी काहीतरी करण्याचा आनंद विलक्षण असतो. ते समाधान वेगळे असते. यश मिळते. थोडे जास्त कष्ट केले की अजून जास्त मिळते. दोन हात, दोन पाय, दोन डोळे, दोन वेळचं जेवण, डोक्यावर छत नि कोणतेही संसाधनं (कधी कधी गरज नसतानाही) उभे करण्याची क्षमता असतानाही लोक आनंदी नसतात. कारण या आनंदाला अर्थपूर्ण जगण्याचे कोंदण नसते. यशस्वी जीवनासोबतच अर्थपूर्ण जीवन असावे. निस्वार्थ भावनेने स्वतःसोबत किती व्यक्तींच्या जीवनात परिवर्तन घडवून आणतो यावर आपल्या जगण्याची अर्थपूर्णता अवलंबून असते. आपल्या भारतीय शास्त्रांमध्ये याबाबत आग्रही भूमिका मांडलेली आहे – "व्यशेम देवहितम् यदायुः" - आयुष्यभर आपण परोपकार करत राहिले पाहिजे असे म्हटलेले आहे. हीच भावना तुम्हा साऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा मी प्रयत्न केला. हे अंतरीचे धावे तुमच्यापर्यंत पोहोचले, याचे अतीव समाधान मला आहे.

या दौऱ्यामुळे मला अनेक गोष्टी शिकता आल्या. दीपस्तंभ संस्थेसाठी हा दौरा अभूतपूर्व ठरला. या दौऱ्यात मिळालेला अभुतपूर्व प्रतिसाद व प्रेम हे नंतर कायम राहिले व दीपस्तंभ फाउंडेशन यूएसए या संस्थेची अमेरिकेतील मंडळींनी नोंदणी केली . ७ मंडळ सदस्य व ४० आजीवन सदस्य जोडले गेलेत. अनेकांनी आर्थिक योगदान देण्यास सुरुवात केली. त्यासोबतच आपला वेळ व कौशल्य द्यायला सुरुवात केली.

मराठी आपली माय. मायमराठीची माया मी अमेरिकेत अनुभवली. मराठीची ताकद कळली. अमेरिकेत मराठी माणसाने अतिउच्च दर्जाचे संघटन उभे केले. याचा प्रत्यय वेळोवेळी प्रवासात येत होता. या कार्यक्रमांत मराठी मंडळांचे सदस्य , हितचिंतक, स्वयंसेवक, आप्तेष्ट भेटत होते. कार्यक्रमांचे आयोजन करीत होते. मोती विखुरलेले असतात. त्याची माळ गुंफावी लागते. मराठी माणसाची मोतीमाळ बृहन्महाराष्ट्र मंडळ या एका धाग्याने ओवली आहे. डॅलस इथला बृहन्महाराष्ट्र मंडळाचा 'टेक्सस मैत्री मेळावा' तर अचंबित करणारा होता. दीड हजार पेक्षा जास्त मराठी माणसे एकत्र आली होती. छत्रपती शिवाजी महाराजांवरील भव्य कार्यक्रम व त्यानंतर लेझीम मिरवणुकीचा सांस्कृतिक कार्यक्रम - सगळेच वातावरण मराठमोळ होतं. गंमत म्हणजे असे शुद्ध सात्विक मराठी वातावरण, सणांचं सेलिब्रेशन हल्ली महाराष्ट्रातदेखील अभावाने अनुभवता येते.

पिट्सबर्ग मराठी मंडळात आई-वडिलांसोबत ५० हून अधिक शाळेतली मुलं कार्यक्रमाला आलेत. त्यांचे कुतूहल, योगदान देण्याची वृत्ती नि सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रश्न विचारण्याची पद्धत अफलातून होती. त्यातील काही विद्यार्थी हे 'दीपस्तंभ मनोबल' मध्ये कामाचा अनुभव घेण्यासाठी येणार आहेत. मी त्या सर्वांची उत्सुकतेने वाट पाहतो आहे. मराठी भाषा अभिजात झाली. मला असं वाटतं आईला असं कोणतंही विशेषण कमीच पडते. आपण मराठीसाठी करत असलेले कामही तसेच आहे. राहुल देशमुख यांच्या कडून बृहन महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून चालणाऱ्या शंभरहून अधिक मराठी शाळा कशा चालतात हे समजून घेता आलं. माझ्यासाठी हे सारं अद्भुत होतं. भन्नाट आहे हे सगळ.

शिकागो मधल्या कार्यक्रमात उदंड प्रतिसाद लाभला. पाच दशके शिकागोत असलेली ज्येष्ठ - श्रेष्ठ मराठी माणसं भेटली. माझ्या दौऱ्याचा समारोप वॉशिंग्टन डीसी येथे झाला तिथे भरभरून प्रतिसाद मिळाला. अध्यक्ष मिलिंद प्रधान व सर्व सदस्यांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांच्या मंडळाच्या ५० व्या वर्धापन दिनाच्या वर्षात माझा दौरा झाला, हे माझे भाग्यच.



वेगळा देश, भौगोलिक प्रदेश, ऊन- वारा - पाऊस, बर्फ - थंडी अशा सगळ्या परिस्थितीत मराठी मंडळाचे सदस्य माझ्यासोबत होते. त्यांची संवेदनशीलता पदोपदी जाणवत होते कार्यक्रमानंतर रात्री उशिरापर्यंत अनेक परिवार भेटण्यासाठी येत होते. प्रवासादरम्यान एअरपोर्टवर सोडण्यासाठी दुसऱ्या शहरात माझ्यासोबत प्रवास करत, रजा काढून मला वेळ देत होते. हे भावबंध अनोखे आहेत. हे जपू, वाढवू, इतरांनाही वाटू. आपलं जगणं एकमेकांच्या साहाय्याने अजून अर्थपूर्ण करू. हीच आपली श्रीशिल्लक! तुम्हा सर्वांना शुभेच्छा!

- **यजुर्वेंद्र महाजन,** दीपस्तंभ फाऊंडेशन, जळगाव, महाराष्ट्र

## जागते रहो मेरे दोस्त!

गेली दोन वर्षे आपलं स्टॉक मार्केट दणक्यात आहे. S&P-500 इंडेक्स २०२३ मध्ये २६% तर २०२४ मध्ये २५% वरती गेला. NASDAQ ने तर अजूनच उंची गाठली आहे. सगळ्यांचे 401K, IRA, Roth IRA आणि ब्रोकरेज अकाउंट्स अगदी जोरात आहेत. सगळीकडे कसा आनंदीआनंद आहे. ह्यापुढे हे असेच चालू राहील, अशी सर्वांना आशा आहे. अशा वेळी आपल्या भगवद्गीतेमधले कृष्णाने अर्जुनाला उद्देशून केलेले वक्तव्य आठवतं, "पार्था, हेही दिवस जातील, काळ बदलत असतो." अगदी अचूक लागू पडतं हे स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणूक करताना. काळ नुसताच बदलत नाही, तर तो बदलायला वेळही लागत नाही. आणि जेव्हा बदलतो तेव्हा होत्याचं नव्हतं होतं. २००८ चा फायनान्शिअल मार्केट कोलॅप्स आठवतोय का? तुम्ही म्हणाल, त्या भयानक आठवणी आता का काढतोस? पण ह्याच आठवणी आपल्याला जागवतात आणि जागं ठेवतात. स्वप्नातल्या दुनियेतून बाहेर काढतात आणि नको ती जोखीम घेण्यापासून परावृत्त करतात.

पण असं झालं तरी काय होतं २००८ मध्ये? चला, थोडा इतिहासात फेरफटका मारूया. १९२९ ते १९३९ मधले ग्रेट डिप्रेशन आणि त्यानंतर आलेली जागतिक मंदी आपल्या सर्वांना माहीत आहेच. किंबहुना त्यानंतर घडलेली सगळ्यात भयानक इकॉनॉमिक घटना म्हणजे २००८ चा फायनान्शिअल मार्केट कोलॅप्स. झालं काय, की २००० ते २००६ पर्यंत अमेरिकेतील हाऊसिंग मार्केट चढत्या श्रेणीत वर गेले होते. अत्यंत कमी व्याजाचे दर, जुजबी बंधनकारक नियम आणि घरांच्या किंमती सतत वाढतील असा सर्वसामान्यांचा विश्वास, ह्यामुळे घरांच्या किमती छप्पर फाड के वरती गेल्या होत्या. बँका आणि इतर कर्जदार ह्यांनी त्यात हात धुवून घ्यायचं ठरवलं. बँका आणि कर्जदारांनी सबप्राइम मॉर्टगेजेस (कमी क्रेडिट स्कोअर असलेल्या लोकांना दिलेली जास्त धोक्याची कर्जे) मोठ्या प्रमाणावर दिली. अशा कर्जांवर सुरुवातीला कमी व्याजदर असतो, पण काही वर्षांनी तो वाढतो आणि कर्जदारांना फेडणे कठीण होत जातं. कोणालाही, कितीही, कशीही आणि कोणत्याही व्याजदरावर कर्ज मिळत होती.

हे कमी होतं म्हणून की काय, मोठमोठ्या फायनान्शिअल कंपन्यांनी ही सगळी कर्ज एकत्र बांधून मॉर्टगेज बॅक्ड सिक्युरिटीज (MBS) आणि कोलॅटराज्ड डेबिट ऑब्लिगेशन (CDO) ह्यासारखी अभिनव प्रॉडक्ट्स विकायला सुरुवात केली. फक्त अमेरिकेत नाही, तर अख्ख्या जगातल्या गुंतवणूकदारांना! क्रेडिट रेटिंग कंपनींनी सुद्धा त्याला अत्यंत सुरक्षित म्हणून उच्च (AAA) रेटिंग दिली. क्रेडिट डिफॉल्ट स्वॅप्स (CDS) या नावाखाली विम्यासारखी साधने विकली गेली. मग काय विचारता? सगळ्यांनी CDS, MBS आणि CDO डोळे मिटून विकत घेतल्या. नक्की कर्ज कोण घेतंय, कोणाला देतंय, कोण त्यावर लक्ष ठेवतंय ह्याला काहीही पायपोस राहिला नाही. नियम खुलेआम धाब्यावर बसवले जात होते. सगळेच एका स्वप्नील जगात वावरत होते. ही पायाभूत कर्जे अत्यंत धोकादायक होती आणि त्यामागे पुरेसे भांडवली संरक्षणही नव्हते.

आणि मग दणका बसला! २००६ पासून घरांच्या किमती घसरायला लागल्या. लवकरच घरांच्या किमती घेतलेल्या कर्जापेक्षा खाली आल्या. सबप्राइम कर्जांवरील डिफॉल्ट्स झपाट्याने वाढले. लेंडरने घरमालकाला नोटीस पाठवायला सुरुवात केली. पर्यायाने MBS आणि CDO च्या किमती खाली आल्या. त्या विकायला गेलं, तर मार्केटमध्ये कोणी खरेदीदार मिळेना. मोठ्या बँकांचे व वित्तीय संस्थांचे बॅलन्सशीट कमकुवत झाले. अचानकपणे प्रचंड घबराट झाली आणि हा फुगा फुटला. हा सगळा पोकळ डोलारा पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळला. Bear Stern आणि Lehman Brothers सारख्या दिग्गज कंपन्या रातोरात दिवाळखोरीत आल्या. AIG सारख्या विमा कंपन्या CDS च्या जबाबदाऱ्यांमुळे, कोसळण्याच्या उंबरठ्यावर आल्या. बऱ्याचशा बँकांनी कर्जच देणे बंद केले. क्रेडिट बाजार गोठले, शेअर बाजार कोसळले आणि गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास संपला. अख्ख्या जगातला पैसाच जणू नाहीसा झाला. काही देशच्या देश भिकेला लागले. एक अतिशय खोल आणि प्रत्येकाचा लचका तोडणारी जागतिक मंदी पसरली. कित्येकांची घरं गेली. कित्येकांच्या नोकऱ्या गेल्या. स्टॉक मार्केटमधल्या तोट्याला तर गणतीच उरली नाही.

पण The Great Depression मध्ये शिकलेल्या धड्यामुळे प्रत्येक सरकारने लगेचच पावले उचलली. फक्त अमेरिकाच नाही तर सर्व राष्ट्रांच्या सरकारांना ह्यात हस्तक्षेप करण्यावाचून पर्यायच उरला नाही. मोठमोठ्या बँकांना बेलआउट करायला लागलं. फेडरल रिझर्व्हने व्याजदर जवळपास शून्यावर आणले. युरोप, आशिया आणि इतर देशांनी देखील प्रचंड आर्थिक प्रोत्साहन पॅकेजेस जाहीर केली. G20 देशांनी एकत्रितपणे आर्थिक स्थैर्यासाठी उपाययोजना आखल्या.

कंझुमर फायनान्शिअल प्रोटेक्शन ब्युरो (CFPB), वोकलर नियम, डॉड फ्रँक वॉल स्ट्रीट ऍक्ट ह्यासारख्या गोष्टी अंमलात आणल्या गेल्या. कडक नियम लागू केले गेले. आणि हळूहळू का होईना पण जग ह्या धक्क्यातून सावरलं. हा परतीचा मार्ग चांगलाच त्रासदायक, बोचक आणि दीर्घ होता. ज्यांच्याकडे वेळ आणि गाठीशी पैसा होता तेच ह्यातून तरले. बाकीचे बुडाले.

ह्या सर्वातून तुमच्या माझ्यासारख्या गुंतवणूकदारांना चांगलाच धडा मिळाला. वरकरणी जरी हा 'सिस्टमिक इशू' म्हणून धरला गेला तरीही ह्याच्या मुळाशी होती प्रत्येक गुंतवणूकदाराची न संपणारी हाव आणि त्यासाठी घेतलेली न झेपणारी जोखीम! म्हणतात ना 'ये दिल मांगे मोअर' अगदी तसेच. आपण एक गोष्ट सदैव लक्षात ठेवली पाहिजे, की 'If an investment seems to be too good to be true, then it probably is.' मग ती रिअल इस्टेट असो की स्टॉक मार्केट असो की क्रिप्टो करन्सी असो. नियम तोच!

कोणत्याही गुंतवणूकदारांसाठी काही शिकवणी ह्या जितक्या मूलभूत आहेत तेव्हढ्याच त्या कालातीत आहेत. त्या अशा-
कोणतीही गुंतवणूक सदैव फक्त वरतीच जाईल असं गृहीत धरणं चुकीचं आहे. अतिरिक्त नफा मिळवण्याच्या हव्यासापासून सावध रहा, कारण जास्त परतावा म्हणजे जास्त जोखीम.

गुंतवणूक करताना जोखीम कमी करण्यासाठी विविधीकरण (वेगवेगळ्या क्षेत्रात गुंतवणूक) करा (Diversification). गुंतवणूक समजून करा आणि समजत नाही अशा गुंतवणुकीपासून दूर राहा.

शक्यतोवर उधारीवर (मार्जिन मनी) जास्त अवलंबून राहू नका. कारण, लिवरेजने नफा वाढतो, पण तोटाही त्याच प्रमाणात वाढतो.

गुंतवणूक करतांना दीर्घकालीन दृष्टी ठेवा. घाबरून घाईघाईत विक्री केल्याने कायमचा तोटा होऊ शकतो. प्रत्येकाने आपल्या गरजेनुसार आपत्कालीन निधी ठेवला तर अशी वेळ टाळू शकतो.

शेवटी आर्थिक साक्षरता हे अशा अनपेक्षित संकटातून वाचण्याचे प्रभावी शस्त्र आहे. हे लक्षात घेतलं पाहिजे, की अतिशय कष्टाने आपण हा पैसा कमावला आहे. तो योग्य गुंतवणूक करून वाढवणं हे जितकं आवश्यक, त्यापेक्षाही महत्वाचं, तो पैसा सुरक्षितपणे गुंतवणं. तेव्हा एकच सांगणं आहे - जागते रहो मेरे दोस्त!

- **उदेश वैद्य,** फिनिक्स, ऍरिझोना (BMM अर्थमंथन वक्ता)

## उत्तररंग




BMM उत्तररंगाच्या Father's Day निमित्ताने सादर झालेल्या “लई अवघड हाय गड्या उमगाया बाप रे” या विशेष कार्येक्रमात काही उत्तररंगीयानी आपल्या वडिलांच्या आठवणी सादर केल्या. त्यातीलच काही आठवणी येत्या काही महिन्यात वृत्तात प्रसिद्ध करण्यात येतील.

### मरावे परी कीर्तिरुपी उरावे

माझे वडील म्हणजे मराठीतले नावाजलेले सिद्ध हस्त लेखक **मृत्युंजयकार शिवाजी सावंत.** आमच्या बाबांचा जन्म ३१ ऑगस्ट १९४० रोजी कोल्हापूर जवळच्या आजरा नावाच्या गावात एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांना तीन मोठे भाऊ होते. वयाच्या नवव्या वर्षीच त्यांच्या वडिलांचं निधन झालं आणि सगळ्या कुटुंबाची जबाबदारी आईवर आली. लहानपणापासूनच त्यांना व्यायामाची आणि मैदानी खेळाची फार आवड होती. कबड्डीच्या राष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी कोल्हापूर जिल्ह्याचं नेतृत्वही केलं होतं. शिवाय कलेची आवड असल्यामुळे त्यांनी काही नाटकांमधूनही काम केल होतं. इतक्या लहान वयातही आपल्याला मोठेपणी काय व्हायचं आहे हे त्यांना पक्कं माहीत होतं. आठवीत असतानाच ‘मला लेखक व्हायचंय’ हे त्यांनी शाळेतील एका निबंधांत स्पष्टपणे लिहिलं होतं. नववीत असताना शाळेच्या स्नेहसंमेलनात ‘अंगराज कर्ण’ नावाच्या एकांकिकेत त्यांनी श्रीकृष्णाची भूमिका केली, पण त्यांच्या मनात रूतून बसलेले संवाद मात्र कर्णाचे होते. तेव्हापासूनच नकळत त्यांच्या मनात मृत्युंजय या कर्णकथेचं बीज रूजू लागलं होतं. पुढे वयाच्या तेविसाव्या वर्षी त्यांनी मृत्युंजयच्या लेखनाला सुरुवात केली आणि सत्तावीसाव्या वर्षी ही कर्णकथा कादंबरी स्वरुपात प्रकाशित झाली.

मृत्युंजय वाचून आमच्या आईनं, आत्ताची मृणालिनी सावंत आणि पूर्वाश्रमीची कुंदा कामतेकरने भारावून लेखकाला पत्र लिहिलं आणि लेखकानेही त्या पत्राला उत्तर दिले. या पत्र व्यवहारातूनच त्यांचे सूर जुळले, त्यांनी एकमेकांना पसंत केलं आणि ९ जून १९६९ ला

त्यांचा विवाह झाला. १९७० साली माझा आणि १९७२ मध्ये माझ्या धाकट्या भावाचा अमिताभचा जन्म झाला.

वडील म्हणून बाबांनी आम्हाला सुखसोयींनी समृद्ध असं जीवन दिलं. ज्या काळात लेखकांना लेखनाबरोबरच इतर व्यवसाय किंवा नोकरी करून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवायला लागत असे त्या काळात बाबांच्या पुस्तकांवर आमचं पूर्ण शिक्षण झालं ही खरोखरच कौतुकास्पद गोष्ट आहे.

आमचे बाबा खूप मनस्वी होते आणि ते जगलेही तसेच. माणसं गोळा करणं त्यांना फार प्रिय होतं. मित्रांशी, चाहत्यांशी मनसोक्त गप्पा मारणं, एखाद्याला बरोबर घेऊन मंडईची वारी करून प्रचंड प्रमाणात भाज्या खरेदी करणं, आईसाठी भरपूर साड्या, दागिने खरेदी करणं, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवायच स्वतःवर औषधांचे वेगवेगळे प्रयोग करणं, पण त्यांनी सांगितलेलं पथ्य न पाळणं, अनेक प्रकारची परफ्यूमस खरेदी करणं, गरजू लोकांच्या मदतीला धाऊन जाणं... या त्यांच्या सगळ्याच गोष्टी अमर्याद होत्या.

आपली पुस्तकं वाचून आलेली चाहत्यांची पत्र वाचून ते खूप खुश व्हायचे. एकाच घरातल्या तीन पिढ्या एकाचवेळी 'मृत्युंजय' वाचतात यांचा त्यांना सार्थ अभिमान वाटायचा.

आपल्याला मिळालेल्या प्रचंड प्रसिद्धीचा उपयोग गरजू लोकांच्या मदतीसाठी करायला ते मागेपुढे बघायचे नाहीत. कुणाची नोकरी, कुणाची बदली, कुणाच्या मुलांचा शाळा-कॉलेज मधला प्रवेश यासाठी आपला शब्द टाकून शक्य ते सारं ते करत.

दुकानदार, विद्यार्थी, रिक्षावाले, भाजीवाले अशा त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाची ते आपुलकीनं चौकशी करत – तुझं नाव काय? गाव कुठलं? घरी कोण असतं? कुठे शिकलास? आम्ही म्हणायचो, बाबा हा माणूस परत तुम्हाला भेटणार तरी आहे का? मग, कशाला उगीच नसत्या चौकशा करताय? त्यावर ते म्हणायचे, "ते तुम्हाला नाही कळायचं." आणि खरोखरच त्यांचं लोकांशी काय नातं जुळलं होतं त्याची प्रचिती आम्हाला ते असताना तर येतच होती, पण १८ सप्टेंबर २००२ ला ते गेल्यानंतर ते जास्त प्रकर्षानं जाणवलं. बाबा गेल्यानंतर एकदा माझा भाऊ भाजी आणायला गेला असताना भाजीवालीने त्याला विचारलं – तू सावंतांचा पोरगा का? त्याच्याशी बोलताना ती गहिवरली होती आणि त्याच्याकडून भाजीचे पैसेही ती घेत नव्हती. एका अशिक्षित, पुस्तकं वाचता न येणाऱ्या बाईनंही बाबांची ओळख ठेवली होती. यातच बाबांचं माणूस म्हणून मोठेपण लपलेलं आहे असं मला वाटतं.

लहानपणापासून बाबांनी आम्हालाही वाचनाची आवड लावली होती. तेव्हा आमच्या घरातला माळा गोष्टींच्या पुस्तकांनी भरलेला होता. आज घरात पुस्तकांनी आणि बाबांना मिळालेल्या पुरस्कारांनी भरलेली कपाटं आहेत. पुस्तकांशिवाय बाबांकडून आम्हाला मिळालेली सर्वोत्तम गोष्ट म्हणजे – त्यांनी लावलेली व्यायामाची सवय. त्यामुळेच आजही माझी तब्येत चांगली आहे असं मला मनापासून वाटतं.

बाबा असताना साहित्य, कला, क्रीडा विश्वातल्या आणि राजकारणातल्या अनेक प्रसिद्ध मंडळींना आम्ही जवळून बघितलं. एकदा प्रसिद्ध बुद्धिबळपटू रोहिणी खाडीलकर बाबांना भेटायला आली होती. पण आपण पूर्व कल्पना न देता आलो आहोत म्हणून संकोचानं बिल्डिंगच्या खालीच उभं राहून तिनं घरी निरोप पाठवला. मग आम्ही खाली जाऊन तिला घेऊन आलो.

मृत्युंजय, छावा आणि युगंधर ही बाबांची अतिशय नावाजलेली पुस्तकं. पण त्याशिवाय बाबांनी लढत, संघर्ष, अशी मने असे नमुने, शेलका साज, पुरुषोत्तमनामा अशी इतरही पुस्तकं लिहिलेली आहेत. मृत्युंजयचा हिन्दी, गुजराती, राजस्थानी, तमिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम अशा ७ भारतीय भाषा आणि इंग्रजीतही अनुवाद झालेला आहे. युगंधरचा हिन्दी अनुवाद आमच्या आईनंच केलेला आहे.

मृत्युंजयनं बाबांना खूप प्रसिद्धी मिळवून दिली, पण त्यांच्या लेखनाची खरी ताकद दिसते ती त्यांच्या पुस्तकांनी विविध क्षेत्रातल्या लोकांच्या मनावर पाडलेल्या जबरदस्त प्रभावाने. या बाबतीतली एक आठवण अगदी अभिमानास्पद आहे. १९९३ साली श्रीनगर मधल्या हजरतबाल दर्ग्यामध्ये काही अतिरेकी लपून बसले होते. मराठा लाइफ infantry चे सैनिक बाहेरून दर्ग्याला वेढा घालून बसले होते. अतिरेक्यांबरोबरच्या सरकारी वाटाघाटी संपून दर्ग्यातून अतिरेकी बाहेर आल्यानंतर एका पत्रकारानं त्या सैनिकांना विचारलं, "थंडी वाऱ्यात तुम्ही इथे बसून आहात. अतिरेक्यांना तुमच्यासमोर जेवणाची ताटे जात होती. कशाच्या जिवावर तुम्ही ही हिम्मत राखता? त्यावेळी एका मराठा जवानाने त्याच्या कोटातून मृत्युंजय बाहेर काढून सांगितले, "निराशा आली की हे पुस्तक वाचतो." अशा जबरदस्त गोष्टी ऐकल्यावर मन अर्थातच अभिमानानं भरून येतं.

असे प्रतिभाशाली, मनस्वी आणि दिलदार वडील आम्हाला लाभले. खरोखरच आम्ही खूप भाग्यवान आहोत असं मला वाटतं. Father's Day च्या निमित्तानं मी लिहिलेल्या कवितेतल्या चार ओळी वाचते आणि थांबते.

बाप मोकळे आकाश, बाप उजळ प्रकाश
त्याच्या कर्तृत्वाचा डंका सारा उजळतो वंश
बाप साठला मनात बाप दाटला उरात
त्याचं नसून असणं भरे प्रत्येक क्षणात
श्रीकृष्णार्पणमस्तु

- **कादंबिनी धारप**, रेडमंड, वॉशिंग्टन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## हेमंत करकरे यांना समर्पित

"राष्ट्र देवो भव" – हे वाक्य केवळ पुस्तकातील तत्त्वज्ञान नव्हे, तर माझ्या पप्पांचं जगण्याचं ब्रीद होतं.

२६ नोव्हेंबर २००८ – मुंबईवर भयावह अतिरेकी हल्ला झाला. त्या काळरात्री, माझे पप्पा – हेमंत करकरे, महाराष्ट्र ATS चे प्रमुख म्हणून, आपल्या सहकाऱ्यांसह निर्भयतेने मैदानात उतरले. कामा रुग्णालयाजवळ अतिरेक्यांचा पाठलाग करताना त्यांनी वीरमरण पत्करलं. त्यांच्या अद्वितीय धैर्याबद्दल त्यांना मरणोत्तर अशोक चक्र, देशाचं सर्वोच्च शांतताकालीन शौर्यपदक, प्रदान करण्यात आलं.

"मरावे परी कीर्तिरुपी उरावे" – हे त्यांचं आयुष्य सार्थ ठरवणारं वाक्य ठरलं.

२६ वर्षांच्या प्रदीर्घ पोलीस सेवेत त्यांनी गडचिरोलीच्या नक्षलवादी भागात, दिल्लीच्या विशेष तपास विभागात, आणि व्हिएन्नामधील राजदूतपदाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. २००७ साली राष्ट्रपतींच्या हस्ते पोलीस पदक मिळाल्यावर त्यांचा घरी सत्कार झाला, तेव्हा त्यांनी अगदी सहजपणे सांगितलं – "माझी नोकरी अशी आहे की समाजातल्या मागे राहिलेल्या घटकांना मदत करता येते, आणि त्यासाठी सरकार मला पगार सुद्धा देते! आणखी काय हवं?"

समाजप्रेम, माणुसकी आणि बांधिलकी – हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गाभा होते. ते आम्हा सर्वांना नेहमी सांगत – आपण नशिबवान आहोत, म्हणून मागे असलेल्या बंधुभगिनींसाठी काहीतरी करणं ही आपली जबाबदारी आहे.

त्याच सामाजिक जाणीवेचा अनुभव त्यांनी आम्हाला एकदा प्रत्यक्ष दिला. एक दिवाळी त्यांनी आम्हा बहिण-भावंडांना शहरातल्या अनाथाश्रमात नेलं. घरी आणलेले फटाके, फुलबाज्या आम्ही सगळ्यांनी तिथल्या मुलामुलींशी वाटून घेतल्या, आणि तिथेच दिवाळी साजरी केली. आनंद कशात असतो, याचा तो आमचा पहिला जीवनपाठ होता.

ते नेहमी शांत, संतुलित आणि विचारपूर्वक निर्णय घेत. मुंबईसारख्या धकाधकीच्या शहरात, गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्येही त्यांनी मानवी दृष्टीकोन जपला.

ते आमच्यासाठी प्रेमळ बाबा होते. एकदा मला लहानपणी सरप्राइझ द्यायला ते एक छोटंसं कुत्र्याचं पिल्लू घेऊन आले. तेव्हाची त्यांची डोळ्यातली प्रेमळ चमक मी आजही विसरले नाही.

वाचन हे त्यांचं व्यसनच होतं. घरात त्यांनी एक छोटी पण अत्यंत नीटनेटकी लायब्ररी तयार केली होती – कव्हर्स, वर्गवारी, टॅग्स – म्हणजे ती एक शिस्तबद्ध ज्ञानकोशच होती.

त्यांना सुतारकामाचा छंद होता. सुट्टीच्या दिवशी ते शांतपणे लाकडामधून एखादी कलाकृती साकारत. आजही त्यांच्या हाताने घडवलेली छोटी फर्निचर, शो-पीस आमच्याकडे जपून ठेवलेली आहेत.

ते मुळात मेकॅनिकल इंजिनिअर होते. हिंदुस्तान लिव्हरमध्ये उच्च पदावर असतानाही त्यांनी UPSC दिलं आणि आयपीएस होऊन देशसेवेसाठी स्वतःला वाहून घेतलं. त्यांना पैसा, सत्ता किंवा प्रसिद्धीपेक्षा ध्येय, मूल्यं आणि माणुसकी महत्त्वाची वाटायची.

पप्पांनी "वडील" ही भूमिका केवळ पार पाडली नाही तर ती जिवंत केली. आईवडिलांनी आम्हाला केवळ वाढवलं नाही, तर मूल्यांची शिदोरी दिली. हीच शिदोरी मी पुढे ईशा व रुतुजामध्ये रुजवण्याचा प्रयत्न करते.

सर्व वडिलांना, आणि त्यांच्या आठवणी मनात जपणाऱ्यांना – फादर्स डेच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

- **जुई करकरे नवरे**, बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका


**राशिभविष्य : ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२५**

**"या महिन्यात गुरु आपल्या उच्च राशी कर्केत जात आहे. याचे शुभ परिणाम होतील आणि बऱ्याच राशींना गुरु भ्रमण लाभदायक ठरेल"**

**अजय तनखीवाले**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## मुलाखत: सौरभ नेत्रावळकर
## (USA राष्ट्रीय संघ क्रिकेटपटू)



**प्रश्न: सौरभ, तुझी पार्श्वभूमी सांगशील का, बालपण कसे होते. क्रिकेटर बनण्यासाठी कशामुळे प्रेरणा मिळाली?**

**सौरभ:** जन्म मुंबई मालाड (मुंबई) येथे झाला. कुटुंबात आई- बाबा, एक लहान बहीण आणि आजी-आजोबा होते. लहान असताना टीव्हीवर क्रिकेट सामने बघून आणि माझे वडील आणि त्यांच्या मित्रांना खेळताना पाहून मला क्रिकेटर बनण्याची प्रेरणा मिळाली. माझ्या अपार्टमेंट कॉम्प्लेक्समधील लोक देखील क्रिकेटप्रेमी होते. लहानपणी तेथे क्रिकेट खेळताना आम्ही परिसरातील अनेक खिडक्यांच्या काचा फोडल्या होत्या 🙂 उन्हाळ्यात दिवसभर क्रिकेट खेळत असे. रात्री फक्त झोपण्यासाठी घरी जायचो.

**प्रश्न: दिवसभर क्रिकेट खेळल्यानंतर तुझे अभ्यासाचे वेळापत्रक काय होते?**

**सौरभ:** लहानपणापासूनच अभ्यासाची आणि वाचनाची आवड होती. दिवसभर क्रिकेट खेळल्यानंतर मी संध्याकाळी किंवा रात्री अभ्यास करायचो.

**प्रश्न: औपचारिक क्रिकेट प्रशिक्षण कसे सुरू झाले? कोणत्या वरिष्ठ क्रिकेटपटूने तुला त्यात मदत केली?**

**सौरभ:** मी १० वर्षांचा असताना चर्चगेट येथील ओव्हल ग्राउंडमध्ये वेंगसरकर क्रिकेट अकादमी उघडण्याबद्दल वर्तमानपत्रात एक लेख आला होता. तिथे open tryouts होते आणि निवड झालेल्यांना मोफत प्रशिक्षण जाहीर करण्यात आले होते. माझे बाबा मला तिथे घेऊन गेले आणि ५००-६०० सहभागींमधून माझी निवड झाली आणि माझे प्रशिक्षण लेदर बॉल क्रिकेटने सुरू झाले.

**प्रश्न: सुरुवातीचे क्रिकेट coach कोण होते? तुला मौल्यवान सल्ला देणारे वरिष्ठ क्रिकेटपटू आणि coach कोण होते?**

**सौरभ:** वेंगसरकर अकादमीमध्ये माझे coach सुरेश तिडगी आणि रवी कुलकर्णी होते, मुंबईकडून अंडर-१७ -१९ मध्ये खेळताना coach सतीश सामंत होते. त्यांच्या प्रशिक्षणाखाली मला भारताच्या अंडर-१९ खेळण्यासाठी ब्रेक मिळाला. अंडर-१९-२२ दरम्यान आमचे coach संग्राम सावंत होते. सध्या आमच्या अमेरिकन राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षक श्रीलंकेचे पुबुडू आहेत.

**प्रश्न: तुला डावखुरा वेगवान स्विंग गोलंदाज होण्याची प्रेरणा कशामुळे/कोणामुळे मिळाली?**

**सौरभ:** मला आठवत नाही की मी डाव्या हाताने गोलंदाजी कशी केली. माझ्या वडिलांनी मला गोलंदाजी करायला शिकवले पण मी कदाचित naturally डाव्या हाताने गोलंदाजी करायला सुरुवात केली असेल. मी लहान असताना अष्टपैलू होतो पण गोलंदाजीच्या आधारे माझी निवड झाली असल्याने, मी गोलंदाजीवर अधिक लक्ष केंद्रित करत राहिलो. इरफान पठाण, जहीर खान आणि ग्लेन मॅकग्राथ सारख्या दिग्गजांकडून मला प्रेरणा मिळाली.

**प्रश्न: तू भारतात वाढलास आणि तिथे भारतीय सर्किटमध्ये क्रिकेट खेळलास आणि नंतर इथे खेळलास. काय फरक आहे आणि तू कसा जुळवून घेतोस?**

**सौरभ:** कॉर्नेलमध्ये असताना फारसे क्रिकेट खेळलो नाही पण कधीकधी आम्ही पीएच.डी. विद्यार्थ्यांसोबत क्रिकेट खेळायचो, बहुतेकदा सामाजिक (social) क्रिकेटच होते. Practice ची सोय तितकी चांगली नव्हती. खेळ कृत्रिम क्रिकेट खेळपट्ट्यांवर असायचे. आता अमेरिकेतील मेजर लीग आणि मायनर लीगमध्ये गुंतवणूकीमुळे परिस्थिती सुधारू लागली आहे, अनेक टर्फ क्रिकेट खेळपट्ट्या आहेत आणि अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडू क्रिकेट लीगमध्ये भाग घेण्यासाठी अमेरिकेत येतात. यामुळे स्थानिक स्पर्धात्मक क्रिकेटला चालना मिळाली आहे, क्रिकेट अकादमींची संख्या देखील वाढली आहे. यामुळे तरुण पिढीला चांगले प्रशिक्षण मिळत आहे आणि पुढील २-३ वर्षांत स्थानिक मुले देखील त्या पातळीवर खेळतील.

**प्रश्न: विद्यार्थी म्हणून अमेरिकेत येऊन एक उत्तम करिअर घडवणे आणि राष्ट्रीय संघात स्थान मिळवणे. अमेरिकेच्या राष्ट्रीय क्रिकेट संघापर्यंतचा तुझा प्रवास कसा होता?**

**सौरभ:** जेव्हा मी अमेरिकेत आलो तेव्हा मी क्रिकेट सोडले होते आणि पुन्हा क्रिकेट खेळण्याची अपेक्षा नव्हती पण जेव्हा मला कळले की येथे क्लब क्रिकेट आहे, तेव्हा फ्लोरिडा तसेच लॉस एंजेलिसमध्ये क्लब क्रिकेट खेळायचो. २०१७ मध्ये राष्ट्रीय संघासाठी एक शिबिर आणि

काही सराव सामने होते आणि त्यांना काही अतिरिक्त खेळाडूंची आवश्यकता होती. त्या सामन्यांमध्ये भाग घेतला आणि पुबुडू सरांना माझी कामगिरी आवडली. ICC ने residency नियमात बदल केल्याने मी भाग्यवान ठरलो आणि अमेरिकेसाठी खेळण्यास पात्र ठरलो.

**प्रश्न: त्यावेळी संघातील इतर खेळाडू कोण आणि कोणत्या देशांचे होते?**

**सौरभ:** त्यावेळी सर्व खेळाडू वेगवेगळ्या देशातून म्हणजे वेस्ट इंडिज, पाकिस्तान, आशियाई, दक्षिण आफ्रिकन इत्यादी. संघात विविधता होती, खेळाडू वेगवेगळ्या संस्कृतीचे होते, खेळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. आव्हाने होती पण आम्ही एकमेकांची संस्कृती शिकलो.



**प्रश्न: क्रिकेटमधील तुझा सर्वोत्तम दिवस (क्षण) कोणता होता?**

**सौरभ:** आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यात माझे वेगवेगळे सर्वोत्तम क्षण होते. १) १९ वर्षांखालील विश्वचषक जिंकला २) २००९ मध्ये ज्युनियर क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्कार मिळाला. युवराज सिंग, सुरेश रैना सारख्या महान भारतीय खेळाडूंसोबत एअर इंडिया संघात खेळण्याची आणि राहुल द्रविड सारख्या महान खेळाडूंना गोलंदाजी करण्याची संधी मिळाली. ३)२०१९ मध्ये अमेरिकेसाठी डिव्हिजन २ जिंकून आम्हाला one-day international दर्जा मिळाला. ४) भारत आणि पाकिस्तान सारख्या संघांविरुद्ध वर्ल्ड कपमध्ये खेळण्याची संधी मिळाली.

**प्रश्न: टी२० विश्वचषकात खास क्षण कोणते होते?**

**सौरभ:** पाकिस्तानविरुद्ध सामना चढ-उतारांनी भरलेला होता, सुपर ओव्हरपर्यंत गेला. त्या सामन्याने आम्हाला आत्मविश्वास दिला की आम्ही चांगल्या संघाविरुद्ध जिंकू शकतो. आम्ही भारताविरुद्ध जिंकू शकलो नाही पण मला वाटते की त्यांना आम्ही चांगली लढत दिली. आमच्या आदर्श खेळाडूंनी भरलेल्या भारतीय संघाविरुद्ध खेळणे हे एक भाग्य होते.

**प्रश्न: यूएसए टीममधील कॉमरेडरी कशी होती?**

**सौरभ:** आम्ही एकमेकांना खूप चांगले पूरक होतो, जवळजवळ २ वर्षे एकत्र तयारी केली होती. कॅनडा आणि बांगलादेशसोबत काही मालिका खेळलो, जवळजवळ २ वर्षे एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने खेळलो आणि ६ महिने मैदानावर आणि मैदानाबाहेर एकत्र होतो.

**प्रश्न: या प्रवासात ज्या खेळाडूंशी तुमची मैत्री झाली अशा काही खेळाडूंची नावे तुम्ही घेऊ शकाल का? जे मूळचे भारतीय नाहीत?**

**सौरभ:** आरोन जोन्स, जो मूळचा भारतीय नाही, तो २०१९ मध्ये संघात सामील झाला आणि त्याने त्याचा खेळ कसा आक्रमक शैलीत बदलला ते प्रशंसनीय आहे.

**प्रश्न: टी-२० विश्वचषकात पाकिस्तानविरुद्धच्या सुपर ओव्हरबद्दल सांगू शकाल का? आणि सामन्यानंतर पाकिस्तानी खेळाडूंच्या प्रतिक्रिया काय होत्या?**

**सौरभ:** पाकिस्तानविरुद्ध सुपर ओव्हर pressure situation होती. जेव्हा मला सांगितले की मी सुपर ओव्हर टाकत आहे, तेव्हा मनात nervousness होता. पण काय करावे लागेल याचे नियोजन करायला सुरुवात केली, त्या खेळपट्टीवर ऑफ साईड लांब होती आणि लेग साईड लहान होती, त्यामुळे फलंदाजांना ऑफसाईडवर खेळवावे आणि वाईड यॉर्कर हाच प्लॅन होता आणि मी ते करण्याचा प्रयत्न केला, जे यशस्वी झाले.

**प्रश्न: पुढील १० वर्षांत अमेरिकन क्रिकेट कुठे असेल असे तुम्हाला वाटते?**

**सौरभ:** १० वर्षांबद्दल खात्री नाही पण पुढच्या ३ वर्षात खूप संधी आहेत, भारतात टी२० विश्वचषक, २०२७ मध्ये एकदिवसीय विश्वचषक आहे, सध्या आम्ही qualifiers खेळत आहोत आणि आतापर्यंत प्रथम स्थानावर आहोत. २०२७ मध्ये टी२० विश्वचषक आणि पुन्हा ऑलिंपिक. त्यामुळे मला आशा आहे की पुढील २-३ वर्षांत अमेरिकेचा संघ अधिक मजबूत होईल.

**प्रश्न: तुझ्या अनुभवावरून, अमेरिकेतील सध्याचे खेळाडू आणि प्रतिभा पाहता, वाटते का की अमेरिका कसोटी खेळणारा देश बनेल?**

**सौरभ:** अमेरिकेत कसोटी क्रिकेट किती असेल याबद्दल मला खात्री नाही, कारण त्या पातळीवर रणजी ट्रॉफीसारखे स्थानिक सर्किट असले पाहिजे. मला वाटते की अमेरिकेत क्रिकेटचा विस्तार करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे क्रिकेटचा सर्वात लहान फॉरमॅट T20 आहे.

**प्रश्न: इथे जन्मलेली मुले क्रिकेट परंपरा पुढे चालू ठेवतील असे तुला वाटते का?**

**सौरभ:** हो, नक्कीच. इथे जन्मलेली २-३ मुले अमेरिकेच्या राष्ट्रीय क्रिकेट संघात आहेत. संजय कृष्णमूर्ती हI त्यापैकी एक आहे.

**प्रश्न: सौरभ, कामाचा ताण नेहमीच असतो. तू काम आणि क्रिकेट यांचा balance कसा साधतोस?**

**सौरभ:** कामाचा ताण नेहमीच असतो पण जर काम चांगले असेल आणि आवडले असेल तर ते सोपे होते. मी एक डेव्हलपर आहे, मी कधीही कोडिंग करू शकतो. मी माझ्या meetings अशा प्रकारे संतुलित करण्याचा प्रयत्न करतो की त्यामुळे माझ्या क्रिकेट सरावावर परिणाम होणार नाही.

**प्रश्न: अमेरिकेत क्रिकेटचा विकास वाढविण्यासाठी कोणत्या सुधारणांची आवश्यकता आहे असे तुला वाटते?**

**सौरभ:** प्रत्येक झोनमध्ये २-३ चांगली क्रिकेट मैदान असली पाहिजेत, स्थानिक क्रिकेट सर्किट असले पाहिजेत. सध्या टी-२० क्रिकेटसाठी मायनर लीग आहे परंतु प्रत्येक state ची ५० षटकांची लीग असल्याने यूएसए क्रिकेट वाढण्यास मदत होईल.

**प्रश्न: तुला कोणत्या एक दोन फलंदाजांना बाद करायला आवडेल? तुमचा भारतीय आवडता गोलंदाज आणि एकंदरीत आवडता गोलंदाज कोण आहे?**

**सौरभ:** जर मला एखाद्या फलंदाजाचे नाव घ्यायचे असेल तर ते सूर्यकुमार यादव असेल कारण तो माझा मित्र आहे. आवडता भारतीय गोलंदाज झहीर खान एकंदरीत आवडता गोलंदाज ग्लेन मॅकग्राथ.

**प्रश्न: Stress management साठी तू योगा किंवा काही करतोस का?**

**सौरभ:** मी खेळतो कारण मला खेळ आवडतो आणि मला त्यापासून अपेक्षा नसतात. त्यामुळे मला खेळादरम्यान ताण येत नाही आणि खेळाचा आनंद घ्यायला आवडतो.

**प्रश्न: आम्हाला माहित आहे की तू खूप छान गातोस, आवडता गायक कोण आहे? तुला कोणत्या प्रकारची गाणी आवडतात?**

**सौरभ:** लहानपणी मला सोनू निगम आवडायचा. आता शंकर महादेवन आणि हरिहरन. अलिकडे मी कृष्णा दास यांचे कीर्तन ऐकतो जे एक अमेरिकन गायक आहेत, फ्यूजन देखील ऐकतो.

**प्रश्न: तुझे आवडते गाणे कोणते आहे?**

**सौरभ:** मन उधाण वाऱ्याचे

**प्रश्न: बॉलीवूड आणि हॉलिवूडमधील तुझा आवडता अभिनेता/अभिनेत्री कोण आहे?**

**सौरभ:** हॉलीवुडमधील आवडता अभिनेता - बेनेडिक्ट कंबरबॅच. बॉलीवूडचा शाहरुख खान. बॉलिवूडमधील आवडती अभिनेत्री आलिया भट्ट.

सौरभ, तुझ्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढल्याबद्दल आणि तुझ्या प्रेरणादायी प्रवासाबद्दल आमच्याशी बोलल्याबद्दल खूप खूप धन्यवाद. पुढील स्पर्धा आणि विश्वचषकासाठी खूप खूप शुभेच्छा.

- **मुलाखतकार: तुषार वेदांती,** चेस्टर स्प्रिंग्स, पेनसिल्व्हेनिया आणि **अनिता म. कांत** (वृत्त-टीम)

## सण सोहोळ्यांची मांदियाळी

चैत्रपालवी लेऊन सजले नव वर्षाचे तोरण दारी |
वैशाखाची अक्षय्यतृतीया आरंभाचा मुहूर्त भारी ||
सावित्रीला मिळे सत्यवान जेष्ठातल्या वट पौर्णिमेला |
आषाढीला प्रचंड दाटे भक्तीपूर जो वैष्णवमेळा ||
श्रावणमासी अष्टमीला कृष्ण जन्मला धर्म प्रभाकर |
राजवस्त्र जो विसरून वाटे सुदाम्याची अर्धी भाकर ||
साहित्याची करा तयारी पूजा आणिक नैवेद्याची |
भाद्रपदाची चतुर्थी आली घेऊन स्वारी आराध्याची ||
शक्तीपीठ जे महाराष्ट्राचे सप्तशृंगीच्या वसे गडावर |
अश्विनातल्या नवरात्रीला आदीशक्तीचा होतो जागर ||
कोजागिरीला उमलून लाभे चंद्रकोरीला पूर्ण शांतता |
दीपावलीच्या लक्ष दिव्यांनी अश्विन मासी होई सांगता ||
जणू भाऊबीज आणी पाडवा आनंदाची कार्तिक वारी |
नात्यामधल्या प्रेमाची हो या दिवसांची रंगत न्यारी ||
मार्गशीर्ष जो मंगल महिना दत्त गुरूंचे होऊ परायण |
पौषामधल्या संक्रांतीला सूर्याचे हो उत्तर आयन ||
माघा मधल्या शिवरात्रीला शिवशक्तीची करू प्रार्थना |
फाल्गुनातल्या होळीसंगे नष्ट होऊ दे दुष्ट वासना ||
सण सोहोळे करू साजरे पूर्ण वर्ष मग अभिमानाने |
अभिजात मराठी जगात मिरवू मिळुन सारे प्राणपणाने ||

- **राहुल घाणेकर,** प्लेन्सबोरो, न्यू जर्सी

## सुहाना सफर
## 'Exotic Scandinavia'

एक चांगला प्रवास संपला तरी त्याच्या छान आठवणी कायमच तुमच्यासोबत दरवळत राहतात. असाच एक प्रवास - एकटीनेच (अपवादात्मकच..) काही जवळच्या फॅमिली फ्रेंड्स बरोबर करायचा योग अलीकडेच आला – 'Exotic Scandinavia' – ११ दिवसांची ५ देशांची - डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, फिनलंड आणि एस्टोनिया सफर!

आम्ही सर्कन्डिनाव्हियन एअरलाईन्सने कोपनहेगन, डेन्मार्क येथे पोचलो. आमचा टूर ऑपरेटर - वरुण (त्याच्यामुळे पूर्ण टूर मध्ये वरुण देवाचीही कृपादृष्टी आमच्यावर राहिली..) तेथेच आम्हाला भेटला, अतिशय चांगला आणि हेल्पफुल होता. आमचा ३६ जणांचा युएसए मधून ॲरिझोना, टेक्सास, न्यूयॉर्क, न्यूजर्सी, पेन्सिल्वेनिया, कनेक्टिकट आणि कॅनडा येथून आलेल्यांचा ग्रुप होता. लंच करून आम्ही ६ जणं भटकायला बाहेर पडलो. रोझेनबोर्ग कॅसल जेथे डॅनिश मुकुटातील ज्वेल्स ठेवलेले आहेत, तो बघून सिटी सेंटरला भटकंती केली. तेथे एका दुकानाच्या बाहेर रोबोटिक डॉग बरोबर शेकहॅन्ड करायला मिळाला हा एक मजेशीर अनुभव होता.

कोपनहेगन - डेन्मार्कची राजधानी; हे ऐतिहासिक सुंदर शहर आहे. कॅनाल्स, हार्बर आणि वेगवेगळ्या रंगांच्या रंगसंगती असलेल्या बिल्डींग्स बघून डोळे सुखावतात. येथे सरकार सायकल चालवण्यास उत्तेजन देते. जगातील आनंदी शहरांच्या लिस्ट मध्ये कोपनहेगनचा वरचा क्रमांक आहे.



दोन दिवसात आम्ही काही जगप्रसिद्ध ठिकाणांना भेटी दिल्या - १७ व्या शतकात बांधलेले ऐतिहासिक बंदर - न्याहाव्न (Nyhavn), कॅनॉल मधून फेरीबोटीतील फेरी, ख्रिस्टाईनबोर्ग (Christiansborg) पॅलेस - जिथे डॅनिश पार्लमेंट बसते आणि रॉयल फॅमिली राहते; अमलईनबोर्ग पॅलेस – रॉयल फॅमिलीचे थंडीच्या सीझनमधील निवासस्थान – येथे रोज 'गार्ड बदलणे ' समारंभ होतो; हार्बर वरील 'द लिटल मरमेड' ही एक प्रसिद्ध कांस्य मूर्ती, जी लेखक हान्स क्रिश्चियन अँडरसन यांच्या १८३७ मधील प्रसिद्ध परीकथेवर आधारित आहे, ती डेनमार्कच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक मानली जाते.

वर्ल्ड फेमस अप्रतिम टिवोली (Tivoli) गार्डन्स - जगातील सर्वात जुने पहिले मनोरंजन उद्यान आहे, ज्यांच्यापासून डिस्नी नि प्रेरणा घेऊन डिस्नी पार्क्स बनवले. इतक्या वेगवेगळ्या प्रकारची फुलझाडे कलात्मकतेने सुंदर फुलवली आहेत कि बघूनच डोळ्यांचे पारणे फिटते.



येथून प्लेनने आम्ही बर्जेन (Bergen) नॉर्वेला - "लँड ऑफ मिडनाईट सन" गेलो, तेथे रात्री १०.३० पर्यंत सूर्यप्रकाश अनुभवला. वर्षातील जवळ जवळ २५० दिवस येथे पाऊस पडतो. आम्ही तेथे ज्या अति प्राचीन हॉटेल मध्ये राहिलो ते बघून मला जुन्या हिंदी भयपटांची - 'बीस साल बाद', 'महल', 'वह कौन थी' - ची आठवण आली. सकाळी आमचे खोलीचे दारच उघडेना आणि क्षणभर भीतीच वाटली. अखेर दार उघडण्यास मदत घ्यावी लागली आणि एकदाची आमची सुटका झाली. बर्जेन सिटी गाइडेड टूर मध्ये आम्ही यूनेस्को वर्ल्ड हेरिटेज साइट ब्रिगेन व्हार्फ (Bryggen Wharf) हे प्राचीन व्यापारी बंदर बघितले, रंगीबेरंगी बिल्डिंगसच्या रांगा सुरेख दिसत होत्या. हे पूर्वी ट्रेडिंग सेंटर होते. येथे नैसर्गिक साधन संपत्ती - ऑइल आणि नैसर्गिक गॅसेसचा साठा मोठ्या प्रमाणावर आहे पण ते त्याची बाहेर विक्री करत नाहीत. हेल्थ केयर आणि शिक्षण - सर्वांना मोफत आहे.

माउंट फ्लोरियन फनीक्युलर राइड ही रेल्वे माउंटनच्या टॉपला आपल्याला नेते, जेथून बर्जेन आणि आसपासचं सुंदर रमणीय दृश्य दिसतं. "Norway in a Nutshell" ही एक प्रसिद्ध पर्यटन यात्रा बर्गन ते ओस्लो दूर ज्यामध्ये रेल्वे, बस आणि बोटीद्वारे नॉर्वेच्या सुंदर फ्योर्ड (Fjords), स्नो नि कव्हर केलेले पर्वत, धबधबे बघितले. फ्योर्ड म्हणजे ग्लॅशीअरचे पाणी डोंगरांना कापून तयार झालेले मोठे

जलाशय. 'हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तरुणांच्या मखमलीचे' - असे सजलेले डोंगर आणि मधून वाहणारे सुंदर नयनरम्य धबधबे! बोट राईड फ्लाम ह्या छोट्याश्या गावात संपली, तेथून आम्ही फ्लाम ट्रेन घेतली. फ्लाम जवळ अनेक शुज फॅक्टरी आहेत, तसेच नॉर्वेचा जगातील सर्वात जास्त लांबीचा १५.३ मैलांचा बोगदा येथून जवळच आहे.



कजोफोसीन (Kjofossin) धबधब्यावर पर्यटकांसाठी हुलद्राचे (स्कँडिनेव्हियन लोककथांमधील एक सुंदर वनदेवता, जी आपल्या मोहक गाण्याने आणि नृत्याने लोकांना आकर्षित करायची..) नृत्य सादर केले जाते. येथे ५ मिनिटे ट्रेन थांबते. "हरी ओम" गाण्याच्या पार्श्वभूमीवर मोठ्या सुंदर धबधब्याच्या बॅकग्राऊंड वर तिला लाल रंगाच्या ड्रेसमध्ये नाचताना बघून - असं वाटतं कि आपण बॉलीवूड मूवीतील सीनच बघत आहोत. फ्लाम ट्रेन हि जगातील एक सर्वात सुंदर ट्रेन राइड आहे. मिर्दाल (Myrdal) ला उतरून तेथून ट्रेनने आम्ही २ तासांनी ओस्लो - नॉर्वे ची राजधानी गाठली.

ऑस्लोला EU चे ग्रीन कॅपिटॉल अवॉर्ड मिळालेले आहे. हे जगातले एक सर्वात महागडे शहर आहे. नोबेल पीस अवॉर्ड हे ऑस्लोमधून जाहीर करतात. आम्ही ऑस्लो सिटी गाइडेड टूर मध्ये किंग हेरॉल्ड - रॉयल फॅमिली चा पॅलेस, प्रसिद्ध हॉलमनकोल्लेन स्की-जंप, तसेच गुस्ताव विगेलँड (Vigeland) ह्या जगप्रसिद्ध शिल्पकाराची कल्पनापूर्ती असलेले विगेलँड शिल्प उद्यान (Sculpture Park) ज्यात २०० हून अधिक शिल्पकृती आहेत; तेही पाहिले. प्रत्येक शिल्प मानवी भावना, नातेसंबंध आणि जीवनचक्राचे दर्शन घडवते. मला न्यूजर्सी च्या 'Grounds of sculptures' पार्क ची आठवण झाली. ऑस्लोला आम्ही प्रसिद्ध कार्ल जोहान स्ट्रीटला विंडो शॉपिंग केले.



ओस्लोहून स्टॉकहोम, स्वीडनला सात तासांच्या बस राइडमध्ये मस्तपैकी गाण्याच्या भेंड्या, मजेशीर अनुभव - जोक्स सर्वांनी सांगितले. कार्ल स्टॅड या छोट्याशा गावामध्ये आम्हाला वेगवेगळ्या तऱ्हेचे चविष्ट गुर्मे इटालियन जेवण मिळाले. दिल खुश हुआ!

आमच्या रेस्टॉरंटच्या बाजूलाच छोटेसे टुमदार गाव, सुंदर चर्च, छोट्या नदीवर सुंदर लाकडी पूल आणि नदीत सुंदर कमळे फुललेली होती - ते सुंदर दृश्य बघून "जरा विसावू या वळणावर" म्हणत तिथेच एक फेरफटका मारला. तो नदीवरचा छोटासा सुंदर पूल बघून हॉलिवूड मूवी 'ब्रिजेस ऑफ मॅडिसन काउंटी' आठवला. दुसऱ्या दिवशी स्टोकहोल्मचं ओल्ड टाऊन गमला स्टॅन (Gamla Stan) हा ऐतिहासिक भाग - अरुंद दगडी रस्ते, रंगीबेरंगी जुन्या इमारती, रॉयल पॅलेस – स्वीडनच्या राजाचा राजवाडा, ऐतिहासिक चर्च, नोबेल संग्रहालय बघितले. प्रेस्टिजियस नोबेल अवॉर्ड्सची घोषणा नोबेल संग्रहालयात करतात, अवॉर्ड्स सेरेमोनी कॉन्सर्ट हॉलमध्ये होतो आणि विजेत्यांच्या सन्मानार्थ मेजवानी सिटी हॉल येथे होते. वासा संग्रहालय (Vasa Museum) हे एक प्रसिद्ध समुद्री संग्रहालय ज्यात जगातील एकमेव पूर्णपणे जतन केलेली १७व्या शतकातील युद्धनौका बघितली. EU देश एक महिन्याच्या समर ब्रेक वर असल्याने सर्वचजण आऊटडोअर मस्त एन्जॉय करत होते.

स्टॉकहोमहून आम्ही फेरी बोटीने हेलसिंकी, फिनलंड येथे पोहोचल्यावर गाइडेड सिटी टूर बसने केली. फिनलंडला "हॅप्पीएस्ट कंट्री इन द वर्ल्ड" अवॉर्ड आठ वेळा मिळालेला आहे, हे ऐकून आम्हालाही खूप "हॅप्पी" वाटलं. फिनलंड मध्ये शिक्षण मोफत आहे. डिलिव्हरी नंतर नवीन मातांना २ वर्षांची मॅटर्निटी लिव्ह मिळते. हेलसिंकीमध्ये फिनलँडिया हॉल, पार्लमेंट हाउस, रॉक चर्च आम्ही बघितले. फिन्निश खूप ब्लॅक कॉफी पितात; तिथे एक म्हण आहे - "Avoid coffee, it turns hair black!"

हेलसिंकीहुन आम्ही ओवरनाइट क्रूझ शिपने टॅलिन (Tallin), एस्टोनिया येथे पोचलो. "अरे ओये, निले गगन के तले"..खाली निळेशार पाणी, वरती निळं आकाश - क्रूझ वरून सुंदर सूर्यास्त दिसला. क्रूझशिप वर कराओके गाणारे गायक छान गात होते, त्यांना साथ देत आम्हीही डान्स केला. रात्री आम्ही एक संगीत-नृत्य शो पाहिला. हा आमच्या ट्रिप चा शेवटचा टप्पा! एस्टोनिया हा अत्यंत प्रगत देश आहे . तिथे बऱ्याच आयटी कंपन्या आहेत. स्काइप (skype) हे सॉफ्टवेअर येथे डेव्हलप केले गेले. बँक

सर्व्हिसेस, डॉक्युमेंटेशन मॅनेजमेंट सगळं काही ऑनलाइन आहे आणि रिमोटली मॅनेज करता येतं. टॅलिन हे छोटेसे सुंदर टाउन आहे, वॉकिंग टूरमध्ये आम्ही रशियन आर्किटेक्चरमध्ये १९१८ मध्ये बांधलेलं सुंदर चर्च, तेथील पार्लमेण्ट हाउस तसेच तेथील प्राईम मिनिस्टरचे घर बघितले. हे मेडिएवल टाउन हे अप्पर टाउन आणि लोअर टाउन अशा दोन भागात विभागलेले आहे. अप्पर टाउन, जिथे श्रीमंत लोक त्यांचे मॅन्शन बांधून राहायचे आणि लोअर टाउन जिथे लोअर क्लास हे लहान घरांमधून राहायचे. १२९९ मध्ये डॅनिश राजाने तर १३ व्या शतकात जर्मनांनी त्यांच्यावर राज्य केलं. येथील जुनिपर, लिनन, अंबर, मध, चॉकलेट्स हे प्रसिद्ध आहेत.



टॅलिनहुन हेलसिंकीला परतल्यावर आमची ट्रिप तिथे संपली. 'अभी ना जाओ छोडकर, के दिल अभी भरा नही' अशीच प्रत्येकाची मनस्थिती होती.. हि "सोलो" ट्रिप एकटीनेच करण्याचा आनंद आगळाच होता. माझी जवळची मैत्रीण माझी रूममेट होती आणि आम्ही दोघीनींही खूप मजा केली.

काही मजेशीर गोष्टी प्रवासात घडल्या - रोज वेगळ्या हॉटेल्स मध्ये राहिल्यानेही असेल, पण आम्ही दोघी एकदा नव्हे तर चक्क दोनदा आमच्या खोलीचा नंबरच विसरलो; पहिल्या वेळेस की-कार्ड कव्हर पण खोलीमध्येच राहिले.. आम्ही २-३ रूम्स चेक केल्या आणि नंतर आमच्या टूर ऑपरेटरला कॉल करून आमच्या खोलीचा नंबर विचारला. दुसया वेळेस मात्र पुन्हा टूर ऑपरेटर ला विचारायची लाज वाटायला लागली, पण नशिबाने की-कार्ड कव्हर पर्स मध्ये मिळाले आणि रूम एकदाची बरोब्बर मिळाली. आमची हसून हसून पुरेवाट झाली.

आमचा ग्रुप फारच छान होता. त्यामुळे, आमची सफर खूपच "सुहानी" झाली. आता, मी आमच्या पुढच्या ट्रिप ची वाट पहाते आहे..

- **शुभदा सावरगावकर**, हिल्सबोरो, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## ग्रंथ तुमच्या दारी, ग्रंथसंपदा घरोघरी



एका अपघाताने एक मोठी विश्वव्यापी साहित्य वाचन चळवळ साऱ्या विश्वाला मिळाली. संकटाला संधी समजणाऱ्या, कुसुमाग्रज प्रतिष्ठान नाशिकच्या एका ध्येयवेड्या संकल्पकाने आलेल्या संकटावर मात करत अशीच एक संधी शोधली. त्या संकल्पकाचं नाव **'विनायक रानडे'** आणि त्या संकल्पनेचं नाव **'ग्रंथ तुमच्या दारी'**.

२००९ या वर्षात विनायक रानडे यांना जीवघेणा अपघात झाला. हात आणि पाय जायबंदी झाले. अनेकवेळा शस्त्रक्रिया झाल्या. जवळपास दीड वर्ष बिछान्यावर पडून, छताशी हितगुज करत राहावं लागलं. स्वतःशी संवाद साधायला भरपूर वेळ मिळाला. त्या स्वगतातून एक धागा गवसला आणि एका अभिनव कल्पनेचा जन्म झाला.

या नवकल्पनेनुसार विनायक रानडे यांनी वाढदिवसाच्या दिवशी किमान एका पुस्तकाची रक्कम देणगी स्वरूपात देण्याचं आवाहन त्यांच्या समस्त स्नेहीजनांना केलं. प्रयोजन एकच ते म्हणजे मराठी वाचन संस्कृती वृद्धिंगत व्हावी. मग एका मुहूर्तावर कुसुमाग्रज स्मारक येथे ग्रंथ वाचनालय सुरु केलं.

अपेक्षेपेक्षा कमी प्रतिसाद मिळाला मग दुसऱ्या अभिनव संकल्पनेने जन्म घेतला फिरतं वाचनालय. कारण वाचक वाचनालयापर्यंत जात नाही ते मूळ तीन कारणांमुळे - वय, वेळ, अंतर. मग वाचक ग्रंथांपर्यंत नसेल जात तर ग्रंथांनी वाचकाच्या दारी गेलं तर? विनायक रानडे यांची हीच ती सुप्रसिद्ध "ग्रंथ तुमच्या दारी"ची मध्यवर्ती संकल्पना.

पुढील टप्पा म्हणजे वाढदिवस, एकसष्ठी, पंच्याहत्तरी, सहस्त्र चंद्र दर्शन तसेच दिवंगत आप्तेष्टांच्या स्मरणार्थ अशा अनेक प्रसंगी विनायक रानडे यांनी केलेल्या आवाहनाला सक्रिय प्रतिसाद मिळत गेला आणि पुस्तक पेटी या संकल्पनेला मूर्त स्वरूप मिळालं. १०० पुस्तकांची एक पेटी. किमान ३५ वाचक जिथे आहेत अशा ठिकाणी ग्रंथपेटी पोहचवली. असंख्य मराठी वाचकांना त्यांच्या निवासी भागात, कार्यालयात, दवाखान्यात, कारखाने, पोलीस स्टेशन, आदिवासी पाडे, वस्त्या, खेडी अशा वाचकांच्या जवळपासच्या भागात वाचनासाठी विनामोबदला विनासायास या ग्रंथपेट्या उपलब्ध होत आहेत. अगदी वृद्धाश्रमातील जेष्ठ आणि कारागृहातील कैदी देखील ग्रंथ वाचनाचा

आस्वाद घेत आहेत. आज चार कोटी किमतीची एक लाख पुस्तकं, दोन हजार ग्रंथपेट्यातून, ३५००० वाचकांपर्यंत पोहचली आहेत. या लाखभर पुस्तकांच्या माध्यमातून ६५०० लेखक आणि ९०० प्रकाशक यात जोडले गेले असून भारतभर म्हणजे महाराष्ट्र, गोवा, गुजराथ, दिल्ली, सिल्व्हासा, तामिळनाडू, कर्नाटक आदी राज्यात आणि भारताबाहेर अठरा देशात ग्रंथ तुमच्या दारीची व्याप्ती वाढली आहे.

या अठरा देशात खालील देश आणि प्रदेश समाविष्ट आहेत

- युएई - दुबई
- ऑस्ट्रेलिया - मेलबर्न , ब्रिस्बेन
- कॅनडा - टोरंटो , एडमंटन
- लंडन
- स्वित्झर्लंड - झुरीक
- अमेरिका – **कॅलिफोर्निया** - सॅनफ्रान्सिस्को, **टेक्सास** - ह्युस्टन, डल्लास, **ऍरिझोना** - फिनिक्स, **जॉर्जिया** – अटलांटा, फ्लोरिडा, **पेनेसेल्व्हेनिया** - फिलाडेल्फिया, न्यू जर्सी, मिनिसोटा, वॉशिंग्टन डी सी
- नेदरलँड
- जपान - टोकियो
- नॉर्वे
- सिंगापूर
- ओमान - सोहार , मस्कत
- मॉरिशस
- फिनलँड
- श्रीलंका

**भारताबाहेरील** आपल्या मराठी वाचक बांधवांसाठी या संकल्पनेचे स्वरूप थोडक्यात असे असेल -

- दर्जेदार विविध विषयांची, लेखकांची २५ पुस्तकांची एक पेटी असेल, ज्यामध्ये उत्तमोत्तम, निवडक मराठी अथवा इतर भाषांतील साहित्याचा मराठीत अनुवाद असलेली पुस्तके असतील. सहित्याचे, लेखनशैलीचे जास्तीत जास्त नमुने जसे कथा, कादंबरी, विनोदी, रहस्य, चरित्र, प्रवासवर्णन . .

थोडक्यात सर्व समावेशक ग्रंथ संपदा देण्याचा आमचा आटोकाट प्रयत्न असेल.

- ग्रंथ संपदा वाचनासाठी मासिक किंवा वार्षिक वर्गणी नसेल.
- सहभागी होण्यासाठी फक्त एकदाच देणगी मूल्य आवश्यक आहे
- एका वाचक कुटुंबाकडे सदर ग्रंथ पेटी ३ महिन्यांच्या कालावधी साठी असेल.
- योजना सुरु करताना किमान ८ वाचक कुटुंब सहभागी व्हावेत
- प्रत्येक ग्रंथ पेटीतील पुस्तके वेगवेगळी असतील.

कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या निवड समिती मार्फत प्रत्येक पेटीत वैविध्यपूर्ण तसेच कोणतेही पुस्तक दुसऱ्या पेटीत सारखे होणार नाही याची दक्षता घेतली जाते .

- दर ३ महिन्यांनी ग्रंथ पेटीची सहभागी कुटुंबात अदलाबदल केली जाते
- योजनेच्या उपयुक्तता तसेच नाविन्यामुळे वाचकांच्या सक्रिय सहभागाने विस्तार सुरु राहतो. कालांतराने नवीन वाचक जोडत गेल्याने ग्रंथ पेट्या वाढत जातात, असा विस्तार होत असतांना योजनेतील प्रत्येक वाचकाला अविरत वैविध्यपूर्ण वाचनाचा आनंद घेता येतो .
- नवीन देशात किंवा परिसरात आपण *समन्वयक* म्हणून पुढाकार घेऊन सक्रिय मदत करू शकता अथवा वाचक सभासद म्हणून सहभागी होऊ शकतात

या योजनेची समांतर पायरी म्हणजे ग्रंथ तुमच्या दारी- बाल विभाग, बोलकी पुस्तक पेटी, इंग्रजी विभाग, हिंदी विभाग, माझं ग्रंथालय - २५ पुस्तकांची वैयक्तिक पेटी अशा या ग्रंथ तुमच्या दारी वटवृक्षाला फुटलेल्या पारंब्या आहेत. जगभरात आज मराठी माणूस नाही अशी भूमी नाही म्हणजेच ग्रंथ तुमच्या दारी योजनेच्या भरारीला आता आकाशाला गवसणी घालण्यास कोणतीच बंधने नाहीत. जिथे मराठी शब्द, मराठी भाषा आहे, मराठी माणूस आहे तिथे ग्रंथ तुमच्या दारी योजना जावी अशी विनायक रानडे यांचा मनोदय आहे. एका छोट्याशा कल्पनेला आज जो प्रचंड प्रतिसाद मिळत आहे तो उत्तरोत्तर वाढावा हीच त्यांची सदिच्छा आहे. ग्रंथ तुमच्या दारी योजनेतील सहभागी सर्व वाचक, समन्वयक, संस्था, देणगीदार, हितचिंतक यांच्या सक्रिय सहभागानेच हा विस्तार होत आहे, या सर्वांचे आभार !

\- **संजय कंक**, समन्वयक, ग्रंथ तुमच्या दारी, नाशिक, महाराष्ट्र




## मुलाखत: श्री. अमित उपाध्ये



**पार्श्वभूमी** : फिनिक्स, अरिझोना येथील सुप्रसिद्ध आर्किटेक्ट श्री. अमित उपाध्ये यांच्याशी स्थापत्यशास्त्रातील त्यांच्या अनुभवांविषयी केलेली एक बातचीत.

अमितनी १९९२ साली सरदार पटेल विद्यापीठ, गुजरात इथून 'बी आर्च' (Bachelor of Architect) ची डिग्री मिळवली. नंतर ३/४ वर्ष सिंगापुरमध्ये Singapore Art Center मध्ये architecture designing चे काम संपवून १९९७ साली ते अमेरिकेत आले. भारतीय संस्कृतीच्या वारश्याबरोबर, Louis Kahn आणि Le Corbusier यांचा जबरदस्त प्रभाव अमितवर आहे. अमेरिकेत आल्यावर आर्किटेक्चर कॉलेजमध्ये शिकवत असताना त्यांनी डिझाइन्समध्ये बरेच नवीन प्रयोग केले.

**प्रश्न - भारतात जन्म आणि सुरुवातीचे वर्ष गेल्याचा तुमच्या आर्किटेक्चरवर काय परिणाम झाला ?**

**उत्तर** - भारतीय संस्कृती खूप प्राचीन आहे. मुघलांपासून युरोपियन राजवटीपर्यंत अनेक सत्तांतरे भारताने बघितली आणि त्याचा परिणाम तेथील सर्व प्रकारच्या जीवनावर झाला. मी अहमदाबाद सारख्या गजबजलेल्या शहरात वाढलो, जेथे जुन्या इमारतींनी माझे लक्ष वेधून घेतले आणि आपण आर्किटेक्ट व्हावे असे माझ्या मनात येऊ लागले. अहमदाबाद ही लुई कान, लॉ कार्बुझर आणि चार्ल्स एम्स यासारख्या आर्किटेक्चर मधील महान गुरूंची भूमी. त्याचप्रमाणे माझ्या आईच्या माहेरचा सासवडचा सरदार पुरंदरे यांचा भव्य वाडा आणि संगमेश्वर देऊळ हाही वास्तू शिल्पकलेचा उत्तम नमुना आहे. या सगळ्याचा माझ्या मनावर नकळत परिणाम होत गेला; त्यामुळे माझ्या कामातून या ऐतिहासिक गोष्टींची ठसठशीत छाप पडलेली दिसते. आर्किटेक्चर म्हणजे नुसते रेघांचे डिझाईन नसून त्यातून काहीतरी खोल अर्थ प्रतिबिंबित करणारी ती एक कला आहे. ती बघताना, अनुभवताना आपण कोणत्यातरी वेगळ्या विश्वात जाणारा अनुभव घेतला तर त्याचे खरे सार्थक आहे असे मला वाटते.

**प्रश्न - तुमची मूळ मूल्ये आणि तुमच्या दृष्टीने आर्किटेक्चर म्हणजे काय ?**

**उत्तर** - आर्किटेक्चर हा पवित्र, गुरु शिष्य परंपरा जोपासणारा आणि थोर व्यवसाय आहे. केवळ पैशाच्या मागे न धावता या व्यवसायाकडे गांभीर्याने बघण्याची गरज आहे. यामध्ये कधी मला यश मिळाले तर काही वेळेला बराच खडतर काळही आला. पण माझे गुरु श्री अनंत राजे यांच्या मूल्यांना धक्का लागेल असे काम माझ्या हातून कधीच झाले नाही. ती मूल्ये तशीच अबाधित राहिली. भावनांचे प्रामाणिक प्रतिबिंब माझ्या कामात तुम्हाला दिसेल. आर्किटेक्चर मध्ये कशाची उधळपट्टी किती केली याला महत्त्व नाही, तर त्यात आत्मा किती आहे हे महत्त्वाचे आहे.

भारतासारख्या सूर्यपुजक संस्कृतीतून शिकवण मिळाल्यामुळे त्याचे प्रतिबिंब माझ्या कामात दिसते. माझ्या देशाच्या संस्कृतीत सूर्य-पृथ्वीचे नाते वडील-मुलीचे आहे. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. माझ्या डिझाईन्स मध्ये सूर्याबरोबरचा संवाद तुम्हाला नेहमी आढळेल. त्याच्या अस्तित्वाचा नेहमी मी आदर केलेला आहे. १९८९ मध्ये IIM अहमदाबाद येथे काम करत असताना मी विषुववृत्तावरच्या मोढेरा सूर्य मंदिराला सप्टेंबर २२ (विषुव दिवस) ला भेट दिली होती. सकाळी तेथील सूर्योदयाच्या वेळी मी अक्षांश वर उगवणाऱ्या सूर्याला १२ सूर्यनमस्कार घातले. ते क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय होते. जर आपण नीट ऐकले तर सूर्य आपल्याला आर्किटेक्चर फॉर्मबद्दल सतत काहीतरी सांगत असतो, असे मला जाणवले. या सगळ्याचा एकत्रित परिणाम होऊन माझ्या कामात एक वेगळेपण आणि जिवंतपणा येतो असे मला वाटते.

**प्रश्न: ह्या सगळ्याचा प्रभाव आणि त्याचा उपयोग तुम्ही या काळातल्या स्थापत्यशास्त्रात कसा करत आहात?**

**उत्तर** - Essence of the Desert House - माझ्यावर असलेले जन्मभूमीचे संस्कार आणि कर्मभूमीने दिलेले अनुभव याचा संगम आहे. याची संकल्पना फोजेनिक्सच्या Pinnacle Peak या डोंगरावर मी चढत असताना एकमेकांवर रेलून असलेले प्रचंड मोठे खडक आणि त्यांच्या फटींमधून डोकावलेली मनोहारी फुले बघितली आणि विचार आला की कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी निसर्ग बहरतो, ह्या अलौकिक घटनेतून घर कसे बांधता येईल?

मी कल्पना केली की असे घर बांधतो की त्यात राहणाऱ्याचे असेच मोठे अमूर्त खडक उन्हापासून संरक्षण करत आहेत. आणि या कल्पनेतून या घराचा जन्म झाला. उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून पश्चिमेकडे भिंत केली पण सूर्य म्हणाला की, या घराने अतिशय

देखण्या सूर्यास्ताकडे पाठ फिरवली आहे. मग त्यासाठी काय करावे या विचारातून पुढचे तपशील सुचले. जणू काही सूर्य आणि आजूबाजूच्या वाळवंटाशी संवाद साधत हे घर उभे राहिले. शिवाय त्यात राहणाऱ्याला घर ‘आपलेसे’ वाटावे असेही काही वैशिष्ट्यपूर्ण पैलू या घरात आहेत. पश्चिमेकडच्या भिंतीत मुद्दाम बनवलेली खाच अशा प्रकारे बनवली की सूर्यास्त बरोबर त्यांच्या लग्नाच्या वाढदिवसाला होतो. मग वाटले की सूर्योदय तितकाच महत्वाचा आहे. घराच्या पूर्वेकडे मॅकडॉवेल पर्वतरांग आहे. त्याच्या उंचीच्या अनुषंगाने सूर्योदयाचा मार्ग कसा असतो याचा अभ्यास केला. काळजीपूर्वक मोजमाप करून आम्ही cast-in-place concrete ची खिडकी तयार केली.

ती अशा जागेवर बसवली की त्याच दिवशी सकाळी ७ वाजता काही मिनिटांसाठी त्यातून प्रकाश येतो आणि स्वयंपाकघरातून दिसणाऱ्या अर्धपारदर्शक खिडकीवर पडतो. असा हा ऊनसावलीचा क्षणिक खेळ मनात कायमचे घर करून राहतो. हे आपल्या आयुष्याचेही प्रतीक आहे. निसर्गातले दिनक्रम आणि आपले आयुष्यातले महत्वाचे क्षण याची सांगड घालण्याचा प्रयत्न मी माझ्या वास्तुकलेतून केला आहे.

सूर्याची आपल्या रोजच्या जीवनातली उपयोगिता तर महत्वाची आहेच, पण त्याच्या अवतीभोवतीची काव्यात्मकताही मला तितकीच आकर्षित करते. म्हणूनच या घरात सूर्यप्रकाश लग्नाचा वाढदिवस साजरा करतो, आणि त्याचबरोबर घराला सौरऊर्जेचतून ऊर्जाही देतो. माझ्यासाठी वास्तुकला म्हणजे ‘यिन आणि यांग’ हा समतोल आहे.

Louis Kahn म्हणाले होते—“Architecture comes from the immeasurable into the measurable through material, and delivers an immeasurable experience.”

हे वाक्य माझ्यासाठी खूपच प्रेरणादायी आहे. माझ्या प्रत्येक कामात माझी ही प्रामाणिक तळमळ असते. मी नुसती इमारत बांधत नाही तर अशी एक जागा निर्माण करतो की त्या जागेत वावरणाऱ्याला चार भिंतीच्या सीमा पार करून काही वेगळी अनुभूतीही देईल.



ET Project : हे घर ज्यांच्यासाठी बांधायचे होते ते इथल्या स्टेट युनिव्हर्सिटीत प्राध्यापक आणि शिवाय NASA च्या एका महत्वाच्या Mission चे सल्लागार आहेत हे समजले. मला लहानपणापासूनच खगोलशास्त्राची आवड. हे सगळे ऐकल्यावर माझ्यातल्या त्या बाजूने स्थापत्यविशारदाला कल्पना द्यायला सुरुवात केली. लहानपणी मिळेल तो टेलिस्कोप घेऊन बघितलेले आकाशातले ग्रह-तारे आणि त्यांच्या प्रतिमा डोळ्यासमोर तरळू लागल्या. ते सगळे घराच्या आराखड्यात कसे आणता येईल याचा मला ध्यास लागला. आणि त्यातून ह्या घरासाठी मी जे काम केले त्याचा जन्म झाला.

या घराला नेमक्या अंशाच्या कोनात असलेली एक ओरिएल आणि एक मॉनिटर खिडकी तयार केली. त्यातली मॉनिटर खिडकी थेट ध्रुवताऱ्याकडे निर्देशित करते. ध्रुवताऱ्यापासून येणारा प्रकाश त्या खिडकीद्वारे घरात अगदी स्नानगृहात जातो. जणू तो घराच्या अंतरंगाला स्पर्श करतो. त्याच स्नानगृहात एक अर्धपारदर्शक काचेचा बाक अशा रीतीने ठेवला आहे की त्यावर सकाळचा सूर्यप्रकाश पडतो आणि तो उजळून निघतो. जणू काही गोलाकार सूर्यास तो बाक चौकोनी रूपात बद्ध करतो. ओरिएल खिडकी सूर्याचा उगवतीचा-मावळतीचा प्रकाश स्नानगृहात आणते पण त्याचबरोबर प्रायव्हसीही अबाधित राखते.

याच घरात मागच्या अंगणात अजून एक अतिथिगृहही करायचे होते. मी अशी कल्पना केली की मूळ घराशेजारी एक परग्रहीय वस्तू उतरली आहे. मूळ घरापेक्षा वेगळे साहित्य वापरून हे बांधले असल्याने तशी कल्पना करणे सहज शक्य होते.

या अतिथिगृहाची दक्षिणेकडील भिंत कॉंक्रिटची आहे ती प्रखर उन्हापासून संरक्षण करते. पण त्याच भिंतीला मी काव्यात्मक रूप देण्याचाही प्रयत्न केला आहे. सप्तर्षी नक्षत्रांच्या मांडणीसारखी असलेली सात गोलाकार छिद्रे बनवली आणि इथल्या वाळवंटात येणाऱ्या निवडुंगाच्या फुलांच्या रंगाच्या काचेने झाकली. छिद्रे बाहेरून उघडी असल्याने त्यात पक्षी-कीटक घरटी बांधू शकतात. त्यामुळे जणू काही ही भिंत जिवंत होते. घरात असलेल्या या विविध पैलूंनी हे आजूबाजूचा वाळवंटी परिसर, अवकाशातले नक्षत्र-तारे आणि त्यातल्या रहिवाश्यांचे दैनंदिन जीवन यांचा संगम बनले आहे.

Bars and Bridges House हा अजून बांधकाम सुरु असलेला प्रकल्प आहे. या घराची संकल्पना Sonoran वाळवंटात फ्लॅश फ्लड लोंढ्यापासून आली. मी जेव्हा ही जागा बघायला गेलो तेव्हा त्यातल्या पाण्याला स्पर्श करावा असे तीव्रतेने वाटले. आणि तेंव्हाच मी ठरवले की आपण या भावनेला मूर्त स्वरूपात आणू शकतो ते इथे बांधल्या जाणाऱ्या घरातून. हे घर असे डिझाइन केले आहे की ते या जमिनीवरून जाणाऱ्या झऱ्याच्या दोन काठावर पुलासारखे उभे आहे. अरिझोनातल्या बऱ्याच हायकिंग ट्रेल्सवर असे झरे आहेत.

त्यावरून जाताना मी अनेकदा पडलेल्या झाडांवरून ते पार केले आहेत. त्याच अनुभवातून मी या घराची बैठकीची खोली अशी बनवली आहे की ती या ओढ्यावर येते. या खोलीची जमीन काचेची असल्याने पाऊस पडला की खालून वाहणारा ओढा सहजी दिसतो.
या डिझाइनमध्ये वाळवंटाचे सौंदर्य आणि घराची कार्यक्षमता या दोन्हींचा समतोल आहे. दक्षिणेकडील बाजू तीव्र सूर्यप्रकाश अडवते, तर धातूच्या आवरणाखालील जागा गरम होऊन stack effect तयार करते. गरम हवा बाहेर फेकते आणि थंड हवा wash मधून आत खेचते, त्यामुळे उष्णता कमी होते. या घरातही बऱ्याच बारीकसारीक गोष्टींचा विचार केलेला आहे.

या माझ्या कामामध्ये मला बारीसारीक तपशीलांकडे लक्ष द्यायला नुसते आवडतेच नव्हे तर तसे करण्याचा मला ध्यास असतो. हे असे तपशील कुठल्याही प्रमाणात किंवा आकारमानात मोजता येत नाहीत. पृथ्वी हा सौरमालेचा तपशील आहे, आणि सौरमाला ही आकाशगंगेचा तपशील आहे. वास्तुकलाही तशीच आहे. यात अगदी छोट्यात छोट्या ते मोठ्यात मोठ्या गोष्टींकडे समग्र लक्ष द्यावे लागते. इमारत-घर यांचा मुख्य आराखडा ते त्यातल्या खिडकीमधला अगदी लहानगा खिळा ह्या सगळ्याला एकसारखे महत्व आहे. या प्रक्रियेत प्रत्येक घटक, साहित्य अतिशय काळजीपूर्वक निवडलेला असते जेणेकरून ते सगळे एकत्र येऊन जी निर्मिती होईल ती संतुलित आणि भवतालाशी प्रामाणिक असेल.

**- मुलाखतकार: शिल्पा केळकर, फिनिक्स, ॲरिझोना, अस्मिता केळकर, सांगली, महाराष्ट्र**




## आरिगातो जपान!



जपानला आयुष्यात कधी दुसऱ्यांदा ट्रिपसाठी जाण्याची वेळ येईल असं मला सांगूनही खरं वाटलं नसतं. पण सुदैवाने तशी संधी जून २०२५ मध्ये मिळाली. त्याला महत्त्वाचं कारण ठरलं की ह्या वेळेस आमच्या दोघांच्याही आई-बाबांना आमच्याबरोबर घेऊन जायचं. त्यांचा होकार आल्यावर अतिशय उत्साहात आमचं नियोजन सुरु झालं. आमच्या मुलीसकट आमची ७ जणांची टीम असल्यामुळे आणि त्यातले ३ जण वयाने ७५ वर्षांपेक्षा जास्त असल्याने ट्रिपची ठिकाणं, खाणंपिणं आणि प्रवासावर खूपच बंधनं आली होती. तसंच दुसऱ्यांदा जात असल्यामुळे आम्हालाही काही नवीन गोष्टी नक्कीच बघायच्या होत्या.

तोक्योमध्ये पोचल्यावर पहिल्यांदा जपानचा राजा मेइजी आणि राणी शोकेन ह्यांच्या स्मरणार्थ बांधलेल्या मेइजी जिंगू समाधीला भेट दिली. १७० एकरच्या परिसरात, १ लाखाच्या वर घनदाट झाडांनी नटलेल्या जंगलात ही सुंदर समाधी आहे. गर्द झाडांच्या शीतल छायेतून चालत जात असताना अरण्यस्नानाचा अनुभव घेतला. त्याने मन खूप प्रफुल्लित झालं, प्रवासाचा शीण कुठल्याकुठे निघून गेला आणि आमची ट्रिप खूप यशस्वी होणार आहे ह्याची खात्री पटली.

त्यांनतर शिंजुकू येथे जाऊन मेट्रोपॉलिटन बिल्डिंगच्या ४५ व्या मजल्यावरून खूपच विलोभनीय अशा तोक्यो शहराचं चहूबाजूंनी दर्शन घेतलं. सर्वत्र इमारती खूप दाटीवाटीनं असल्या तरी शहर खूप आधुनिक वाटतं, इमारती आखीवरेखीव आहेत व शहरातली स्वच्छता वाखाणण्यासारखी आहे. शिंजुकू हा भागही शॉपिंगसाठी प्रसिद्ध आहे. सर्व मंडळी दमल्यामुळे लगेच गिंझा येथे जाऊन जेवायचा बेत केला. तेथील रेस्टॉरंटमध्ये आम्ही ऑर्डर दिल्यावर चक्क एक रोबो आमचे पदार्थ घेऊन आमच्या टेबलापाशी आला. आम्हा सगळ्यांसाठीच हा एक अनोखा अनुभव होता. खूप भूक लागलेली असतानाही आम्ही

सगळे त्याचे फोटो आणि व्हिडिओ काढण्यात रमलो. गिंझा हा भाग लक्झरी ब्रॅण्ड्सच्या दुकानांसाठी प्रसिद्ध आहे. तिथे काही वेळ भटकंती आणि खरेदी केल्यावर आम्ही आसाकुसा येथील प्रसिद्ध सेन्सोजी मंदिर बघायला गेलो. मंदिराच्या रस्त्यावर दुतर्फा जपानी खाद्यपदार्थांची आणि भेटवस्तूंची दुकानं तुडुंब गर्दीने भरलेली होती. खूप पर्यटक स्त्रिया हौशीने पारंपारिक किमोनो घालून हे मंदिर बघायला आलेल्या होत्या. प्रवेशद्वारावरच्या भव्य कंदिलाच्या खाली ग्रुप फोटो आवश्यकच होता.

एका दिवसाच्या प्रवासातून तोक्योच्या प्रचंड व्याप्ती असलेल्या रेल्वेच्या जाळ्याची सर्वांनाच भुरळ पडली होती. नवलाईची गोष्ट म्हणजे तोक्यो शहरात एकूण ८८२ स्टेशनं आहेत. प्रत्येक स्टेशनवर उंचच उंच सरकते जिने, वेगवेगळ्या भुयारी मजल्यांवरचे चकाचक प्लॅटफॉर्म्स, तितक्याच देखण्या ट्रेन्स आणि सर्वांवर कडी म्हणजे हा अवाढव्य कारभार अतिशय शिस्तीत आणि सुरळीत. कुठेही गोंधळ नाही की काही गडबड नाही. सर्वत्र मशीनद्वारे होणाऱ्या इंग्रजीतल्या मुबलक घोषणा आणि पर्यटकपूरक सूचना. युरोपपेक्षाही जपानमध्ये पर्यटकांची जास्त काळजी घेतलेली आढळून येते. जपानी येत नसल्यामुळे अडलं आहे असं आमचं कुठेच झालं नाही.

आता सर्वांनाच प्रतीक्षा होती ती शिंकानसेनमधून प्रवास करण्याची. दुसऱ्याच दिवशी तोक्योपासून ओसाकापर्यंत खूप विलक्षण असा बुलेटट्रेनचा प्रवास झाला. हा शिंकानसेनचा जपानमधील सर्वात व्यग्र मार्ग असून दिवसाला जवळपास १२० गाड्या तोक्यो ते ओसाका धावतात.

ओसाकाला पोचल्यावर लगेच प्रसिद्ध अशा ८ मजली उंच ओसाका कॅसलला भेट दिली. कॅसलवरची सोन्याची नक्षी खूपच आकर्षक होती. सध्या कॅसलचं एका म्युझियममध्ये रूपांतर करण्यात आलेलं आहे. आजूबाजूची घनदाट वनराई उन्हाळ्याच्या दिवसांत सर्व परिसरावर थंडगार हिरवी चादर पसरल्यासारखी दिसत होती. आठव्या मजल्यावरून ओसाका शहराचं विहंगम दर्शन झालं. जपानमध्ये असे १०० च्या वर कॅसल्स आहेत. रात्री बाहेर पडलो ते दोतोनबोरी ह्या गजबजलेल्या बाजारपेठेची सफर करण्यासाठी. इथल्या बिल्डींग्सवरच्या निऑन साईन्स खूप प्रसिद्ध आहेत. संपूर्ण बाजार आणि आजूबाजूचे सर्व रस्ते प्रचंड गर्दीने फुलून गेले होते. तितकीच गर्दी इथल्या नानाविध पदार्थांनी नटलेल्या, सीफूडसाठी प्रसिद्ध असलेल्या रेस्टॉरंट्समध्ये होती.

पुढच्या दिवशी आम्ही क्योतोचे किंकाकुजी हे सुवर्ण मंदिर बघायला गेलो. सोन्याच्या भिंती असलेलं हे मंदिर तिथल्या मनोहारी तळ्याच्या पार्श्वभूमीवर चकाकत होते. तळ्याच्या भोवती खूप छान जपानी मेपलची झाडं आहेत. बाजूचा ट्रेल एका सुंदर जपानी बागेची सफर घडवून आणतो. त्यानंतर गेइशा ह्या जपानी नर्तकींची गल्ली व तिथली आकर्षक घरं बघून क्योतोच्या बाजारपेठेतून एक फेरफटका मारला.

तिथून रेल्वेनेच नारा येथील तोदाइजीचे प्रसिद्ध बुद्ध मंदिर बघायला गेलो. येथे जगातली सर्वात उंच अशी बुद्धाची मूर्ती आहे. सगळ्यात उंच मूर्ती भारतात नसून जपानमध्ये आहे ह्याचं आश्चर्य वाटल्याखेरीज राहवलं नाही. ह्या मंदिराकडे जाताना रस्त्यात शेकड्याने हरणं दिसली ज्यांच्या बरोबर खेळण्यात खूप मजा आली. ही हरणं खूपच माणसाळलेली आहेत. आपण एकदा त्यांना काही खायला दिलं तर सारखी आपल्या मागे येत राहतात आणि आपली छान करमणूक करतात. इथले मोची स्वीट्स खूप प्रसिद्ध आहेत.

नंतरच्या दिवशी जवळजवळ २ तास रेल्वे आणि फेरीने प्रवास करून मियाजिमा ह्या निसर्गरम्य बेटाला भेट दिली. इथे पाण्यात खूप भव्य तोरी गेट आहे व त्याच्या किनाऱ्यावरच १२ व्या शतकात बांधलेली इत्सुकाशिमा ही शिंतो समाधी आहे. त्यानंतर दाइशोइन मंदिराला भेट दिली. थोड्याश्या पायऱ्या चढून गेल्यावर खूप प्रेक्षणीय मंदिरांचा परिसर आहे. इथे गणेश, सरस्वती आणि कुबेराच्या मूर्त्या आहेत. तसंच हजाराच्या वर अशा बुद्धाने दीक्षा दिलेल्या त्याच्या शिष्यांच्या वेगवेगळ्या भावभावनांमधील दगडातील मूर्त्या आहेत. आणखी पुढे हजार कंदिलांची आरास केलेलं एक सुंदर मंदिर आहे ज्याच्या आत जाऊन आपल्याला खूपच प्रसन्न व आल्हाददायक वाटतं. उदबत्तीचा दरवळणारा सुवास वातावरण भारून टाकतो.



ओसाका जवळच असलेल्या कोबे ह्या सुंदर शहरी पुढच्या दिवशी गेलो. इथे रोपवेने एका उंच डोंगरावर गेलो. तिथून कोबे शहर, दूरवर ओसाका बंदर व किनारपट्टीचं चित्ताकर्षक दृश्य दिसतं. संबंध परिसर हा इतक्या दाट झाडीने नटलेला आहे की आपण शहरात

आहोत ह्याचाही विसर पडावा. इथे खूप सुंदर अशी हर्ब गार्डन आहे. वेगवेगळ्या फुलांच्या, मसाल्याच्या आणि औषधी वनस्पतींच्या सुगंधाने आम्ही मोहरून गेलो.

ट्रिपच्या शेवटच्या दिवशी जवळपास ४ तास प्रवास करून आम्ही कीकात्सुराला गेलो. तिथपर्यंतचा रेल्वेचा प्रवास जपानच्या ग्रामीण भागातून झाला. सर्वत्र भाताची शेती व त्याला लागून असलेली टुमदार, आटोपशीर घरं नजरेस पडतात. उंच डोंगरांमधून गाडी जात राहते पण गच्च हिरवीगार झाडी आणि बांबूची वने कधीच आपली साथ सोडत नाहीत. ह्या सदाहरित निसर्गाचं कायम अप्रूप वाटत राहतं.

नाची इथे जपानमधील सर्वात उंचीवरून कोसळणारा धबधबा आहे. थोडंसं चढून गेल्यावर कामी हाचिमान ह्याची समाधी आहे. ह्या समाधीतील केशरी रंगाच्या पॅगोडाच्या बरोबर मागे कोसळणारा हा धबधबा हे एक विलोभनीय दृश्य आहे. इथूनच पुढे कुमानो नाची ताईशा, कुमानो होंगू ताईशा व कुमानो हायातामा ताईशा ह्या ३ प्रार्थनास्थळांचा ट्रेल सुरु होतो. इथला हिरवाकंच निसर्ग आम्ही पुरेपूर डोळ्यांत साठवून ठेवला.

जपानी लोकांचं आदरातिथ्य खूपच प्रशंसनीय आहे. परंपरा आणि निसर्गाविषयीचा आदर व कृतज्ञता कायम जाणवत राहते. सर्व देशातील स्वच्छता कौतुकास्पद आहे. ती इथल्या राष्ट्रीय अभिमानाची गोष्ट आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीविषयी आपण जाणतोच पण त्याचा उपयोग आधुनिक जगातील घसरणारी लोकसंख्या, वृद्धत्त्व, एकटेपणा ह्या सारख्या समस्यांवर मात करण्यासाठी केलेला दिसून येतो. शिंतो आणि झेन-बौद्ध धर्मांच्या तत्त्वज्ञानातून येणारी जीवनाविषयीच्या अपूर्णतेची, अनिश्चिततेची जाणीव अत्यल्प जीवनशैलीचा पुरस्कार करताना दिसून येते. आवर्जून उल्लेख करण्याजोग्या जपानमधल्या गंमतीशीर गोष्टी म्हणजे — कॅट कॅफे, नाविन्यपूर्ण संडास, ७११ ची मुबलक सुविधा-दुकाने, वेंडिंग मशीन्स, ॲनिमेची क्रेझ आणि मात्चा ग्रीनटीचे विविध खाद्यपदार्थ.

जपान सोडताना आमच्या सर्वांच्याच मनात एक नितांत सुंदर, निसर्गप्रेमी आणि प्रगतिशील असा देश बघितल्यामुळे विलक्षण आपुलकीची भावना होती ह्यात काहीच नवल नाही. ह्या सर्वांगसुंदर अनुभवाबद्दल जपानी लोकांना त्यांच्याच भाषेत म्हणावसं वाटतं 'आरिगातो'!

**- अमित भावे,** गार्डन ग्रोव्ह, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

संकल्पना : गौतम पंगू    रेखाटन: शीतल रांगणेकर




## आनंदाचे देणे

सर्व वाचकांना दीपावली आणि नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...आपणास सुख, शांती, समाधान, समृद्धी, यश, ऐश्वर्य, आनंद आणि निरामय आरोग्य लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

दिवाळीत वसुबारस ते भाऊबीज अशा विविध सणसमारंभाची रेलचेल असते. सगळीकडे आनंदी आनंद असतो. दिवाळी जवळ आली की आपण आवर्जून घरात साफसफाई आणि सजावट करतो. आकर्षक वस्तूंनी, फुलांनी अथवा रांगोळी काढून घर सजवतो. नवीन कपडे, दागदागिने घालतो. घरात गोडाधोडाचे पदार्थ बनवतो. पणत्या, कंदीलने घर प्रकाशमान करतो. सर्वांसाठी भेटवस्तू आणतो. दिवाळी हा आनंदाचा सण आहे पण सणाचे चार दिवस संपले की हा उत्साह आणि आनंद ओसरतो. आनंद साजरा करण्यासाठी मग आपल्याला पुन्हा पुढच्या वर्षी येणाऱ्या दिवाळीचे वेध लागतात. हा आनंद तात्पुरता असतो कारण माणसाला आनंदाची दिवाळी

आयुष्यभर साजरी कशी करायची ते माहीत नाही. आनंदाची दिवाळी आपल्या सर्वांना सतत साजरी करता यावी यासाठीच 'आनंदाचे देणे' हा लेखप्रपंच...

रामदास स्वामींचा एक छान उपदेश आहे, "केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे" याच धर्तीवर मला असं सांगावसं वाटतं की "दिल्याने येत आहे रे, आधी दिलेचि पाहिजे". जर तुम्हाला जीवनात आनंदी व्हायचं असेल तर तुम्हाला इतरांना आनंद देता यायला हवा. आता तुम्ही म्हणाल की, इतरांना आनंद देण्यासाठी आधी तो आमच्याकडे असायला हवा? वास्तविक इतरांना आनंद देण्यासाठी फार काही करावं लागत नाही. साधं स्मितहास्य देऊनही आपण इतरांना आनंदी करु शकतो. पण दुर्दैवाने आज एकमेकांकडे पाहून साधं हसणंही खूप दुर्मिळ झालं आहे. याला कारण माणूस फक्त स्वतःपुरता विचार करतो. ज्यामुळे 'देण्यातला आनंद' तो हरवून बसतो.

आपली संस्कृती आणि सणसमारंभ आपल्याला प्रतिकरुपाने आनंदच द्यायला शिकवितात. आपणही ही संस्कृती जपण्यासाठी इतरांना काही ना काही देत असतो. जसं की दिवाळीला कंपनीचे मालक कामगारांना बोनस देतात. नातेवाईक एकमेककांना भेटवस्तू देतात. लग्नसमारंभ, बारसे, वाढदिवस अशा मंगलप्रसंगीही आपण आप्तेष्टांना आहेर देतो. पण बऱ्याचदा हे देणं व्यावहारिक स्वरुपाचं असतं. कोणीतरी आपल्याला काहीतरी दिलं आहे म्हणून त्याची परतफेड करण्यासाठी त्याच तोलामोलाचं देण्याचा आपला अट्टाहास असतो. ज्यामुळे देण्यातला आनंद बऱ्याचदा बाजूला राहतो.

निसर्गनियमानुसार देणं हे नेहमी आनंदासाठी असायला हवं. देताना सर्वात महत्त्वाचा असतो तुमच्या मनातील भाव. तुम्ही इतरांना किती आणि कसं देता यापेक्षाही देताना तुमच्या मनात काय भावना आहेत हे खूप महत्त्वाचं आहे. इतरांना एखादी गोष्ट देताना त्याच्याबद्दल प्रेम आणि कृतज्ञता असेल तर ते प्रेम आणि तो भाव त्या व्यक्तीपर्यंत सहज पोहचतो. ज्यामुळे ती गोष्ट घेताना घेणाऱ्यालाही मनापासून आनंद होतो. जीवन जगताना अनेकांचे आपल्याला सहकार्य लाभत असते त्यामुळे त्यांना काहीतरी देणं हे आपले कर्तव्यच आहे असा भाव म्हणजे कृतज्ञता. म्हणून देताना कधीही मी श्रेष्ठ तो कनिष्ठ असा भाव नसावा. आपल्यापेक्षा कमी किंवा हाताखालच्या लोकांबद्दलही कृतज्ञता भाव असेल तर त्या देण्यातला आनंद अवर्णनीय ठरतो.

त्याचप्रमाणे एखादी गोष्ट देताना जर तुमच्या मनात मला परमेश्वराने मुबलक (Abundance) दिलं आहे, त्यामुळे मी इतरांना हा आनंद देऊ शकतो अशी भावना जर मनात असेल तर त्यातून तुमच्या मनाची व्यापकता वाढत जाते. अशा भावातून जेव्हा तुम्ही इतरांना काहीही देता तेव्हा तुमच्या मनात सहज ऐश्वर्याचा, समृद्धीचा, विपुलतेचा भाव निर्माण होतो. जेव्हा आपल्या मनात "आहे" हा भाव असतो तेव्हा निसर्गनियमानुसार तुमच्याकडे जे आहे ते आणखी दामदुपट्टीने वाढत जाते. दिल्याने कोणतीच गोष्ट कधी कमी पडत नाही उलट वाढत जाते. देणे हा निसर्गाचाच नियम आहे. देण्याने तुमची देण्याची क्षमता वाढते. यातून तुम्ही मनाने आणि पैशाने दोन्ही बाजूने अधिक श्रीमंत होता. एवढंच नाही तुमच्या मनात देण्याची फक्त इच्छा जरी निर्माण झाली तरी निसर्गनियमानुसार तुमची देण्याची क्षमता वाढू शकते. कारण देण्याच्या भावामुळे त्यासाठी लागणाऱ्या गोष्टींची व्यवस्था निसर्गनियमानुसार आपोआप होत जाते.

पण आज आपण पाहतो की, माणसाचे मन संकुचित आणि स्वार्थी झालं आहे. प्रत्येकजण फक्त मी, माझं अणि मला यांच्यामध्ये गुंतलेला आहे. याचा परिणाम असा होतो की आज माणूस इतरांवर सोडाच पण साधं स्वतःच्या भावडांवरही विश्वास ठेवत नाही. भावडांशी प्रेमाने, आनंदाने वागत नाही. भावाभावांमध्ये प्रॉपर्टीवरून वाद चाललेले दिसतात. आज जास्तीतजास्त तंटेबखेडे, कोर्टच्या केसेस या वडिलोपार्जित प्रॉपर्टीवरुन होताना दिसतात. कोणीच कोणाला काही द्यायला तयार नाही. विशेष म्हणजे आईवडील जिवंत असताना हीच भावंडे त्यांची जबाबदारी एकमेकांवर ढकलतात. आईवडिलांनंतर प्रॉपर्टीच्या हक्कासाठी मात्र पहिले उभे राहतात. अशा वेळी कोणी असा विचार करत नाही की, अरे हा तर माझा भाऊच आहे किंवा ही तर माझी बहीण आहे. त्यांची परिस्थिती बरी नसेल तर त्यांना थोडेसं माझ्यापेक्षा जास्त दिलं तर काय बिघडलं. माझ्याकडे भरपूर आहे तेव्हा आता त्यांना थोडं मिळू दे असा मनाचा मोठेपणा कोणीच दाखवत नाही. प्रत्येक जण आपल्याला जास्तीतजास्त वाटा कसा मिळेल याचा विचार करताना दिसतो. त्यामुळे होतं काय? कोणीच कधी सुखी होत नाही आणि कुटुंबातील वादविवाद अधिक वाढत जातात. पण याउलट जेव्हा तुम्ही मनाचा मोठेपणा दाखवता आणि इतरांचा विचार करता. तेव्हा मात्र तुमचं व्यापक झालेलं मनच तुमच्या आयुष्यात सुखसमृद्धीची बरसात करु लागतं. कारण जेव्हा तुम्ही इतरांचा विचार करता तेव्हा इतरही तुमचा विचार करायला लागतात. सहाजिकच एकमेकांचा विचार केल्याने एकमेकांच्या सहकार्यातून सर्वांच्या जीवनात सुख, शांती, यश आणि आनंद निर्माण होतो.

इतरांना आनंद देण्यासाठी आधी तुम्हाला तुमचं मन मोठं करता यायला हवं. मन मोठं करायचं म्हणजे मनाचा संकुचितपणा सोडून मनाला व्यापक करायचं. यासाठी तुमच्याकडे जे जे काही आहे त्यातील थोडंसं इतरांना द्यायचं. आपली संस्कृती पण आपल्याला हेच शिकवते. निसर्गातील पंचमहाभूतेही आपल्याला देण्याची शिकवण देतात. सूर्य प्रकाशरुपाने, नदी जलरुपाने, पृथ्वी धान्यरुपाने, वायु श्वासरुपाने, आकाश वर्षारुपाने आपल्याला सतत देतच असतात. जर पंचमहाभूते, ग्रहतारे, निसर्ग नसतील तर माणसाचे सृष्टीमध्ये अस्तित्वच राहणार नाही. माणूस ही या निसर्गाचा एक भाग आहे. सहाजिकच जे नियम निसर्गाला लागू आहेत तेच नियम माणसालाही लागू आहेत. म्हणून माणसाने निसर्गनियमांनुसार जीवन जगायला हवं. निसर्गाप्रमाणे माणसानेही नेहमी इतरांना आनंदच द्यायला हवा. यासाठीच जीवनात जे जे शक्य ते अवश्य इतरांना द्या. समृद्ध व्हा आणि खऱ्या अर्थाने आनंदाची दिवाळी यंदा साजरी करा!!!

- **प्रल्हाद वामनराव पै,** आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




## कौन आया घरमे , छप्पर फाडके ..?

नवीन वर्षाची सुरवात होती. New year Resolution अर्थात जिम जाणे पुनः सुरु केले. घरी परतले तर लिविंग रूमच्या सीलिंग मध्ये भोक आढळले. जवळ गेले तर प्राण्याचा पाय अडकला असावा असे भासले आणि मी जोरात किंचाळले ! पण मी घरी एकटीच होते.

आनंदने परीक्षण केले प्राणी नाही, बहुतेक घरटे दिसते... दोन दिवसांनी ते भोक अधिक मोठे भासले. आजूबाजूचे प्लास्टर निखळून, कार्पेटवर पसरले होते.

काही दिवसांनी पाऊस झाला आणि टप टप पाणी गळू लागले. आजूबाजूला अजून भोके तयार झाली. आता मात्र आढ्याकडे बघत बसण्यात अर्थ नव्हता. पेस्ट कंट्रोल कंपनीला Attic inspection साठी estimate घेण्यास बोलाविले.

त्याने भोके बघून उंदीर, घुशी असे प्राणी अशी भोके करू शकतात असे सांगितले. मग उंदीर अशा भोकातून रात्री उड्या मारून घरभर हिंडून येतात आणि भिंतीवर पुन्हा Attic मध्ये जातात. असे रंजक किस्से सांगितले. पण कॉन्ट्रॅक्ट Sign केल्या शिवाय Attic चे दार उघडून तो बघणार नव्हता. “My wife is not home, she takes financial decisions, I will follow up” असे म्हणून आनंदने, त्याची सांगता केली.

आनंद कडून हे सारे ऐकल्यावर माझी तर झोप हरवली. सारखे स्वप्नात उंदीर दिसत होते. पाऊस आला की भोकांखाली बादली ठेवा, बादली भरली की रिकामी करा आणि वरचेवर कार्पेटवर धुळीसाठी vacuum फिरवा असा दिनक्रम सुरु झाला.

Critical thinking सामोचाराने करून, होम owners insurance ला फोन केला. त्यांना क्रमवार घटना सांगितल्या. फोटो पाठवले. इन्शुरन्स एजन्टने शांतपणे Roof Replacement चे quotes घ्या असा प्रेमळ सल्ला दिला. आता रूफरचे estimates घेणे सुरु केले. घर घेतल्यापासून पहिलीच रूफ रिप्लेसमेंट होती. आम्ही नवखे आहोत असे बघून २५-३० हजारापर्यंत quotes दिले गेले. Roof कव्हर्स, rafters , asphalt की मेटल roof , त्याची वॉरंटी, कलर्स, होम style विश्लेषण करून अंदाजपत्रक केले.

2-3 estimates बघून जवळपासच्या गल्लीतील यार्ड वरच्या signs बघून, Google Reviews वाचून नावाजलेल्या Roofer ची निवड केली. आम्ही पसंत केलेले रंग आणि साहित्य निवडून बर्फाळ हवामानाचा अंदाज घेऊन urgent प्रोजेक्ट असला तरी मार्चमध्ये करू असे ठरले. त्यात अनेक वर्ष आमच्या घराच्या छतावर सोलर पॅनेल्स उभारले होते. ते आधी सोलर पॅनल कंपनी कडून उतरून घेण्याचा सल्ला रूफर्सने दिला. आम्ही पॅनेल्स काढू शकणार नाही असे ठाम सांगितले.

अनेक जुने इमेल्स, फाइल्स मधील कागद हुडकून सोलर कंपनीशी संपर्क साधला. आम्ही इतर कामात व्यस्त आहोत ३ आठवडयांनी येऊ आमचे सोलर पॅनल उतरवायचे आणि परत लावायचे चार्जेस ऍडव्हान्समध्ये दिले की तारीख निश्चित करतो असे उत्तर मिळाले. भरीस भर अजून $५००० खर्च वाढला.

भल्या सकाळी सोलर इन्स्पेक्टर छतावर शिडीवरून चढला. एक एक Solar पॅनल अलगद उतरवत, फ्रंट यार्ड वरील गवतावर ठेवत होता. एके ठिकाणी त्याला छतावर एका सोलर पॅनल खाली मोठा खोल खड्डा दिसला. त्यावर काड्या आणि पालापाचोळा पसरला होता. त्याने पटकन त्याचे छायाचित्र काढले आणि मला फोनवर text केले शीर्षक दिले इंडस्ट्रियल squirrels. त्या खड्ड्याची जागा आणि घरातील छताची गळती एकाच ठिकाणी होती आणि...



मला गतवर्षीचा उन्हाळा आठवला...

आमच्या Dining रूम मधील टेबलावर मी लॅपटॉप घेऊन दुपारच्या वेळी work from home करायचे. Patio च्या दारातून बॅकयार्ड, patio मधील झाडे, फुले बघत काम करायला उत्साह वाटे. तेव्हा दररोज छतावर अनेक खारी सोलर पॅनेल्सवर वावरत असत. पळत असत. त्याचा जोरात रूम मध्ये आवाज येत असे. २-३ वेळा आनंदलाही तो आवाज ऐकवला होता. जाऊ देत ग लक्ष नको देऊ, खारी एकमेकींशी खेळत आहेत, मजा करत आहेत, असे म्हणून सोडून दिले.. दुर्लक्ष झाले...

तुम्हालाही बॅकयार्ड मधील खारीचा उपद्रव काही नवीन नाही. नवीन कुंडीत अथवा raised garden बेड वर लावलेली इवलुशी रोपे तुडवत खारी उगीच जमीन उकरून बियाणं शोधत बागेत हिंडत असतात. कधी सरसर मोठ्या झाडांवर किंवा कुंपणावर चढतात आणि क्षणात उडी मारून जमीनवर येतात. कधी शांत बसत नाहीत. अश्या खारी आमच्या छतावर मोठा खड्डा करून स्वतःसाठी थंडीतील घराची सोय करत आहेत असे कधी स्वप्नातही वाटले नाही. किती ती हुशारी .. सोलर पॅनेल्सच्या आधारे, ऊन पाऊस , बर्फापासून बचाव करेल अशी जागा हेरली. त्यांचा लिविंग एरिया वाढवणात त्या दंग होत्या. रूफ बदलायला घेतले नसते तर प्रत्येक सोलर पॅनल खाली एकूण १५ असे खड्डे त्यांनी खणले असते आणि एअर बी अँड बी सारखे आसपासच्या खारींना हवेशीर अद्ययावत घरे भाड्याने दिली असती अथवा बार्टर सिस्टिम करून विकली असती.

तुम्हाला खड्डा बघण्यात उत्सुकता असेल तर मला ई-मेल करा, मी तुम्हाला ती छायाचित्रे नक्की पाठवीन!

या नवीन उपद्रवाने रूफ रिप्लेसमेंट प्रोजेक्टमध्ये अधिक खर्चाची भर पडली. सोलर कंपनीने ऍनिमल गार्ड, एक जाळी रुपी गार्ड प्रत्येक सोलर पॅनलची मच्छरदाणी म्हणा हवी तर, करून घ्या असे सुचवले. ज्यामुळे खारी, उंदीर, घुशी असे प्राणी त्याच्या खाली घर करणार नाहीत. अर्थात नो वॉरंटी नशीब अपना अपना !

थंडी संपून पुन्हा उन्हाळा आला..नवीन कौलांनी, घराला energy efficient केले. ऊन, पाऊस, वारा, बर्फ़ आणि खारी पासून आता आमचा बचाव करत आहेत. सारे कसे, शांत शांत ... या मेल्या खारीच्या उपद्रवाने छप्पर तर फाडले पण खिसाही कापला ...

माझ्या मराठीच्या शब्दकोशात खारीने तिला खारूताई म्हणण्याचा मान कायमचा गमावला आहेच पण कुठल्याही मणभर अथवा तीळभर कामगिरीचा "खारीचा वाटा" म्हणून मी कदापि उल्लेख करणार नाही, ही खारीच्या शेपटीची शप्पथ !

**- अश्विनी चौथाई,** एडिसन, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका







Scan the QR code to Register Now →

Or Register: https://forms.gle/1Fw8Qsvr3K27dzq9A

***Proud to Be Marathi. Bold Enough to Build Wealth Together.***

**Introducing the Global Marathi Investor Group (GMIG)**

(Sponsored By)

FICON
LAB+FUND

Use Venture / PE to create generational wealth
Learn how seasoned Marathi professionals build startups

**FICON LAB+FUND – A startup ecosystem builder**

Delivering … What investors want. What founders need. What markets demand.
Explore our story at https://www.ficonlabfund.com

## मोतियाचे क्षण

बृहन्महाराष्ट्र मंडळाचा **'नातवंडांसोबतचे आठवणीतले क्षण'** हा आजी आजोबांसाठी सुचवलेला विषय अगदी जिव्हाळ्याचा आहे. ज्या कोणी सुचवलं असेल त्यांचे मन:पूर्वक आभार. आमच्या आठवणीतील बऱ्याच अनुभवांपैकी दोन खास क्षण खाली देत आहोत.

"आमची दोन नातवंडे (अर्धी गोरी) मोठी नात आणि तिच्यापेक्षा दोन वर्षांनी लहान नातू. ५ वर्षाचा असताना नातवाचा हजरजबाबीपणा: त्याने एकदा कात्रीने कागद कापून कार्पेटवर कपटे केले होते. मी त्याला म्हटले, तुझं आटोपलं की ते तुकडे गोळा करून कचऱ्याच्या कॅनमध्ये टाकून दे. त्यावर तो मला विचारतो: तुमच्याकडे व्हॅक्युम क्लीनर नाही आहे का ?

तसेच एकदा मी त्याला मस्करीत म्हटलं: निखिल, तुला आजीशी मराठी बोलायला शिकायला पाहिजे, तिला इंग्लिश येत नाही. त्यावर ताबडतोब उत्तर: You can translate to her.

नातीनेही माझ्या ८० व्या वाढदिवसाच्या वेळी छान भाषण केलं आणि स्वत: सुंदर Greeting कार्ड बनवलं. नातीने आमच्या दोघांची सुरेख पेन्सिल स्केचेस बनवून दोघांच्या वाढदिवसाला भेट दिली,

या आठवणी कायम लक्षात रहाण्यासारख्या आहेत.

- **प्रमोद आणि आरती तेंडुलकर,** फ्रीमोंट, कॅलिफोर्निया

माझी नात म्हणायला सातव्या महिन्यात झालेली. अपुऱ्या दिवसांची, परंतु ज्या क्षणी तिने माझ्याकडे पाहिले त्या क्षणी तिच्या निळ्याशार डोळ्यांनी मनाचा ठाव घेतला. तिचे डोळे म्हणजे जणू १००० कॅंडल पॉवरचे दिवे. तिने कुणाहीकडे बघावे आणि ती व्यक्ती पूर्णपणे विरघळून गेली नाही असं कधी झालंच नाही. बोलणे, चालणे, सगळ्याची घाई. लहानपणापासूनच हजरजबाबी. मोठा भाऊ पुस्तक वाचतो आहे हे पाहून आपण ही पुस्तक हातात घेऊन वाचायला सुरुवात केली. भाऊ म्हणाला तुला कुठे वाचता येते आहे? लगेच बाईसाहेबांचे उत्तर तयार. मला चित्र छान वाचता येतात आणि पुस्तक धरून वाचायला सुरवात. आईने सांगितलेली गोष्ट तशीच्या तशी 'वाचून' काढली आणि विजयी नजरेने भावाकडे पाहिले.

एकदा भाऊ अभ्यास करत होता. आजीने तिला शांत बसायला सांगितलले. लगेच बाईसाहेबांचा प्रश्न, तो अभ्यास करतो आहे आहे तर मी का शांत बसायला हवे? आजी म्हणाली "भाऊ अभ्यास करील, मोठा होईल, खूप पैसे मिळवेल आणि तुला छान फ्रॉक घेऊन येईल म्हणून शांत रहा" बाईसाहेबांचे ताबडतोब उत्तर "त्याच्यापेक्षा मीच वाचून मोठी होईन आणि माझ्यासाठी खूप खूप फ्रॉक आणीन."

मी तिची दुसरी आजी, रंगाने सावळी तिने घरात काळे, गोरे हे शब्द ऐकले होते. एक दिवस ती माझ्या हातावर बसली होती. नेहमीप्रमाणे बडबड चालू. काही क्षण माझ्याकडे निरखून बघत प्रश्न केला."आजी तू काळी आहेस ना?" मी म्हटले "होय". दुसरा प्रश्न "मी गोरी आहे ना?" पुन्हा माझे होकारार्थी उत्तर. थोडावेळ बाईसाहेब विचारात मग्न. मग माझ्या गळ्यात हात घालून म्हणते कशी "मी मोठी झाल्यावर तुझ्यासारखी काळी होणार आहे". तो प्रेमाने ओथंबलेला क्षण हृदयाच्या कोपऱ्यात आजही जपलेलाआहे.

असे मोतीयाचे क्षण आयुष्य सोन्याचे करून जातात. म्हणूनच नातवंडे हवी असतात.

- **डॉ. विजया बापट,** राले, नॉर्थ कॅरोलायना

## AbbasStories.com

**अस्वीकृती:** ही एक काल्पनिक गोष्ट आहे. कुणाच्याही नावाशी, व्यक्तिमत्वाशी किंवा ठिकाणाशी साधर्म्य आढळल्यास तो केवळ योगायोग समजावा. आणि हो, त्याला मी जबाबदार नाही!

जेव्हा मी निवृत्त झालो, तेव्हा मनात एकच कल्पना - आता एकदम शांत जीवन जगायचं! पण खरं तर एक पोकळीच निर्माण झाली होती. दशकानुदशकं एक अत्यंत जबाबदारीचं काम, आणि त्याचबरोबर एक समाजसेवी संस्था... आता अचानक भरपूर मोकळा वेळ.

दरम्यान, माझी बायको, म्हणजेच 'आजी', तिचं स्वतंत्र साम्राज्य अगदी नेटकेपणानं चालवत होती. सहा नातवंडं आणि दोन नात, कुत्री असा तिचा संसार जोरात चालू होता. त्यातून उन्हाळ्यात 'Aaji Camp' म्हणजे Day Camp संपल्यावर सगळी नातवंडं आमच्याकडे—खेळायला, खाण्यासाठी, भांडायला, आणि झोपायला यायची! एक दिवस मी ऐकलं— "Next time when we meet at Aaji's house..."

Aaji's house? अरे, मी मी इतकी वर्षं mortgage भरत आलो.. हे घर 'आजीचं' कधी झालं? पण खरं सांगायचं तर,

मला आजीचा हेवा वाटला. आता मी ठरवलं ही सारी नातवंडं जिंकायचीच.

प्रयत्नाची सुरुवात केली प्रिया पासून—आमची सगळ्यात मोठी नात. Sophomore in college. Quiet, thoughtful, polite.

"प्रिया," मी म्हटलं, "Math is my soul, my religion, my business. तुला मी मदत करू का?"

ती हसली. "Oh Abba, that's beautiful. पण... Math is not really my thing."

"मग काय शिकणार आहेस?"

"Art history," ती म्हणाली. "That's a real major?" मी विचारलं.

"हो! लोकांनी निर्माण केलेल्या गोष्टींमधून — चित्रं, वास्तुकला, शिल्पं — इतिहास समजून घेणं म्हणजेच हे. लोक काय मानत होते, काय विश्वास ठेवत होते, हे जाणून घ्यायचं असेल तर त्यांच्या कलेकडे पाहा. And Abba, in your Wall-Street language—art is big business! They auction it, trade it, donate it, and insure it. Some of us even hunt down missing artifacts!"

खरं तर मला तिचं कौतुक वाटलं पण हा प्रयत्न मात्र फसला.

माझा मुलगा New York ला Battery Park City मध्ये राह्तो. एका संध्याकाळी आम्ही त्याच्याकडे गेलो होतो. त्याची मुलं, अमिता आणि अरुण soccer खेळून आले. त्यांना खूप भूक लागली होती. पण सारखे game विषयी बोलत होते. मला कल्पना सुचली: मी जर त्यांच्या match ला गेलो, त्यांना cheer up केलं तर कदाचित मी आजीपेक्षाही cool समजला जाईन.



मग मी गेलो- train नं New York ला मग subway नं Downtown! त्यांचं मैदान होतं West Street च्या पलीकडे. आजूबाजूला सगळ्या काच आणि सिमेंटच्या उंच इमारती! ते मला बघताच धावत आले. "Abba! You came all the way to watch us?" "Of course," मी म्हटले.

मॅच सुरू झाली. मी जरा concentrate केलं. They kicked the ball—with their feet. आणि तरी त्याला "Soccer" म्हणतात. मी ठरवलं: 'आपल्या मुलांनी score केल्याबरोबर जोरात टाळ्या वाजवायच्या. कोण काही का म्हणेनात!' पण ९० मिनिटांत फक्त पाच गोल. म्हणजे माझ्या नातवंडांनी score करायची probability: १% पेक्षा कमी. तरीदेखील मी जमेल तेव्हा (कधीकधी नको तेव्हा) cheer करत होतो. मॅच संपल्यावर ते परत धावत आले "Good night, Abba."

गेम नंतर मुलं जरा दमली होती. खरं तर मीच जास्त दमलो होतो. पूर्वी असं commute, long hours - सारं काही सोपं वाटायचं ! पण आता मी retired आहे. जरा दमानं घ्यायला हवं. म्हणून हा soccer match ला जाण्याचा उपक्रम सोडावा लागला.

म्हणून पुढच्याकडे वळलो—तेजस. म्हणे तेजू ! अगदी हुशार मुलगा ! सारखा video -games मध्ये डोकं खुपसून असतो. म्हणजे बोलणं शक्यच नाही. एकदा मी आमच्या गावाच्या library मध्ये गेलो होतो. तिथं children's section मध्ये खूपसे computers होते. कितीतरी video games सुद्धा होते. मी विचार केला, 'तेजुला इथं आणलं तर?'

तो घरी आला तेव्हा मी विचारलं—"Would you like to visit our library? They have cool games."

"Sure," तो म्हणाला. गेम सुरू. एक red sports car घेऊन डावीकडे, उजवीकडे! पण कधीही धड रस्त्यावर नाही. आणि अचानक—Bang! झाडाला धडक.

"Teju," मी म्हणालो, "can't you keep the car on the road?"

"Abba, what do you expect from me? I don't even have a driver's license!"

That's it. माझं Teju chapter तिथेच संपलं.

उरला किरण—my last hope. Older, wiser, gentle. मी काही tricks न वापरता, शांतपणे बोललो, “Can I talk to about something?”

"Abba," तो म्हणाला, "I know what you're doing. You're retired, trying to bond with us... and that's sweet. But I'm 14. And right now, the only connections I'm trying to make... are with girls."

तो हसला. Sheepishly. "You were 14 once too, right?"

आता मात्र मी हरलो. कदाचित आजीच्या mango-lassi मुळेच ती सगळी तिच्यावर खुश असतील!

शेवटी उरला तो बो—बोधिन. वय फक्त आठ. त्याच्याशी काय बोलणार?

एक दिवस मी study मध्ये काम करत होतो. तो माझ्या पाठीमागून आला आणि खांद्यावर हात ठेवून म्हणाला, "Abba, believe me. I understand. You’re a little lonely, and you want to connect with us. But you’re a great storyteller. Why don’t you write a blog?"

"Blog म्हणजे काय?" मी विचारलं.

"Don’t worry. I’ll take care of it. You just write." मी ही गोष्ट लिहिली.

He created a domain: AbbasStories.com

मग त्यानं थोडेसे चमत्कारिक आणि खूपसं कुतूहल जागं करणारे प्रश्न विचारले—

"Whom would you like to tag?"

"What emotions are you evoking—humor, love, longing?"

"Is it for nostalgic Mumbai uncles, or global tech-savvy nanas?"

मग त्याने मला hashtags शिकवले—#AbbasLove #GrandkidChronicles #Indiangrandpa #मराठीअजोबा.

"Bo," मी विचारलं, "हे hashtags इतके महत्त्वाचे का?"

"Because Abba," तो म्हणाला, "the algorithm gods must notice you. Otherwise you’re just shouting into the wind."

दोन दिवसांत मला साऱ्या जगातून responses यायला लागले—San Francisco, Sydney, Canada आणि अर्थात मुंबई-पुणे.

Sydney तल्या गृहस्थांनी लिहिलं, "मी पण नातवाला तबला शिकवतो"

Canada तल्या आजींनी सांगितलं, “तुमचं नातवंडांशी फार चांगलं नातं आहे. मी पण माझ्या नातीबरोबर skiing ला जाते"
पुण्याच्या एका नेन्यांनी comment केली, "एकंदरीत तुमचं आजीवर खूप प्रेम दिसतंय "

मुंबईच्या मावशीने विचारलं, "तुमचं newsletter आहे का?"

सॅन फ्रान्सिस्कोचे मराठे म्हणाले ,"माझा नातू नाट्य संगीत शिकतो”

बो एकदम खुश झाला. “आता आपल्याला एकदम Viral व्हायचंय Abba. Even wisdom needs good packaging. Why don’t we make your Vlog?"
आता मी लिहितो. आणि बो ब्लॉगवर टाकतो.

टीप (P.S.)

आता आमच्याकडे एक नवीन नातू आलाय — सातवा, नाव ऋषी. वय फक्त दोन वर्षं, पण खूप बोलतो त्याच्या आजीशी. दररोज त्याची आजी व्हिडीओ कॉल करते. तो इतका दिलदार आहे कि काहीही खाताना तो share करतो. परवा मी ऐकलं, "Aaji, I will give you two cookies. One for you and one for Abba”

कधी कधी देव न मागता खूपसं देऊन जातो. शेवटी एक तरी माझ्या बाजूचा सापडलाय!

पण तो पाच वर्षांचा झाल्यावरही असाच राहील का?

- **राजन गडकरी**, माहवाह, न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




**Hawaiian Red Ginger by Neelima Gole**

## साहित्यातील आई



लिहिताना साहित्यिक हातात काळीज घेऊन लिहित असावेत म्हणूनच ते साहित्य काळजाला हात घालते. एकूण लिहिल्या जाणाऱ्या साहित्यात 'आई' ने व्यापलेला भाग मानवी शरीरात हृदयाने व्यापलेल्या भागाएवढा तर नक्कीच आहे. त्यामुळे जिव्हाळ्याच्या असलेल्या 'आई' या विषयाला सर्वांनीच हात घातला.मातृहृदयी सानेगुरुजींनी लिहिलेलं महाकाव्य 'श्यामची आई' हे मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र म्हणून गौरवले गेले. जगभरातल्या विविध भाषांमधून येणाऱ्या वाङ्मयात 'श्यामची आई' हे सर्वात संस्कारक्षम पुस्तक आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. अनेक प्रस्थापितांनी व नवोदितांनी आपली लेखणी 'आई' साठी झिजवली. कवी यशवंत, केशवसुत, नारायण सुर्वे, कुसुमाग्रज, ग्रेस, इंद्रजित भालेराव, इंदिरा संत, शांता शेळके, पद्मा गोळे अशा असंख्य मान्यवरांनी आपल्या लेखनातून 'आई' आमच्या हृदयात पुन्हा पुन्हा उजळवली.

**काल एक नवल घडलं**
**वेदनेतून कमळ फुललं**
**फुलता फुलता आणखी नवल**
**दुःख हसलं,सुख रडलं**

वेदनेची परिसीमा..... जीवघेण्या प्रसूती वेदना.....त्यातूनच आकारणारं एक जीवनकमळ.....आणि एकदम सारं शांत.....त्या चिमण्याच्या रूदनपर्वासोबत वेदनांचे दुःख कुठे जाते? हे एकतर देव जाणे अथवा आई. म्हणूनच एवढं प्रचंड लेखन झाल्यानंतरही 'आई' चं अप्रूप कायम आहे. लिहिणाराही थकत नाही आणि वाचणाराही कंटाळत नाही. त्याला बाळबोध म्हणणारा निश्चितच बाळबोध म्हणावा.

**हंबरून वासराला चाटते जवा गाय**
**तिच्यामधी दिसते मले तवा माझी माय**

प्रा. समाधान गणपत पाचपोळांच्या या अतिशय लोकप्रिय कवितेनंतर कित्येकांनी आपल्या आईच्या प्रतिमेशी ही प्रतिमा जुळवून पाहिली असेल आणि अर्थातच ती जुळलीही असेल. आपल्याच शरीराचा एक अंश ती जन्माला घालते आणि सुरू होतो पुढचा प्रवास तिच्या नव्या जन्माचा. मग तिचं स्वतःचं अस्तित्व फारसं उरतच नाही. ती माऊली जगत असते आपल्या लेकरातच. 'हा घास चिऊचा, हा काऊचा' म्हणत ती तान्हुल्याला भरवत असताना तहान भूक विसरून जाते. 'लिंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई, आज माझ्या पाडसाला झोप का गं येत नाही'. अशी अंगाई गात हातांचा पाळणा करणाऱ्या आईचा डोळा लागतो तो तान्हुलं झोपल्यावरच. बाळाचं आजारपण तर तिच्यासाठी मोठीच आफत असते. 'माझं आयुष्य माझ्या बाळाला दे' अशी विणवणी करणाऱ्या मातृत्यागाला तोड नाही. तिच्या प्रेमाला साजेशी उपमा नाही. आईच्या महतीचे हे सर्व पैलू उलगडून साहित्यिक थकले पण तिचा महिमा इतका अपार आहे की, वेदांनाही तो पुरेसा वर्णिता आला नाही असे म्हटले जाते. कवी फ.मु.शिंदे म्हणतात,

**" आई खरंच काय असते.....लंगड्याचा पाय असते.....**
**वासराची गाय असते....दुधावरची साय असते.....**
**आई असते जन्माची शिदोरी.... सरतही नाही आणि उरतही नाही."**

कविवर्यांच्या या पंक्तींनंतरही 'आई' कवितेत भरून उरलीच आहे. कवयित्री निरजा यांच्या 'आईस पत्र' ही 'वेणा' ह्या संग्रहातील कवितांची मालिका म्हणजे सासरी गेलेल्या मुलीने आईस लिहिलेली पत्रं होत.आपल्या आयुष्यातील प्रत्येक गोष्टीसाठी मन मोकळं करताना लेकीची हक्काची जागा 'आई' होय.आपल्या लेकीला तिचा सल्ला अनमोल असतो.

**आई म्हणे लेकी ! कर्माची खटखट**
**शेवाळली वाट ! पाय दे गं बळकट**

समभावासाठी आईपेक्षा चांगले उदाहरण नाही. असं असलं तरी आपल्या कमकुवत लेकराकडे तिचं थोडं अधिकच लक्ष असतं हे निसर्गदत्त सत्य आहे. तिची क्षमाशीलता ही पराकोटीची असते.केशीराज बास आपल्या 'मूर्तिप्रकाश' या ग्रंथात म्हणतात,

**" जैसे बालक अन्यावो करीः तो माता साटवी उदरी "**

अशी ही आई असते तेव्हा घर गजबजलेलं असतं आणि ती नसता ते गलबललेलं असतं. या आशयाच्या खूप कविता आल्या. कवी यशवंत म्हणतात,

**आई म्हणोनि कोणी आईस हाक मारी**
**ती हाक येई कानी मज होय शोककारी**

कवी माधव ज्युलियन यांची 'आईची आठवण' ही कविता मनाला स्पर्शून जाते.

**" प्रेमस्वरूप आई,वात्सल्यसिंधू आई.....**
**बोलिवू तूज आता मी कोणत्या उपायी ? "**

केशवसुतांची याच आशयाची कविता

**"गेलीस सोडूनी आम्हा दीन बालकाते...**
**अंतरले पाय तुझे हाय हाय माते "**

तर कवी वामन निंबाळकर म्हणतात,

**" शोधते माझी नजर माय आता मी उदास होतो**
**दिसता कृश मोळीवाली मोळी तिची विकत घेतो "**

कवीचे स्वतःचे एक भावविश्व असते. या भावविश्वातले घटक कवी जपत असतो. त्याच्या या भावविश्वात आईचे स्थान धृवताऱ्यासारखे अढळ आहे. आईला साहित्यिकांनी दिलेल्या उपमांना अंतच नाही. कवयित्री शांता शेळके यांची कविता त्याचे एक सुंदर उदाहरण आहे.

**आई म्हणजे तव्यावरची गरम गरम पोळी,**
**औषधावर दिलेली लिमलेटची गोळी**
**आई म्हणजे प्रसादाचा खडीसाखर खडा,**
**शाळेआधी पाटीवर लिहून दिलेला धडा**
**आई म्हणजे पाठीवर फिरवलेला हात,**
**मेतकूट लावलेला मऊ तूप भात**
**आई म्हणजे देव्हाऱ्यातील लक्ष्मीचे चित्र,**
**सगळ्या मित्रांमधला माझा आवडता मित्र**

**'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी'** अशी प्रसिद्ध काव्यपंक्ती आहे. तसा जगातल्या प्रत्येक भाषांमध्ये 'आई' हा विषय जिव्हाळ्याचाच. मॅक्झिम गार्की यांची 'आई' ही कादंबरी आजही जगाच्या कान्याकोपऱ्यात वाचली जाते. खलील जिब्रान म्हणतात, **"Mother is the most beautiful word on the lips of mankind."** **'परमेश्वर प्रत्येक ठिकाणी जाऊ शकला नाही म्हणून त्याने आईची निर्मिती केली.'** अशी एक अरबी म्हण आहे. प्रत्येक देशात, भाषात आईचे स्थान सर्वोच्च आणि अढळ आहे. साहित्यात 'आई' या विषयावर उदंड लेखन झाले पण या विषयाचा ताजेपणा तसाच आहे. आणि तो तसाच राहील जो पर्यंत आई आहे, माझी... तुमची...आणखी कुणाचीही...!

।। मातृदेवो भवः ।।

\- **आनंद देशमुख,** शिरपूर, जि.धुळे, महाराष्ट्र

## अमेरिकन दिवाळी

हल्ली दिवाळीच्या पणतीच्या आधी दारात बसलेला असतो भोपळा
किल्ल्यावरच्या शिवबासोबत गोष्टी करत असतो हाडांचा सापळा
खुळी झाडेसुद्धा होळी समजून रंगांची बरसात करू लागतात
असे मजेदार क्षण अमेरिकन दिवाळीतच बघायला मिळतात

आमच्या लहानपणीच्या दिवाळीची मज्जा काही औरच होती
फटाके, फराळ, फुल धमाल, उटण्यासंगे होता साबण मोती
अभ्यंगस्नानाचा झाला क्वीक शॉवर अन विचार करायची आली पाळी
कुठेतरी हरवत चालली आहे का माझ्या स्वप्नातली दिवाळी

इतक्यात चिमुरडी अनन्या परकर पोलक्यावर घालून आली नथ
लेगोचा किल्ला करणारा आदित्य देऊन गेला एक संदेशाचे खत
म्हणाला भूतकाळातून बाहेर ये काका वर्तमानातही आहे रे कीक
जुन्या आठवणीत गुंतण्यापेक्षा नवीन आठवणी बनवायला शीक

तेलाच्या जागी बॅटरी आल्याने पणतीचा प्रकाश कमी होत नाही
पंपकीन पाय सोबत खाल्याने चकली खमंगपणा गमावत नाही
परंपरांना चौकटीबाहेर काढल्यावर त्यांच्यात नवीन अर्थ गवसतो
सणाचा आनंद वातावरणात नाही तर स्वतःच्या मनात शोधायचा असतो

बाहेर रोषणाई असो वा नसो मनात लख्खं प्रकाश असतो
फटाक्यांचा जल्लोष असो वा नसो अंतरी उल्हास वाहत असतो
स्थळांची बंधने झुगारून देऊन जेंव्हा मने एकत्र किल्ले रचतात
तेच समजावेत दिवाळीचे क्षण जे प्रेमाने जपून ठेवायचे असतात

\- **सौरभ तांबे,** कोलंबस, ओहायो

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका



**आडवे शब्द :-**

२] मराठा साम्राज्याचे पहिले पेशवा – 'XXX' विश्वनाथ
४] शिवरायांवर हल्ला करण्यास अफझलखानाला 'XXXX' येथील दरबाराने पाठवले होते
६] शिवरायांचे पहिले मंदिर आंध्रप्रदेशमधील 'X'शैलम येथे आहे
७] मराठी/हिंदवी स्वराज्याचे पहिले छत्रपती – 'xxx' महाराज
८] शिवरायांचा साताऱ्यातील किल्ला (व्याघ्रगड)
११] थोरले बाजीराव पेशवे यांचे लाडाचे संबोधन
१३] पेशवाईत 'साडेतीन XXX' नावाने चार मुत्सद्दी प्रसिद्ध होते
१४] शिवरायांचे जावळी येथील कट्टर विरोधक – चंद्र'XX' मोरे
१५] पेशवेपद मिळालेले 'भट' घराणे मूळ कोकणातील 'X'वर्धन येथील होते
१६] शिवरायांच्या सैन्याचे एक सेनापती – 'XXX'राव गुजर
१७] शिवरायांच्या मातोश्री – 'XX'माता
१९] शिवरायांच्या काळातले थोर संत – 'xx'राम
२२] शिवरायांवर स्तुतीकवने रचणारे हनुमानभक्त संत
२३] राज्याभिषेकानंतर शिवरायांनी कालगणनेसाठी 'शिवराज्याभिषेक' 'XX' सुरू केला
२५] १७७४ ते १७९५ या काळातील माधवराव पेशवे यांची पदवी
२७] आग्र्यामध्ये शिवरायांची व्यवस्था बघणारा मिर्झाराजेंचा मुलगा – 'XX'सिंह
२९] झाशीची शूर मराठी कुळातील राणी
३१] राज्याभिषेकानंतर शिवरायांनी चढाई केलेला प्रदेश –'XXXX' (आत्ताचे जळगाव, धुळे, नंदुरबार)
३४] आदिलशहाने शहाजीराजांना पकडल्यावर शिवरायांनी 'या' मुघलसम्राटास पत्र लिहिले
३५] दुसरे बाजीराव यांच्या दुसऱ्या पत्नीचे माहेरचे आडनाव
३७] पेशव्यांचे शेवटचे सरसेनापती 'बापू गोखले' यांच्या पत्नीचे नाव
३८] शिवरायांचे लहानपणीचे गुरु – दादोजी 'XXXX'
४०] शिवरायांचा राजधानीचा किल्ला
४१] शिवरायांबरोबरच्या भेटीवेळचा अफजलखानाचा अंगरक्षक – सय्यद 'XX'
४२] शिवरायांची औरंगजेबाशी आग्र्यात भेट झाली तो इंग्रजी महिना
४३] शिवछत्रपतींचे पहिले मुख्यप्रधान – 'xx'राज रांझेकर

**उभे शब्द :-**

१] पन्हाळगडच्या वेढयातून सुटण्यास शिवरायांना मदत करणारा मावळा – शिवा 'XXX'
२] एकही लढाई न हरलेले पराक्रमी पेशवा – थोरले 'XXXX'
३] प्रतापगडाच्या लढाईत शिवरायांचे रक्षण करणारा अंगरक्षक – 'XX' महाला
४] शिवरायांची पत्नी सकवारबाई वास्तव्यास असणारे सांगलीमधील गाव
५] पेशव्यांची राजधानी असणारे शहर
६] शिवरायांचे पहिले मंदिर आंध्रप्रदेशमधील 'X'शैलम येथे आहे
९] शहाजीराजांचे विश्वासू सेवक व पेशवा – 'XX'पंत डबीर
१०] शिवाजी महाराजांचे पिताजी
१२] महाराणी ताराबाई यांचे माहेरचे नाव – 'xx'बाई
१४] शिवरायांचे धाकटे सुपुत्र
१५] पेशवेपद मिळालेले 'भट' घराणे मूळ कोकणातील 'X'वर्धन येथील होते
१६] कोल्हापूर प्रांतातील एक शिवकालीन किल्ला – 'XXX'गड
१८] शिवरायांची आग्र्याहून सुटका होण्यास याची मदत झाली असा दावा केला जातो – 'XXX' मेहतर
२०] जिजामाता आणि दादोजी कोंडदेव यांनी भरभराटीस आणलेली पुण्यातील पेठ – 'xxx, xx'
२१] संभाजी महाराजांची आई – 'XX'बाई
२४] संभाजी महाराजांसोबत वीरमरण स्विकारलेला त्यांचा मित्र - कवी 'XXX'
२६] अफझलखानाची जहागिरी असणारा आताच्या सातारा जिल्ह्यातील परगणा
२७] पेशवाईतील नि:स्पृह न्यायाधीश – 'XXXX' प्रभुणे
२८] शिवाजी महाराजांपासून शाहू महाराजांपर्यंत सेवा दिलेले मोरे घराण्यातील सरदार – 'xx'सिंग
३०] शिवरायांच्या मराठा साम्राज्याचा पहिला राजधानीचा किल्ला
३१] लालमहालात शिवरायांनी बोटे छाटलेला मुघल सरदार – शाहिस्ते'XX'
३२] मराठा साम्राज्याचे सरसेनापती 'बाजी पासलकर' हे मोसे खोऱ्याचे वतनदार म्हणजे 'XXXX' होते
३३] थोरले बाजीराव पेशवे यांचे एक प्रमुख सरदार – विठोजी 'XX'
३६] धारवाड प्रांतातील मराठा साम्राज्याचा एक किल्ला

## ‘मराठी इतिहास’ : - शब्दकोडे

३८] दक्षिण मोहिमेच्यावेळी शिवरायांशी तह करणारा कुतुबशहा ‘या’ प्रांताचा सुलतान होता – गोवळ’XX

’३९] मराठा साम्राज्याचा कर्नाटक प्रांतातील किल्ला – जग’xx’गड

४०] मुघल आणि मराठे यांच्यात नाशिकजवळील या किल्ल्यासाठी ६ वर्षे लढा झाला – ‘XX’शेज

४२] शिवरायांची औरंगजेबाशी आग्र्यात भेट झाली तो इंग्रजी महिना

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ■ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | | ■ | ६ |
| ७ | | | ■ | ८ | ९ | | ■ | | ■ | १० | ■ |
| | ■ | ११ | | ■ | | ■ | १२ | ■ | १३ | | |
| ■ | १४ | | ■ | १५ | ■ | १६ | | | ■ | | ■ |
| १७ | | ■ | १८ | ■ | १९ | | ■ | ■ | २० | ■ | २१ |
| ■ | २२ | | | | ■ | २३ | २४ | ■ | २५ | २६ | |
| २७ | | ■ | | ■ | २८ | ■ | २९ | | | | ■ |
| | ■ | ३० | ■ | ३१ | | ३२ | | ■ | | ■ | ३३ |
| ३४ | | | | | ■ | | ■ | ३५ | | ३६ | |
| | ■ | | ■ | ■ | ३७ | | | ■ | ■ | | ■ |
| ■ | ३८ | | ३९ | | ■ | | ■ | ४० | | | |
| ४१ | | ■ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | | ■ |

उत्तर पान नं. ५२ वर

शब्दकोडे रचना :- गुरुप्रसाद पणदूरकर, मुंबई, महाराष्ट्र

## हवा पलंग आणि न्याहारी

"आज रात्री ८ वाजता ए विंगच्या पार्किंगमध्ये अल्पकाळासाठी फ्लॅट भाड्याने देण्याविषयी सोसायटीची अर्जंट मिटींग आहे. सर्वांनी पार्किंगमध्ये हजर रहावे.

*- उपाध्यक्ष: वासूनाना दीक्षित, सह्याद्री गृहरचना - नारायण पेठ, पुणे."*

नोटीस बोर्डावरील आवाहन वाचून प्रत्येकजण संभ्रमात पडला. इथल्या पुणेरी पाट्या आणि कडक नियमांमुळे बॅचलर येणे बंद झाले होते. सायंकाळी घरट्याकडे परतताना पक्ष्यांचा कलकलाट होतो, त्याप्रमाणे सहा नंतर सोसायटीमध्ये वाहने हॉर्न वाजवीत येऊ लागली.
"इधरके पार्किंगमें आज मिटींग है| गाडी उधर पार्क करो|" सोसायटीचा वॉचमन मन्नू प्रत्येकाला सांगत होता. एरव्ही कोपऱ्यातील स्टुलावर भोजपुरी गाणी ऐकत आपल्याच धुंदीत असणाऱ्या मन्नूला, आज चेव आला होता. रोजच्या टी.व्ही. सिरीयलपेक्षा सोसायटीच्या मिटींगमध्ये जास्ती धमाल येत असल्याने महिला वर्ग खूष होता. विषय कुठलाही असला तरीही टाकीचे पाणी ए विंगला आधी मिळतं, थकीत बाकी यावर हमखास गदारोळ होतो. जिन्यातली, पार्किंग मधली खुन्नस काढण्याची ही अनेकांना नामी संधी असे.

पदाधिकाऱ्यांसाठी खुर्च्या, त्यासमोर भली मोठी सतरंजी, जुनी बाकडे यांनी पार्किंग सज्ज झाले. वेळेवर गेलो तर आपले महत्व कमी होईल अशी अध्यक्ष शशिकांत धडफळेंना धास्ती होती. खिडकीचा पडदा हळूच सारून कितीजण जमले याचा ते साडेसात पासून अंदाज घेत होते. चार वर्षांपूर्वी सक्तीची निवृत्ती घेऊन ते घरातच पडलेले असत. आपण फायनान्स कन्सल्टंट आहोत असे न विचारता सर्वांना सांगत. अखेरीस साडेआठ वाजता धडफळे आले. सेक्रेटरी श्यामला पाटील, भास्कर गोरे यांची खोटी खोटी दिलगिरी करीत ते स्थानापन्न झाले. "अमेरिकेच्या की रशियाच्या अर्थमंत्र्यांसोबत होतात वाटते." छद्मीपणाने हसत वासूनाना दीक्षित म्हणाले. सोसायटी निवडणुकीत धडफळेंकडून एक मतांनी पडल्यापासून त्यांना पाडण्याची दीक्षित एकही संधी सोडत नसत.

मंडळी मोठ्या संख्येने जमली होती. पदाधिकाऱ्यांच्या बाजूला बसलेल्या एका तिशीतील यौवनेकडे प्रत्येकाची नजर खिळून होती. सोनेरी केस, निळे डोळे, गुलाबी गोरा वर्ण, चाफेकळी नाक, कमनीय बांधा असे आरस्पानी सौंदर्य लाभलेली ती श्वेतवर्णीय ललना होती. पायापाशी भलीमोठी ट्रेकिंगची सॅक घेऊन ती सुहास्य वदनाने बसली होती. "विषय हाच असावा" हे दिसून येत होते.

"मोठ्या संख्येने आल्याबद्दल सर्वांचे आभार. अधिक वेळ न दवडता मुद्यावर येतो." धडफळेंनी मीटिंगला सुरुवात केली.

"धडफळे, तुम्ही मराठीत बोलत आहात. या बाईंना समजेल कां?" बाजूला बोट दाखवीत दीक्षितांनी झाडले.

"हे बघा, कुणाला समजो वा ना समजो. मी मराठीतच बोलणार." आपला मराठी बाणा परजत धडफळे कडाडले. खरे तर इंग्रजीत संभाषण हि त्यांची दुखरी नस होती. मराठी बाणा हे त्यावरील पांघरूण होते. मग अशी संधी सोडतील ते सेक्रेटरी भास्करराव कसले. त्या सुंदर, गोऱ्या ललनेला भास्कररावांनी आपल्या तर्खडकरी इंग्रजीत भाषांतर करून सांगितले. ती मानेने हुंकार देत होती.

"आपल्या सोसायटीतील सदस्य अश्विन बडवे हे अमेरिकेत असतात. एअर बी अँड बी कि काय असतं, त्याद्वारे मिस एमिली थॉम्पसन, यांना त्यांचा फ्लॅट अल्पकाळासाठी भाडेतत्वावर द्यायचा आहे." धडफळेंनी चित्र स्पष्ट केले. टेबलावरील फोनवरून व्हाट्सअँपद्वारे बडवेंशी कॉल चालू होता.



"यू सी मिस्टर बडवे, धिस इज फर्स्ट टाइम हॅपनिंग". धडफळेंनी सोसायटीची बाजू मांडण्यास सुरुवात केली.
"तुम्ही मला अनेक वर्षे ओळखता. एमिली माझ्या परिचयाची आहे." अटलांटास्थित बडवे अस्खलित मराठीत बोलत होते.

"बट यू सी, आवर कल्चर इज वेगळं" धडफळे इंग्रजी बोलताना धडपडू लागले.

"अहो धडफळे इंग्रजीत का बोलता?" श्यामलाताईंनी धडफळेंना सावरले.

"अहो, बडवे अमेरिकेत आहेत ना म्हणून म्हटलं..." पडत्या फळाची आज्ञा घेऊन धडफळेंनी पुढील संभाषण नाईलाजाने मराठीत चालू ठेवले. तिकडे भास्करराव भाषांतराच्या नावाखाली एमिलीशी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत होते. समोर बसलेल्या बायकोचा लालेलाल चेहरा त्यांनी केव्हाच डोळ्याआड केला होता.
"घरी चला मग बघतेच!" हे तिचे दात ओठ खात असलेले भाव स्पष्ट दिसत होते.

"तर बडवेंचा फ्लॅट एअर बी अँड बी तत्वावर एमिलिताईंना सॉरी एमिलीबाईंना द्यावा का? याचा निर्णय आपल्याला तातडीने घ्यायचा आहे." एमिलीकडे कटाक्ष टाकीत धडफळेंनी बॉल सोसायटीच्या कोर्टात टाकला. मंडळी हळूहळू कुजबुजू लागली. शब्दच नव्हे तर त्यांची देहबोली ठळकपणे दिसून येत होती.

"असल्या बाया आल्या तर आपले नवरे कामधंदा सोडून इथेच घुटमळतील. काय हो जोशी बाई?" साने बाईंनी स्त्री वर्गाची प्रातिनिधिक तक्रार बोलून दाखविली.

"अहो सानेबाई माझ्या नवऱ्याचं मी बघेन. तुम्हीच बघा तुमच्या मिस्टरांचं! त्यांच्या ऑफिसातील बातम्या जगजाहीर आहेत." जोशी बाईंनी नवऱ्याची बाजू उचलून धरली परंतु त्या सानेंशी सहमत होत्या. एमिलीबाईंना राहायला परवानगी न देण्याबाबत स्त्री वर्गाचे एकमत झाले.

"आयला कसला आयटम आहे यार! स्वभावाने फार मोकळ्या असतात ह्या! नाहीतर आपल्या पोरी. इंस्टाला लाईक देताना पण आखडतात. रस्त्यात भेटलं तर स्माईल तर दूर पण ॲटिट्यूड दाखवतात. झगा मगा आणि मला बघा." आकाश अगदी चिन्मयच्या मनातलं बोलला. चिन्मय तर पार घायाळ झाला होता.

"चेहऱ्यावरूनच शिष्ठ वाटते. आता आपलं मार्केट डाऊन होणार. सोसायटीने हिला अजिबात परवानगी देऊ नये." सायलीचा जळफळाट होत होता.

"हो नां! या निर्लज्जपणे कशाही वागतात. पिक्चरमध्ये दाखवतात ना. ते बघ, सोसायटीतले भुंगे आतापासूनच उडायला लागले." तरुणांच्या घोळक्याकडे बघत अर्चिताने सायलीची तळी उचलून धरली.

"त्यांचं राहू दे, ते बघ मोठ्यांचेसुद्धा डोळे बाहेर आले आहेत." सायलीचे वाक्य ऐकून इतर बायकांमध्ये हशा पिकला. कुजबुजीचे रूपांतर स्पष्ट संवादांत होऊ लागले. पण संवादात इंग्रजी शब्द येणार नाही याची प्रत्येकजण खबरदारी घेत होता. गोंगाट वाढू लागला.

भाषांतर करताना भास्कररावांची तारांबळ उडत होती. काय लपवावे आणि काय सांगावे हे त्यांना कळत नव्हते. फ्लॅट भाड्याने देण्याकडे सोसायटीचा कल नव्हता. बायकोच्या भीतीने पुरुषांची मते नाईलाजास्तव बायकांच्या पारड्यात जाणार होती. खुर्चीवरील पदाधिकाऱ्यांची आपापसात कुजबुज झाली. बडवे आपली बाजू मांडित होते.

"हे बघा, सर्वांचा कल बघून एमिली बाईंना इथे राहायला सोसायटी परवानगी देत नाही." श्यामला ताईंच्या खणखणीत आवाजात निकाल लागला.

"मला हा निर्णय पटत नाही. नारायण पेठेतील पहिली एअर बी अँड बी म्हणून आपल्या सोसायटीचे नाव जगाच्या नकाशावर उमटेल. हि संधी गमावू नका." मॅनेजमेंट गुरु बडवे आपले ज्ञान पणाला लावित होते.

"हे बघा ते झोमॅटो, उबर सारखं एअर बी अँड बी इथे नको राव!" दीक्षितांनी बडवेंना सुनावले. कुणीही ठोस कारण न दिल्याने बडवे नाराज झाले.

"यू सी मिस एमिली. वुई लाईक यू. पण यू कान्ट ते असलं ते रेन्ट फ्लॅट बाय झोमेटो आपले ते बीबीएअर." धडफळेंनी एमिलीबाईंना निर्णय सांगण्याचा प्रयत्न केला.

अखेरीस त्यांची इंग्रजीची कसरत एमिलीला बघवली नाही. इतका वेळ खुर्चीवर बसलेला तो 'विषय' टेबलाला टेकून उभा राहिला. अचानक उठून संवाद साधण्याच्या पवित्र्याने सर्वांना कोड्यात टाकले. एकदम शांतता पसरली.

"तुमची प्रतिक्रिया मला आणि बडवेंना अपेक्षितच होती. हा आमचा एक प्रयत्न होता." एमिलीच्या तोंडातील अस्खलित मराठीने सर्वांची बोबडीच वळली. समोर बसलेल्या बाया अंगावर झुरळ पडल्यागत थरारल्या. यांनी तावातावाने एमिलीची कुंडली मांडली होती. तिला मराठी समजत नसेल हे गृहीत धरून हवे ते भाष्य करणारे एकदम कोमात गेले.

"होय, मला मराठी चांगलं येतं. लहानपणापासून मराठी मैत्रिणींमुळे मला मराठी विषयी आकर्षण वाटत गेले. मराठी भाषा, संस्कृती, इतिहास यांचा लहानपणापासून अभ्यास करायला सुरुवात केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र वाचून मी भारावले. मराठीत पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतले.

ट्रेकिंग हा माझा छंद आहे. जगभरातील अनेक पर्वत पालथे घातले आहेत. सह्याद्रीतील गड, किल्ल्यांना भेटी देत शिवाजी महाराजांना आदरांजली वाहण्याची माझी इच्छा आहे. संयोगाने बडवेंच्या फ्लॅटविषयी समजले. फोनवर आमचे बोलणे झाले. वाटलं तुमच्यात राहून लोकजीवन जवळून बघता येईल. पण आता तुमचे विचार ऐकले आणि निर्णय समजू शकते. ज्या दिवशी कातडीच्या रंगाचा विचार करणे थांबवले जाईल तेव्हाच हे जग एकसंघ होईल." एवढे बोलून सोसायटीतील जमलेल्या तमाम लोकांना तिने हात जोडून नमस्कार केला. भली मोठी सॅक पाठीवर घेऊन एमिली सोनेरी केसांना सावरीत सोसायटीबाहेर पडली.

आज सोसायटीच्या मिटींगनंतर इतर कुठल्याही विषयावर चर्चा झाली नाही. अंतर्मुख होऊन प्रत्येकजण आपापल्या घरट्याकडे जाऊ लागला.

- **गिरीश देसाई,** मॅरिएटा, जॉर्जिया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## शिकागोची छुपी रमणीय स्थळे

मिडवेस्ट! असं म्हटलं की चटकन शिकागो डोळ्यासमोर येतं. बरोबरच आहे - मिडवेस्टमधलं सर्वात प्रसिध्द शहर आहे ते! बरेच जण शिकागोत येऊन तिथल्या प्रसिद्ध गोष्टी पाहतात - जसं की बीन , नेव्ही पिअर! काही जण म्युझियम पण पाहतात. पण शिकागोत काही इतर, बहुधा न पाहिली जाणारी स्थळं पण आहेत. त्याबद्दल हा लेखनप्रपंच !

शिकागोच्या स्कोकी या उपनगरात होलोकॅास्ट म्युझियम आहे. माफक दरात इथे नुसतं होलोकॅास्टबद्दल जाणता येतं, त्यांना कॅंपमधे दाखल केल्या जाणाऱ्या ट्रेनचा डबा पाहता येतो. एवढंच नाही तर तिथल्या सर्व्हायवर्सशी गप्पाही मारता येतात. होय, प्रत्यक्ष गप्पा! नाही, आता कुणीच त्यापैकी हयात नाहीत. मग हे कसं बरं शक्य आहे? तर, बरेच ज्युईश लोकं कॉन्सट्रेशन कॅंपमधून मुक्त झाल्यावर स्कोकीत येऊन राहिले. त्यांचे अनुभव रेकॅार्ड केले गेले व त्यांचे व्हिडीओ काढून त्याला होलोग्राफमधे कन्व्हर्ट केलं गेलं. ते होलोग्राफ स्टेजवर साकारतात आणि प्रेक्षक त्यांना थेट प्रश्न विचारू शकतात. आहे की नाही युनिक?

बरं, तुम्हाला डाऊनटाऊन मधेच राहायचं असेल तर शिकागो पेडवे टूर नक्की घ्या.



शिकागो थिएटर डिस्ट्रीक्ट मधून सुरू होऊन मिशिगन ॲव्हेन्यूपर्यंत जाणाऱ्या कधी भुयारी तर कधी जमिनीवरच्या ह्या खुष्कीच्या मार्गाची न्यारीच वेगळी! भुयारी असला तरी डेंजरस किंवा घाण नाही बरं का हा मार्ग! इन फॅक्ट, जाता जाता तुम्हाला चर्चशी संबंध नसलेले एक स्टेन्ड ग्लास एक्झिबिट बघायला मिळेल, विविध ‘एल’ स्टेशन कशी पेडवेला जोडलीत हे दिसेल व आर्किटेक्चरल जेम्स आतून बघायला मिळतील - उदाहरणार्थ- अक्वा बिल्डींग (स्त्री आर्किटेक्टने डिझाईन केलेली पहिली स्कायस्क्रेपर) ,



शिकागो कल्चरल सेंटर इत्यादी! शिकागोच्या मल्टीफॅसेटेड आर्किटेक्चरल खजिन्याचं एक वेगळंच दर्शन!

अजून एक वैशिष्ट्य शिकागोचं आहे ते म्हणजे इथलं पब्लिक आर्ट! शिकागो शहराच्या आखणीत ‘लोकांसाठी’ असा खूप विचार केला गेलाय. त्यातला एक महत्वाचा मुद्दा म्हणजे इथली पब्लिक आर्ट! संपूर्ण मोफत, सर्वांना ॲक्सेसिबल अशी काही शिल्पे, चित्रे इथे अगदी उघड्यावर आहेत. तुम्हाला माहितीये का की पिकासोने शिल्पं पण केली होती? त्यांचं एक शिल्प शिकागोने कमिशन करून डेली प्लाझाच्या प्रांगणात ठेवलं आहे - त्याचं नाव नाही सांगत कारण त्याचा स्वानुभव घेऊन तुम्हीच ठरवा की ते काय दाखवतंय ! शेवटी पिकासोचं आहे ते - वेगवेगळी मतं आली नाही तरच नवल ! त्याच्या बरोबर विरूध्द दिशेला जोन मायरोचं एक शिल्प आहे. जोन मायरो हा पिकासोप्रमाणेच एक जगद्विख्यात स्पॅनिश कलाकार होता. त्याचं हे शिल्प! या शिल्पाचं ऑफिशिअल नाव ‘सूर्य, चंद्र व एक तारा’ असं असलं तरी आम्ही शिकागोअन्स त्याला ‘मिस शिकागो’ म्हणून ओळखतो. अजून एक अतिप्रसिध्द कलाकार म्हणजे मार्क शगाल. हा रशियन-फ्रेंच कलाकार नंतर न्यूयॉर्क मधे स्थायिक झाला. तो फ्रान्समधे असताना त्याने ‘फोर सीझन्स’ हे सर्वात मोठं मोझॅक तयार केलं. त्यासाठी लागणारं सर्व मटेरियल वेगवेगळ्या देशांतून आलं - अगदी शिकागोची वर्ल्ड फेमस वीट ही - आणि त्याने ते निर्माण केलं. त्याच्या मते हे चित्र फक्त वातावरणाचे चार ऋतूच नाही तर मानवी जीवनातील चार स्थित्यंतरं ही दाखवते. हे प्रचंड मोझॅक अनुभवायलाच हवं! आणि हो, त्या मोझॅकवर त्यानं डकवलेल्या त्याच्या स्वाक्षऱ्या शोधायला विसरू नका हं!



कलेच्या व आर्किटेक्चरच्या प्रांगणात फेरफटका मारल्यावर आता दमला असाल, नाही? तर मग निसर्गाच्या सान्निध्यात ताजंतवानं व्हायला आवडेल? चला तर मग गारफील्ड कॅान्झर्वेटीत जाऊ. डाऊनटाऊन मधून तुम्हाला ‘एल’ घेऊन इथे येता येईल अगदी कंफर्टेबली! इथे त्यांनी जगभरातल्या वनस्पती आणून त्यांच्या योग्य तापमान विभाग करून तिथे त्यांची लागवड केली आहे. त्यामुळे अगदी वाळवंटातले निवडुंग ते हिरवेगार फर्न्सचं जंगल तुम्हाला अनुभवायला मिळतं. तुमच्याबरोबर असणाऱ्या छोट्यांना मोकळं दौडण्यासाठी बाहेर मोठ्ठं लॅान ही आहे. फर्नच्या जंगलात तुम्हाला एक कृत्रिम धबधबाही दिसेल! ओव्हरऑल अगदी ‘इन्स्टावर्दी’ ठिकाण आहेच पण डोळ्यांना व मनाला सुखवून जाणारं आणि शांत करणारं असं हे ठिकाण आहे हे नक्की!

आता शिकागो हे आर्किटेक्चरसाठी जगप्रसिद्ध आहे हे सर्वांनाच माहितीये. पण शिकागोला फार मोठी नाट्यपरंपराही लाभली आहे. मराठी माणसाला नाटक फारच जवळचं! तुम्ही जॉन महोनी, जॉन माल्कोविच, गॅरी सिनीस, लॉरी मेटकाफ ही नावं ऐकली असतीलच! त्या लोकांनी स्थापन केलेली स्टेपनवुल्फ ही नाट्यसंस्था शिकागोत आहे व दर्जेदार नाटकं दाखवण्याचा पायंडा तिनं पाडला आहे. शिवाय गुडमन थिएटर, लुकिंगग्लास थिएटर अशा अनेक संस्था आहेत जे विविध नाटकं बसवतात व आम्ही ते पाहायला जातो. तुम्ही ही या! या लोकांचं नेपथ्यही भारी दर्जेदार असतं ! पण जर तुम्हाला विंग्रजी नाटकं नसेल बघायचं तर मग इंप्रॉव्ह कॅामेडी शो पहायला चला सेकंड सिटी थिएटरला ! एमी पोहलर , टीना फे, स्टीव्हन कोल्बेर ना कोण ओळखत नाही? त्यांच्यातला समान दुवा - सेकंड सिटी थिएटर! आवर्जून जाण्यासारखं ठिकाण आहे ते !

हे सगळं झालं तरी जरा आध्यात्मिक काही पहायचं असेल तर चला जरा शिकागोच्या उत्तरेला जाऊ बहाई टेंपल पाहायला! बहाई टेंपल्सचं वैशिष्ट्य असतं त्यांचं आर्किटेक्चर ! शिकागोतल्या बहाई टेंपलचा घुमट लांबूनच आपल्याला मार्ग दाखवतो. तिथल्या रम्य बागेत फेरफटका मारून तुम्ही आत त्यांची सर्विस पहायलाही जाऊ शकता.



अजून एक विशेष म्हणजे इथून १०-१५ मि चालत गेलात तर विल्मेट बीच लागतो. क्लीन बीच आहे आणि स्थानिक लोकांत लोकप्रिय आहे. त्याच्या आजूबाजूला मस्त मोठं पार्क ही आहे! लेक मिशिगनचे अथांग, निळेशार, फ्रेश पाण्याचे पात्र, सुटलेला वारा आणि सभोवतीची गर्द हिरवी वनराई! डोळे आणि त्यासोबत मन निवणार नाहीत तर काय?

शिकागोत अशी अनेक 'हट के' ठिकाणं आहेत. तुम्ही यायचं ठरवा! तुम्हाला काही प्रश्न असतील तर शिकागो महाराष्ट्र मंडळाचा 'भ्रमणगाथा' मंच तुम्हाला मदत करेलच. शिकागोतल्या फिरस्त्यांचाच मंच आहे तो! सो तुम्हाला आमची सेकंड सिटी पहायला यायचं आग्रहाचं आमंत्रण देतेय! नक्की या!

- **वैशाली बेलसरे,** माउंट प्रॉस्पेक्ट, इलिनॉय

[ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका]

## लग्नस्वातंत्र्य

"तुला कोणी डिव्होर्स लॉयर माहीत आहे का पोर्टलंडमधे?" शलाकाने हा प्रश्न सहजपणे माझ्या कानात सोडला. तिला प्रश्नाचे उत्तर नकोचं होते मुळी. तिला फक्त मला सांगायचे होते की ती नवऱ्यापासून डिव्होर्स घेतेय. हे न कळायला मी काही दुधखुळा नव्हतो.

शलाका आणि मी एका प्रोजेक्ट वर होतो. ती मला रिपोर्ट करायची. आमची भाषा एक, मराठी, त्यामुळे आमचे ऑफिसमधे खूप जमायचे. ती माझ्या पेक्षा वीस वर्षांनी लहान होती. मुलगी समजावं तर वयानं मोठी व बहीण मानावी तर लहान अशा वयातली.

आज लंच मधे हा प्रश्न टाकून शलाका माझ्या उत्तराकरता थांबली. मी पोकर चेहऱ्याने तोंडातला घास गिळला. मग मीच बोलता झालो, "एक सोशल वर्कर मला माहीत आहे, ती घटस्फोट इच्छित भारतीय स्त्रियांना मदत करते."

शलाका सहा महीन्यापुर्वी पोर्टलंडला आमच्या प्रोजेक्ट वर जॉईन झाली. त्या आधी ती सियाटलला होती. अतिशय खेळकर विनोदी आणि तितकीच हट्टी व रागीट सुद्धा. राग तर नाकाच्या टोकावर. केव्हा तिची सटकेल सांगता यायचे नाही पण पुन्हा सर्व विसरून बोलायला येणार.

लग्न होऊन नऊ महिने झाले असावेत. नवरा पुण्याचाच. कोणत्या तरी मॅट्रिमोनीयल वेबसाईटवर दोघं भेटले. ती H1B वर सॉफ्टवेयर प्रोग्रामर. नवरा मात्र सॉफ्टवेयरवाला नसल्याने त्याला तिने H4 वर येथे आणले होते व सियाटलला एका कॅालेजातून ती त्याच्याकडून MBA करून घेत होती. जेणेकरून त्याला अमेरिकेत नोकरी मिळू शकेल. आठवडाभर पोर्टलंडला नोकरी करून विकेंडला सियाटलला जायची नवऱ्याकडे.

कॅाफी ब्रेक मधे मी पुन्हा त्या विषयावर गेलो.
"काय प्रकार आहे? मी बोलू का त्याच्याशी?"
दोघेही तरूण नक्कीच काही गैरसमज असावेत. तिचा रागीट स्वभाव आम्हाला माहीत होता. कधीकधी मला पण तिच्या रागाला कंटाळून तिला टाळावेसे व्हायचे. तो तर तिचा नवरा होता.

शलाका म्हणाली, "तो माझ्या मनातून पुरता उतरलाय. मी त्याला अमेरिकेत घेऊन आले. त्याचे शिक्षण मीच करतेय. मी स्वतः राबराब राबतेय. आठवडाभर पोर्टलंडला मान मोडून काम करते. वीकेंडला त्याच्यासाठी सियाटलला जाते. तो मात्र ठोंब्यासारखा बसून

असतो. मी त्याला एक दिवस इथून निघताना कॉल केला की मला सियाटलला यायला उशीर होईल तू कुकर लावून ठेव. तर तो म्हणतो कसा की तू आली की बघू. कधी एक काम करत नाही. कपडे पण मीचं वॉशिंग मशीन मधे टाकायचे. डिशवॉशर मीच लावायचा. त्याला ड्रायव्हिंग लायसन्स नाही म्हणून मीच त्याला सर्वदूर फिरवायचे आणि मी थोडी चूक केली गाडी चालताना तर मला टोमणे मारतो, 'काय गाडी चालवते?' माझ्यावर नवरेपणा गाजवण्याची लायकी तरी आहे का ह्याची? " मग माझ्याकडे बघून ती म्हणाली, "तुम्ही भारतीय पुरुष नवरेपणा सोडू शकत नाहीत".

असे आहे तर? मग मी तिला म्हणालो, "हे पहा सर्व काही गैरसमज दिसताहेत. हळूहळू सर्व सुरळीत होईल. आपण भारतीय आहोत. लग्न एकदाच होते. आयुष्यभराची गाठ असते ती. मला वाटते तू परत जावे त्याच्याकडे".

माझ्यातला पुरुषी अहंकार तिने डिवचला होता. ह्या घटनेनंतर मी तिला अंतर देऊनच रहायचे ठरवले. वास्तविक तिच्यातील हा बदल मला जाणवत होता. गेल्या काही वीकेंड्सला ती सियाटलला जात नव्हती हे माझ्या लक्षात आले होते.

अमेरिकेत सगळ्यात स्वस्त व सहज मिळणारी गोष्ट म्हणजे घटस्फोट. तिचा घटस्फोट झाला. आता ती एकटी आहे. कसे होईल तिचे? एक मित्र, पुरुष, एक वडीलधारी अशा वेगवेगळ्या भुमिकेतून माझ्या मनात तिच्याबद्दल सहानुभूती वाढू लागली आणि माझ्या पत्नीच्याही ते नजरेत आले. ती मला म्हणाली, "अहो तुम्ही जास्त काळजी नका करू तिची. तिने दुसरा आधीच पाहिला असेल त्याशिवाय ती असे करणार नाही".

मी तिला आता टाळू लागलो होतो. ती लंच मधे बरोबर १२ वाजता ऑफिस गृप चॅट मधून एक्झिट घेते हे माझ्या ध्यानात आले त्याच बरोबर डेटाबेस टीम मधला केव्हीन पण. मी तिचा पाठलाग केला, तर मी पोहचायच्या आधीच ती एलिव्हेटर मधून नाहीशी व्हायची. काहीतरी नक्कीचं शिजतंय. एक भारतीय पती सोडून ही अमेरिकनच्या मागे जात आहे? आता माझा पुरूषार्थच नाही तर भारतीय स्वाभिमान पण डिवचला गेला. माझी बायको म्हणाली ते किती बरोबर होते हिच्या बाबतीत. आपण उगाच हिच्या चिंतेत होतो. माझी चिंता, आता घृणा, चीड व तिरस्काराकडे झुकू लागली. मला ती चरित्रहीन वाटू लागली.
हळूहळू ती व केव्हिन मॉल मधे, वॉलमार्ट व रेस्टारंट मधे लोकांना दिसू लागले. केव्हीन माझा बेस्ट फ्रेंड आहे असे तिच्या बोलण्यात येऊ लागले.

एक दिवस ऑफिस मधली एक मुलगी मला म्हणाली. "काल नवरात्रीच्या दांडीयाला मी शलाका व केव्हीनला पाहिले."

प्रोजेक्टचे काम आता खूप वाढले होते. संध्याकाळी उशिरापर्यंत बसावे लागत होते. एका अशाच संध्याकाळी शलाका माझ्या केबिन मधे आली.
"तू माझ्यावर रागावला आहेस का?"
"तू नवऱ्याकडे परत जावे. हा मार्ग आपल्या भारतीयांसाठी नाही." मी काहीतरी बोलायचे म्हणून बोललो व माझी नाराजी दर्शवली.
"मला माहित आहे भारतीयांना माझे वागणे पचनी पडणार नाही. केव्हीन माझा बॉयफ्रेंड आहे. त्यानी मला घटस्फोटानंतर प्रपोज केले."
पुन्हा ती मला दुधखुळा समजत होती. केव्हीन होता म्हणून तिने नवऱ्याला घटस्फोट दिला हे आम्ही जाणून होतो.

एक दिवस तिने लग्नाकरता सुटीच्या अर्जाची इमेल मला पाठवली. ऑफिसमधे सगळ्यांना आता कळले होते. त्यांचे लग्न होणार हे आता जग जाहीर झाले होते.

माझा पण रोष ओसरून मी तठस्थ भुमिकेतून पुनर्विचार करू लागलो होतो. एक गोष्ट मात्र वाखाणण्यासारखी होती शलाकामधे, तिने दाखवलेले धाडस. परक्या देशात नवऱ्याला सोडून एका अमेरिकन सोबत लग्न करायचं. सर्वाचा विरोध सहन करून आपल्या निर्णयावर ठाम रहायचं. आणि आपली संस्कृती म्हणजे तरी काय आहे नेमकी? ज्याच्या सोबत आयुष्य घालवणे कठीण होणार हे कळल्यावर ही लोकलज्जेखातर लग्न टिकवण्याचे ढोंग करण्यात कुठला सुसंस्कृतपणा आहे? भारतातली आयुष्यभर टिकणारी किती लग्न खऱ्या अर्थाने यशस्वी लग्न असतात? घटस्फोट देता नाही आला म्हणून टिकणारे संसार मला अयशस्वी घटस्फोट वाटतात. संस्कृतीच्या दबावाखाली गुदमरलेले. काळानुरूप जी बदलत जाते ती प्रगत संस्कृती. नाहीतर ती कालबाह्य बेडी ठरते. बंधन ठरते.
लग्न बंधन नसावे लग्न हे एकमेकांच्या विचाराना वाव देणारे, आनंद देणारे व तुम्हाला स्वतंत्र करणारे असावे.



सुटीचा अर्ज मंजूर करण्याच्या निमित्ताने मी शलाकाला गाठले.
"शलाका, मला तुझा अभिमान वाटतो. तू रडत नाही बसली. हताश नाही झाली. ताबडतोब निर्णय

घेतला व जीवन सावरलेस, तुझे व केव्हीनचे अभिनंदन 💐”
“तू तर माझ्याशी बोलणे सोडले होते” इति शलाका.
“हो, पण मी चुकलो. तुला एक मित्र, एक वडीलधारी म्हणून आधार द्यायला हवा होता. लग्नाबद्दल शुभेच्छा. तू लग्नालापण नाही बोलावले मला”. मला हे बोलून खूप हायसं वाटलं.
“तू आला असतास लग्नाला?”
“का नाही, तू बोलावून तर पहायचे? 😊”
मग आम्ही दोघेही हसलो.

- **प्रवीण कारंजकर,** ऑल्बनी, न्यू यॉर्क

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## आठवणींचा माग

एक ताट तुझे आणि एक ताट माझे दोघेच आपण
एकेक वाटी-प्याला आणि बसावया चटई-आसन
साधेसुधेच असले तरी करुया जेवण रुचकर मानून
अशीच सुरुवात होती ना केली संसाराची दोघे मिळून
मग हळूहळू तीन आणि नंतर झालीत चार ताटे
थोडेथोडेच का होईना मिळालेत प्रत्येकाचे वाटे
सान-घरट्यात शाळा-कचेरीतले दिवसाचे नफे-तोटे
संध्याकाळी एकत्र जेवताना चर्चा मोठी चविष्ट वाटे
कधी आनंदात तू घेऊन येत होतास गोडधोड काही
गुणी पिल्लांच्या पराक्रमास, आपली गर्वाची ग्वाही
साध्या भाजी-भाकरीसोबत दिसता चमचमीत शाही
बघता त्यांच्या डोळ्यांची चमक, मिळाले जणू सर्व काही
आज आहेत चांदीचे भांडे, बसायला टेबल-खुर्च्या महाग
आता दोनच ताटे, दोनच प्याले, आपल्या दोघांचाच भाग
तक्रार नाही, परदेशात राहूनही पोरांनी फेडलेत हो पांग
पण सणासुदीला भरले ताट काढी अश्रुसवे आठवणींचा माग

- **ज्योत्स्ना काटकर नारनवरे,** केंडल पार्क , न्यू जर्सी

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## महाराष्ट्रीयन थाळीत लपलेलं प्रोटीन – तुम्ही पुरेसं घेताय का?

प्रोटीन हा आपल्या आहारातील अनेकदा दुर्लक्षित होणारा घटक आहे. आपण आहाराबाबत बरीच काळजी घेतो. रोजच्या थाळीत भात, पोळी, भाजी, आमटी, कोशिंबीर हे सगळं असावं, यासाठी आपण प्रयत्न करतो. पण एक गोष्ट अनेकदा आपल्या थाळीत कमी पडते – आणि ती म्हणजे प्रोटीन.

**मग, प्रोटीन इतकं महत्त्वाचं का?**

कारण प्रोटीन हा आपल्या शरीराचा मूलभूत घटक आहे.

- स्नायू, केस, नखे, त्वचा – हे सर्व प्रोटीनपासूनच तयार होतात.
- वजन नियंत्रण, ताकद वाढवणे आणि रोगप्रतिकारशक्ती सुदृढ ठेवण्यासाठी प्रोटीन अत्यावश्यक आहे.
- वय वाढल्यावर स्नायूंची ताकद टिकवण्यासाठी प्रोटीन अधिक महत्त्वाचं ठरतं.

**महाराष्ट्रीयन आहारात काय होतं?**

आपला पारंपरिक आहार चविष्ट आणि पौष्टिक असला तरी त्यात कार्बोहायड्रेट्स (भात, गहू, बाजरी, ज्वारी) अधिक प्रमाणात असतात. त्याच्या तुलनेत प्रोटीनचं प्रमाण बऱ्याचदा कमी पडतं.
उदा. आपली सामान्य थाळी – भात, पोळी, भाजी, आमटी. यात प्रोटीन कुठे आहे? थोड्याशा डाळीत किंवा कडधान्यात. पण ते आपल्या शरीराला लागणाऱ्या प्रमाणात पुरेसं नसतं.

**मग प्रोटीन कुठून घ्यायचं?**

चांगली गोष्ट अशी की प्रोटीन मिळवण्यासाठी पाश्चात्य पदार्थांची गरज नाही. आपल्या महाराष्ट्रीयन आहारातच यासाठी भरपूर पर्याय आहेत.

**१. कडधान्ये आणि डाळी**

- मूग, मटकी, मसूर, चवळी, तूर यांचा वापर वाढवा.
- मोड आलेल्या कडधान्यांची कोशिंबीर किंवा उसळी हे उत्तम प्रोटीन स्रोत आहेत.

**२. दुग्धजन्य पदार्थ**

- दूध, दही, ताक, पनीर सहज उपलब्ध होतात.
- दुपारच्या जेवणानंतर दही/ताक आणि रात्री दूध किंवा पनीर घेणं फायदेशीर ठरतं.

**३. धान्य + डाळ यांचं योग्य संयोजन**

- धान्य आणि डाळ एकत्र घेतल्यावर संपूर्ण प्रोटीन मिळतं.
- उदा. ज्वारीची भाकरी + पिठलं, किंवा भात + डाळ.

**४. सुका मेवा आणि बिया**

- बदाम, अक्रोड, शेंगदाणे, तीळ, सूर्यफूल बिया, भोपळ्याच्या बिया – हे रोज थोड्या प्रमाणात घेतल्यास चांगलं प्रोटीन मिळतं.
- सकाळी ५–६ बदाम आणि संध्याकाळी मुठभर शेंगदाणे पुरेसे ठरू शकतात.

**५. मासे आणि अंडी (मांसाहारी पर्याय)**

- महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर मासे हा प्रमुख प्रोटीन स्रोत आहे.
- अंडी हा सोपा, किफायतशीर आणि दर्जेदार प्रोटीन पर्याय आहे.

**दैनंदिन जीवनातील सोपे पर्याय**

**नाश्ता:**

- उपमा / उपीटात मोड आलेली कडधान्यं घाला.
- एक उकडलेलं अंडं + एक ग्लास दूध.
- प्रोटीन पावडर घालून बनवलेली स्मूदी हा एक पर्याय आहे.

**दुपारचं जेवण:**

- भाज्यांमध्ये डाळ/मोड आलेली कडधान्यं मिसळा.
- भाताऐवजी कधीकधी क्विनोआ, राजगिरा किंवा नाचणीची भाकरी वापरा.

**संध्याकाळचा नाश्ता:**

- चहाबरोबर बिस्किटांऐवजी भाजलेले चणे, शेंगदाणे किंवा हरभरा चाट.
- एक छोटी वाटी दही + भाज्या/भेल.

**रात्रीचं जेवण:**

- डाळ घट्ट शिजवा (पातळ आमटीऐवजी).
- मिलेट्स + डाळीचं पीठ वापरून थालीपीठ बनवा.

**आहारातील रोजची भर:**

- मूठभर बदाम/शेंगदाणे/अक्रोड.
- सूपमध्ये डाळ किंवा मूग घाला.

**लक्षात ठेवा**

- प्रोटीन फक्त बॉडीबिल्डर्ससाठी नाही, तर प्रत्येकासाठी आवश्यक आहे.
- मुलं, महिला आणि वयोवृद्धांसाठी प्रोटीन अत्यंत गरजेचं आहे.
- रोजच्या जेवणात थोडेसे बदल करून आवश्यक प्रोटीन सहज मिळू शकतं.
- आरोग्य, ऊर्जा आणि दीर्घायुष्यासाठी प्रोटीन खूप महत्त्वाचं आहे.

चला तर मग, आपली रोजची थाळी थोडी बदलूया. कार्बोहायड्रेटचं प्रमाण कमी करून प्रोटीनचं प्रमाण वाढवूया आणि आहाराला अधिक संतुलित व पोषक बनवूया.

आपलं आरोग्य आपल्या हातात आहे – प्रोटीन वाढवा, ताकद आणि ताजेतवानेपण टिकवा!

- **सोनाली सुर्वे,** बॉयंटन बीच, फ्लॉरिडा

## आरोग्यदायी ए-आय

तरुण वयातच आपल्याला कॅन्सर झाल्याचं धक्कादायक निदान ऐकल्यावर कॅलिफोर्निया मधल्या कॅरोलिना मिलोन अत्यंत गोंधळून गेल्या. साहजिकच मनात हजारो प्रश्नांचं काहूर उठलं. सुन्न झालेल्या अवस्थेत त्यांनी त्यांच्या डॉक्टरांकडून निदान ऐकल्यावर सेकंड ओपिनियनसाठी दुसरीकडे धाव घेतली आणि आजकाल अमेरिकेत जसं नेहमी होतं तसंच झालं. दोन तज्ज्ञ डॉक्टरांचे उपचारांबद्दल पर्याय परस्परविरोधी निघाले! आता आधीच्या प्रचंड गोंधळाबरोबर भीतीसुद्धा वाढली. अमेरिकेमध्ये शक्यतो डॉक्टर्स पेशंटपुढे पर्याय ठेवून त्याचे बरेवाईट परिणाम सांगतात, पण निर्णय मात्र संपूर्णपणे पेशंटचा असावा लागतो. कॅरोलिना मिलोन यांचा आता पुरता गोंधळ उडाला. आता आपल्याला नक्की काय करायचं आहे हे काहीही कळण्याच्या अवस्थेत नसताना त्या सहज चॅट-जीपीटी एआयकडे वळल्या आणि त्यात त्यांचे प्रश्नावर प्रश्न टाकायला सुरुवात केली. आश्चर्य म्हणजे चॅट-जीपीटीने एखादा घरचा पर्सनल डॉक्टर असावा असे त्यांना त्यांचे पर्याय अनेक उदाहरणे देऊन अगदी विस्तृतपणे स्पष्ट केले. त्यांचे किचकट बायोप्सी रिपोर्ट अगदी सोप्या भाषेत समजावले आणि त्यांना खूप दिलासा दिला. शिवाय त्यांच्या वैद्यकीय टीमला विचारण्यासाठी योग्य ते प्रश्नहि तयार



करून दिले. संपूर्ण प्रवासात ए-आय त्यांचा साथीदार बनला.

ही सगळी कहाणी चॅट-जीपीटी मागच्या OpenAI कंपनीच्या ऑगस्ट मधल्या कार्यक्रमात जगासमोर आली. CEO सॅम अल्टमन यांनी कॅरोलिन आणि त्यांचे पती यांची प्रकट मुलाखत प्रकाशित केली आणि ती पाहून आणि ऐकून अनेकांनी सोशल मीडियावर स्वतःचे असेच अनुभव शेअर केले. ह्या उदाहरणामुळे एआय कसे रुग्णांना स्वतःला शिक्षित व्हायला आणि स्वतःच्या काळजीसाठी त्यांचा हक्क मांडण्यास मदत करू शकते हे दिसून आलं. पण त्यानिमित्ताने ए-आय अजूनही पुढे कशी मदत करू शकते याचंही कुतुहूल वाढलं.

एआयची व्याप्ती सर्वच क्षेत्रांत वाढत आहे पण ते आल्यापासून अगदी एकाच वर्षात आरोग्यसेवेच्या जगात खरंच क्रांती घडवतंय! विशेषतः एआयमुळे येणाऱ्या आरोग्य सुधारणांसाठी तरी ह्या तंत्रज्ञानाचा डोळसपणे अवतार करायला हवा. रुग्णांनी स्वतःच्या आरोग्याचं स्वतः नियंत्रण घेण्यापासून ते अगदी कर्करोगासारख्या गंभीर आजारांवर उपचार करण्यापर्यंत एआय तंत्रज्ञान आता एक जबरदस्त वरदान बनू शकतं.

**फिटनेस मॉनिटरिंग**: आपल्या आयुष्यात ए-आय चा शिरकाव आधी फिटनेस ॲप्स मध्ये झाला. आजकाल अँपल वॉच किंवा फिटबीट सारखी डिव्हाइसेस ए-आयचा वापर करून हृदयाचे ठोके, झोप, फिटनेस तपासतात आणि ॲट्रियल फायब्रिलेशन किंवा 'स्लीप-ॲप्निया'ची लक्षणं लवकर दाखवतात. अनेकजण दंडावर ग्लुकोज मॉनिटर लावून त्यांना स्वतःला नक्की कुठल्या वेळी, कुठल्या पदार्थांनी, आणि कोणती आक्टिविटी केल्यावर शुगर कमी-जास्त होते याची नोंद घेतात. "तुमची शुगर सध्या जास्त आहे, थोडी शतपावली करा", किंवा "अमुक हि गोष्ट रात्री झोपताना खाऊ नका" असा सल्ला नेमक्या वेळी देऊ शकतात. त्यामुळे "प्रिव्हेंशन इज बेटर दॅन क्युअर' हे तत्व सत्यात उतरत आहे.

**सिम्प्टम चेकर:** काही लक्षणे आढळली तर डॉक्टर्स नसतानाही आज अनेक हेल्थ चॅटबॉट जगभरातल्या लाखो लोकांना ती तपासायला आणि योग्य ते संभाव्य प्राथमिक निदान, सल्ला व उपचार शोधायला मदत करताहेत. काहीजण रोग निदान करण्यासाठी ए-आयसोबत त्यांचे ब्लड रिपोर्ट्स शेअर करतात. अलीकडेच एका पालकांनी त्यांच्या मुलाच्या दुर्मिळ आजाराचे रिपोर्ट्स ए-आयला दिले आणि त्यातून डॉक्टरांच्या नजरेतून सुटलेलं निदान करायला मदत झाली. अर्थात संपूर्णपणे त्यांच्यावर अवलंबून राहणे योग्य नसलं तरी



डॉक्टर नसेल तेथे किंवा दवाखान्यात जाईतोवर त्यांचा नक्कीच चांगला उपयोग होऊ शकतो. याशिवाय आता ए-आय मुळे वर्षानुवर्षांच्या सर्व हेल्थ-डेटाचं संकलन करून एखाद्याची एकूण आरोग्य क्षमता अगदी चांगल्या प्रकारे पडताळता येऊ शकते. अनेक ठिकाणी नवीन पेशंटच्या पहिल्या भेटीत डॉक्टरांनी हा डेटा मागायला सुरुवात केली आहे.

ह्या आणि अश्या मॉडेल्स साठी न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन आणि त्यासारखी वैद्यकीय क्षेत्रातली इतर मान्यवर जर्नल्स ट्रेनिंगसाठी वापरली जात आहेत. याशिवाय करोडो लोकांच्या अनुभवावरून आणि डेटा वरून प्रशिक्षित केलेली अशी हि मॉडेल्स आता रोज आणखी 'हुशार आणि अनुभवी' होत आहेत. उदाहरणार्थ, २०२४ मध्ये स्टॅनफोर्ड विद्यापीठ आणि गुगल यांसारख्या संस्थांनी फक्त डोळे तपासून (रेटिनल स्कॅन) मधुमेहाचा आणि हृदयविकाराचा धोका लक्षणं सांगणारे अँप तयार केलं!

**डॉक्टरांचा असिस्टंट** : पेशंटच्या बाबतीत जे फायदे होत आहेत, तसेच ते डॉक्टर्सनाही त्यांच्या कामात लागू आहेत.ए-आय-चलित चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल हेल्थ असिस्टंट्स आता डॉक्टरांनाही आता हातातल्या केससाठी वैयक्तिक सल्ले देतात; पेशंटच्या अवघड केसेस सोडवायला आणि जटिल वैद्यकीय निर्णय घ्यायला मदत करतात. ही साधनं वैद्यकीय माहिती, रुग्णांचा डेटा आणि स्मार्टवॉचसारख्या डिव्हाइसेसचा रिअल-टाइम डेटा तपासून योग्य सल्ला देतात. त्यामुळे हजारो पेशंट्सना तपासत असताना तज्ञ डॉक्टरांचाही गोंधळ उडत नाही.

याशिवाय पाश्चिमात्त्य देशांत डॉक्टरांचा बराच वेळ पेशंट समरी तयार करणे आणि नोट्स ठेवणे यांत जातो. आता ए-आय मुळे बोली भाषा वापरून रुग्णांच्या रेकॉर्डस ते सहजरीत्या हाताळू शकतात. अलीकडेच अमेरिकेतली सर्वात मोठी इलेक्ट्रॉनिक हेल्थ रेकॉर्ड फर्म एपिक यांनी मायक्रोसॉफ्टच्या 'ऑडिओ ट्रान्सक्रिप्शन टूल्स' वापरून डॉक्टरांचा कामाचा भार कमी करण्याची घोषणा केली त्यामुळे डॉक्टरांना रुग्णांशी त्यांचे संभाषण रेकॉर्ड करण्यासाठी मदत होईल.

**पारंगत रेडिओलॉजिस्ट:** पेशंट हॉस्पिटलमध्ये आल्यानंतरही एआयची अल्गोरिदम्स एक्स-रे, अल्ट्रासाऊंड, इलेक्ट्रॉनिक हेल्थ रेकॉर्ड्स (EHRs) आणि जीनोमिक डेटा तपासून मानवाच्या नजरेतून

निसटणाऱ्या गोष्टी बारकाईने शोधून काढतात. विशेषतः रेडिओलॉजी, पॅथॉलॉजी आणि ऑन्कोलॉजी सारख्या क्षेत्रात याचा खूप फायदा होतो आहे. गुगल हेल्थच्या डीपमाईंड एआयने तर मॅमोग्राममधून कर्करोग शोधण्यात मानवी रेडिओलॉजिस्ट्स पेक्षा जास्त अचूक कामगिरी केली. यामुळे चुकीच्या निदानांचं प्रमाण कमी झालं आणि लवकर उपचार शक्य झाले. याचा अर्थ एआय तंत्रज्ञान आरोग्य कर्मचाऱ्यांचेही काम अचूक, गतिमान आणि कार्यक्षम बनवतं आहे.

**औषध संशोधकांचा मदतनीस:** औषध उद्योगाला त्यांच्या संशोधन विकासासाठी प्रचंड खर्च आणि वेळेचा सामना करावा लागतो. बरीच पारंपरिक औषधे बनवायला आणि त्याच्या क्लिनिकल चाचण्या करून मान्यता मिळवायला साधारण १२ ते १५ वर्षे आणि अब्जावधी डॉलर्स लागतात. असे असले तरीही प्रायोगिक औषधांपैकी फक्त १०% औषधं बाजारात पोहोचतात. ए-आय आल्यापासून मात्र आता औषधांची आण्विक संयुगे तपासून, दुष्परिणामांचा आधीच अंदाज घेऊन आणि क्लिनिकल चाचण्यांसाठी योग्य ते संयुग निवडून अप्रूव्हल्सचा वेग वाढवतं आहे. ह्यामुळे औषधातले रेणू जैविक लक्ष्यांशी कसे काम करतील याचा अंदाज लावता येतो आणि क्लिनिकल चाचण्याही सुटसुटीत होतात.

**दुर्धर रोगांचा निवारक :** कर्करोग, हृदयरोग, मधुमेह आणि मेंदूच्या आजारांमध्ये लवकर निदान होणे अत्यंत महत्वाचं असतं. ह्या सर्व व्याधी हे आजचं जगभरात मृत्यूचं एक मोठं कारण आहे. या सर्व आजारांमध्ये अगदी जलद निदानापासून ते वैयक्तिकृत उपचारांपर्यंत ए-आय या रोगांशी लढण्याची पद्धत बदलतंय. मोठमोठ्या टेक आणि हेल्थकेअर कंपन्या आता ह्यांत उतरल्या आहेत. प्रचंड गुंतवणूक करून याबाबतीतले मशीन लर्निंग मॉडेल्स, इमेजिंग, जीनोमिक व प्रोटिओमिक डेटा तपासून, तसेच वेरेबल्स आणि जेनेटिक स्क्रीनिंगमधला डेटा तपासून रोगांचा लवकर व अचूक शोध लागतो आहे. विशेषतः कर्करोगासारख्या भयानक रोगांमध्ये अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर त्याचं निदान करून ताबडतोब प्रभावी उपचार करता येतील.

या प्रयत्नांच्या यशाच्या बातम्या यायला सुरुवात झाली आहे. सध्याच फ्रीनोम कंपनीच्या रक्त-आधारित चाचणीने मशीन लर्निंग वापरून कोलोरेक्टल कर्करोगाची लक्षणं लवकर शोधली, ज्यामुळे कोलोनोस्कोपीसारख्या जटिल आणि त्रासदायी प्रक्रियेची गरज कमी झाली. २०२४ मध्ये गुगल डीपमाईंड च्या अल्फा-फोल्डने प्रथिनांच्या संरचनेचा अंदाज लावून जीवशास्त्रातली एक मोठी समस्या सोडवली. यामुळे अल्झायमर आणि कर्करोगासारख्या आजारांसाठी औषध शोधणं जलद झालं. उदाहरणार्थ, इनसिलिको मेडिसिनसारख्या कंपन्यांनी अल्फा-फोल्डच्या मदतीने कर्करोगाच्या नव्या उपचारांची रचना काही महिन्यांत केली, ज्याला आधी वर्षानुवर्षे लागायची. २०२३ मध्ये फायझर कंपनीने ऑकिन नावाच्या ए-आय प्लॅटफॉर्मसोबत काम करून कर्करोगाच्या उपचारांना प्रतिसाद देणारे रुग्ण ओळखले, ज्यामुळे चाचण्यांचं काम सोपं आणि यशस्वी झालं. २०२४ मधील ग्रेल कंपनीची गॅलेरी ब्लड टेस्ट रक्तातल्या डीएनए तुकड्यांचं विश्लेषण करून एकाच टेस्टमध्ये ५० पेक्षा जास्त कर्करोगांचा शोध घेते, आणि तेही लक्षणं दिसण्यापूर्वी. प्रारंभिक चाचण्यांमधून दिसलं की पॅनक्रिएटिक आणि ओव्हेरियन कर्करोगासारखे कठीण कर्करोग ९९% अचूकतेने शोधता येतात. चांगली गोष्ट म्हणजे अमेरिकेत इन्शुरन्स कंपन्यांनीही अश्या टेस्ट्सला मान्यता दिली आहे, म्हणजे त्यांचा पुढचा खर्च आणि पेशंटचा पुढचा त्रास दोन्ही वाचतील. ए-आय वैयक्तिकृत उपचारांमुळे कर्करोगाच्या लढाईतही क्रांती आणतंय. रुग्णाच्या जेनेटिक प्रोफाइल, ट्यूमरची वैशिष्ट्यं आणि उपचारांचा इतिहास तपासून ते योग्य उपचार सुचवतं. तसेच अल्झायमरसाठी बायोजेनने २०२४ मध्ये बनवलेली ए-आय मॉडेल्स मेंदूच्या स्कॅन आणि डेटा तपासून रोग नक्की किती पसरला आहे हे सांगतात. हृदयरोगात हार्टफ्लोसारख्या कंपनीची साधनं सीटी स्कॅन वापरून धमनी अडथळ्यांचं निरीक्षण करतात. शिवाय हे तंत्र संभाव्य गुंतागुंत आणि पुन्हा त्रासाची शक्यता यांचं आधीच भाकित करतं, ज्यामुळे डॉक्टरांना सक्रियपणे काळजी घेता येते. विशाल, गुंतागुंतीच्या डेटा सेट हाताळण्याची एआयची अद्वितीय क्षमता म्हणजे पूर्वी बायोमेडिकल गुंतागुंतीने झाकलेली नेमकी कारणे अखेर समोर येत आहेत.

**आव्हाने आणि संधी:** ए-आयचं भविष्य उज्ज्वल आणि ताकद अफाट आहे. ह्या क्षेत्रातली गुंतवणुक कितीतरी पटींनी वाढून अनके अब्जांपर्यंत गेली आहे, त्यामुळे पुढे चांगले दिवस नक्कीच आहेत. त्याच्या क्षमतेवरचा विश्वासही वाढला आहे - अगदी सरकारं, संस्था, डॉक्टर्स, पेशंट्स, आणि बायोमेडिकल कंपन्या अश्या सर्वांकडून उत्साह दिसतो आहे. पण ह्या मार्गात काही अनेक अडचणीही असणार आहेत. डेटा गोपनीयता, अल्गोरिदममधला नकळत पक्षपात वा असुसंगती, आणि अजूनही येऊ घातलेले प्रचंड रेग्युलेटरी अडथळे ह्या सगळ्यावर मात करावी लागेल. हि मॉडेल्स विविध खंडातल्या लोकसंख्येवर आणि सर्वसमावेशक डेटावर प्रशिक्षित असावीत, नाहीतर काही ठिकाणच्या मानव प्रजातींवर चुकीचा परिणाम होऊ शकतो. आफ्रिकेतल्या लोकांवर चालणारं औषध

आशियामध्ये चालेलच असे नाही. प्रत्येकाची तब्येत वेगळी. त्यामुळे त्या-त्या देशांत आणि विविध डेमोग्राफीसाठी चाचण्या करणे अजून तरी टाळता येणार नाही. रोजच्या वैद्यकीय कामात सामावून घ्यायला डॉक्टरांचं प्रशिक्षण आणि रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी मजबूत नियमही हवेत. तसेच मशीन्स मधून डेटा हॅक होऊ नये म्हणून खूप काळजी घ्यावी लागेल. काहीवेळा मशीन्सवर पूर्ण अवलंबून राहिल्यामुळे आपला कंट्रोल सुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. इंटेलिजन्ट मशीन्स हे आपले वरदान जरी असलं तरी त्याचा भस्मासुर होऊ नये म्हणून आपण काळजी घेणं अत्यंत आवश्यक आहे.

- **संदीप कामत**, सॅन डिएगो, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## ऋतुरंग

नदीचा किनारा मनाचा निवारा सभोताली या पांगलेल्या दिशा
निळेशार पाणी खुळ्या गर्द रानी भिने आत हिरवी निळी ही नशा

निळ्या या नशेच्या निळाईत मिसळे ऋतुचा नवा रंग हा केशरी
कुठे रक्तवर्णी कुठे पीतपर्णी पिसारे जणू हे तरुंच्या शिरी

हवा सर्द थोडी कुठे गर्द झाडी नि पानांतूनी रंग झरती असे
रंगांत त्या रंगूनी धुंद होती तळ्यांचे पहा हे कसे आरसे

क्षणाचाच आहे परि खेळ सारा, उद्या ना इथे रंग हे साजरे
उरे श्वेतवस्त्रावृता ही धरा लुप्त हो गालीचे हे हसू लाजरे

उद्याच्या उद्याची परि नित्य आशा वसे या ऋतूच्या सदा अंतरी
वसंतात शालू फुलांचा धरेला, नवा साज सांकुर वृक्षांवरी

व्यथा वेदनांच्याच गर्भात वाढे उद्याच्या सुखाचा दिलासा नवा
उषेच्याच आशेवरी काळरात्रीस तेवे मनी चांदण्याचा दिवा

- **स्वप्निल देशपांडे,** कॅन्सस सिटी, कॅन्सस

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## मुक्तता....

संध्याकाळ झाली होती. काळोख पडलेला होता. घरी किशोर एकटाच होता. इतका उशीर झाला तरी कविता घरी आली नाही ह्याची त्याला काळजी वाटत होती. उशीर होईल असं काही कविताने सकाळी सांगितलेलं नव्हतं, ना ऑफिस मधून फोन करून तसा निरोप दिला होता. बरं आता किशोर तिला सारखा फोन लावत होता पण फोन काही लागत नव्हता. काय झालं असेल, अजून किती वेळ लागेल असा विचार करून किशोरला आणखी काळजी वाटू लागली. कविता काय किंवा किशोर काय दोघंही सगळे निरोप एकमेकांना अगदी वेळेत देत असतात. घरातून निघताना पूर्ण दिवसाचा कार्यक्रम सांगणं, कामाविषयी चर्चा करणं, काही बदल झाला तर फोन किंवा मेसेज करणं अशी शिस्त त्यांनी स्वतःला लावून घेतलेली होती. म्हणूनच आज काय कारण आहे नेमकं ज्यामुळे इतका उशीर झाला की आता जेवणाची वेळ होत आली.... ह्या विचाराने किशोर जरा काळजीत होता. पण हरकत नाही, येईल कविता तोपर्यंत मस्त खिचडी करू म्हणजे कविता आली रे आली की लगेच जेवता येईल ह्या विचाराने किशोर कामाला लागला.

किशोर आणि कविता एक प्रथितयश दाम्पत्य जे गेले तीस वर्ष अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. त्यामुळे आता पन्नाशी उलटून निवृत्तीकडे येत चालले होते. दोघंही करिअर ओरिएंटेड असे असल्यामुळे खूप वर्षांपूर्वी संधी मिळाली म्हणून अमेरिकेत आले. काम करत करत इथेच स्थायिक झाले. संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेले दोघं अतिशय छान सुस्वभावी आणि मनमिळावू होते. इथे त्यांनी त्यांचं चांगलं बस्तान बसवलं होतं. आपलं आपलं वर्तुळ तयार केलं होतं.

काही वेळ झाला होता. तितक्यात दाराची बेल वाजली. किशोरने दार उघडलं, कविता आली होती. आल्या आल्या त्याने विचारलं "अगं काय ? किती उशीर ? कुठे होतीस ? मी किती वेळा फोन लावला. लागलाच नाही. तुझाही फोन नाही की मेसेज नाही. बरं सकाळी देखील काही कल्पना दिली नव्हतीस उशीर होईल म्हणून." किशोरची प्रश्नावली अगदी रास्त होती. कारण सध्या तिथे कडाक्याचा हिवाळा सुरू होता. वेळी अवेळी पाऊस पडतो. चार वाजल्यापासून अंधारून येतं. बर्फवृष्टी झाल्यामुळे रस्त्यावरून गाडी चालवणं देखील अवघड झालेलं असतं. त्यामुळे हे असे प्रश्न पडणं स्वाभाविक होतं.

कविता मात्र जरा हरवल्यासारखी दिसत होती. ती येऊन शांत बसली. किशोरने तिला पाणी दिलं आणि नक्की काय झालं ? हे ऐकायला आता तो उतावळा झालेला होता. कविताने किशोरला सांगितलं "आज घरी परत येत असताना साधारण मध्येच काही अंतरावर मी एक अपघात पाहिला." आता किशोरला लक्षात आलं की त्या सगळ्यामुळे कविताला यायला उशीर झाला आणि त्या घटनेमुळे ती जरा उदास आहे.

नंतर दोघंही जेवले आणि झोपी गेले. सकाळ झाली. आता आपापल्या कामाला जायची तयारी सुरू झाली. पण कविता अजूनही त्या धक्क्यातून सावरलेली नव्हती. ती किशोरला म्हणाली.... खरं तर तिने आग्रहच धरला की आपण लवकरात लवकर मुंबईला जाऊया. असं अचानक आत्ता मुंबईला कशाला जायचं हेच किशोरला कळलं नाही. इतक्या लवकर रजा तरी मिळायला हवी. बरं आता मुंबईत असतं कोण ? दोघांचेही आई वडील आता हयात नाहीत. मग लगेच मुंबईत का जायचं आहे असं त्याने कविताला विचारलं.

पण कविता फार काही समजावत बसण्याच्या मनस्थितीत नव्हती. तात्काळ प्रकारची रजा काढून, तिकीट काढून दोघेही अखेरीस मुंबईच्या घरी आले. तिथे आल्यावर तर कविता अधिकच हळवी झाली. किशोरला वाटलं कदाचित शेवटी आपलं ते आपलं.... मग तो देश असूदे, शहर असूदे की असं घर ! पण कविता मात्र भूतकाळात हरवली. जुन्या आठवणी, घटना, प्रसंग तिला आठवत होते. ते आठवून आठवून ती किशोरला सांगत होती.

किशोर मात्र जरा अजूनही आश्चर्यात होता. कालचा तो अपघात, कविताचं उदास होणं, तडकाफडकी मुंबईत येणं, आठवणींमध्ये हरवून जाणं हे काय घडत आहे तेही इतक्या पटपट, एका मागोमाग एक. ह्या विचाराने तो जरा डिस्टर्बच झाला होता. इतक्यात कविता इमोशनल होऊन जवळ जवळ रडू लागली. आता तर किशोर अजूनच चक्रावला. काय झालं आहे नक्की ? ते समजत नसल्याने जरा हैराण देखील झाला. कविता त्याला सांगत होती "मी ह्या जगात नसेन तेव्हा तू हे कर ते कर.... हे करू नकोस ते करू नकोस." कविता आत्ताच निरवा निरवीची भाषा का बोलत आहे नवीन कोडं किशोरला पडलं.

त्याने थेटच कविताला सावरत विचारलं "अगं नक्की काय झालं आहे ? तुला इतका का परिणाम झाला आहे ?" ती म्हणाली "कारण कितीतरी गोष्टी सांगायच्या राहून गेल्या आहेत. त्या आता सांगायची वेळ आली." हे असं काहीतरी ऐकल्यावर किशोर म्हणाला "तू इतकं पुढचं का बोलत आहेस ? अजून खूप वेळ आहे आपल्याकडे. बोलू की निवांत. तो अपघात बघितल्या पासून तू अशी वेगळीच वागत आहेस. असं इतकं वेगळं वागायला काय झालं ?" त्यावर कविताने दिलेल्या उत्तराला ऐकून किशोर हादरून गेला.... ती म्हणाली "मी जो अपघात बघितला होता तो माझाच होता !"

**- अंकिता कार्ले,** हार्टफर्ड, कनेक्टीकट

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## प्रिय बाबा

मी तुमचा शत्रू नाही की तुम्ही माझे विलन नाही
बाप-मुलाचं आपलं नातं, त्यात कसला वादच नाही
आपल्या सुंदर नात्यामध्ये एक चूक घडतेय मात्र,
त्या चुकीचं अस्तित्वच तुमच्या मनास मान्य नाही

तुमची सगळी स्वप्नं तुम्ही, माझ्यामध्ये शोधू पाहताय
जगलेलं तुमचं आयुष्य, माझ्यावरती लादू पाहताय
माझ्या स्वतंत्र आयुष्याचं भानच तुम्हास राहिलं नाही
सगळे रंग तुमच्यासारखेच मला तुम्ही देऊ पाहताय

तुमच्या वहाणा घालून बाबा, वाट सोप्पी होईल का??
तुमच्या चारशे पावसाळ्यांची मदत मला होईल का??
तुमच्या माझ्या आयुष्याची गणितं वेगळी असताना
तुमची सूत्रं सारखेपणानं वापरून ती सुटतील का??

तुमचा काळ वेगळा होता, माझी वेळ वेगळी आहे
तुमच्या वेळच्या वेदनांची, जात आता वेगळी आहे
ठेचकाळताना मन माझं, साद तुम्हांस घालणार आहे
तुमच्या माझ्या नात्यातली हीच गमंत सगळी आहे.

**- सारिका मतकर,** वरळी, मुंबई, महाराष्ट्र



## २१ व्या शतकातील गुरू

भारतात गुरू म्हणजे केवळ शिक्षक नव्हे, तर तो एक प्रेरणादाता आणि जीवनदृष्टी देणारा मार्गदर्शक असतो. कालानुरूप गुरूचे स्वरूप जरी बदलले, तरी त्याचे महत्त्व कायम आहे.

२१ व्या शतकात गुरूची भूमिका अधिक व्यापक, गुंतागुंतीची आणि तांत्रिक झाली. २१ वे शतक, माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग... विद्यार्थ्यांच्या हातात मोबाईल, इंटरनेट मधून माहितीचा महासागर आहे. अशा वेळी गुरूची भूमिका – योग्य माहितीची निवड, विश्लेषण, नीतीमूल्यांची समज देणारी हवी.

गुरू 'मार्गदर्शक तत्त्व' आहे, 'सर्च इंजिन' नाही. हे २१ व्या शतकातील विद्यार्थ्यांना समजत नाही.

आजचे गुरू शाळा, महाविद्यालयापुरते मर्यादित नाही. ते ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर, यूट्यूब शिक्षक, कोर्सेस घेणारे प्रशिक्षक, आत्मविकासाचे गुरू, मनोवैज्ञानिक सल्ला देणारे कोच आहे. हे आधुनिक गुरूंचे बदलते रूप... ते विविध माध्यमांतून ज्ञान पोचवतात. व्हिडिओ, पॉडकास्ट, लेख, वेबिनार इत्यादी.

आज विद्यार्थ्यांचे प्रश्न शैक्षणिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिक पातळ्यांवरचे खोल, गुंतागुंतीचे आहे. यामुळे तांत्रिक ज्ञान, संवाद कौशल्य, समजूतदारपणा, सहिष्णुता, आणि सतत शिकण्याची तयारी, इत्यादी कौशल्ये गुरूच्या ठाई असणे गरजेचे आहे. यातून २१ व्या शतकातील गुरूंची भूमिका 'फॅसिलिटेटर' किंवा 'मेंटॉर' ची झाली आहे. विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला चालना देणे, विचार करायला शिकवणे, योग्य दिशा दाखवणे, आणि शिकण्याची आवड निर्माण करणे, इत्यादी अपेक्षा आजच्या गुरूंकडून आहेत. यासाठी गुरू काळानुरूप सजग असायला हवा.

आज गुरूंच्या या बदललेल्या रूपांत 'वर्क विदाऊट अटॅचमेंट' हे आधुनिक तत्व काम करते. परंतु गुरू-शिष्यात 'आत्मीयता' हे मुलतत्व काम करतं. पण डिजिटल शिक्षणात हे नाते धूसर झाले.

योग्य गुरू हा विद्यार्थ्याच्या मनाचा ठाव घेतो, आणि त्या आधारावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाची घडण करतो.

शैक्षणिक गुरूंनी ज्ञानदाना बरोबर प्रेरणादाते, जीवनशैली घडवणारे, मार्गदर्शक असायला हवे. कारण गुरू केवळ उत्तर देत नाही, तर योग्य प्रश्न विचारायला शिकवतो. तो केवळ मार्ग दाखवत नाही, तर त्या मार्गावर स्वतः चालून दाखवतो.

बदलत्या युगात, गुरूंतत्वातील आत्मा आणि विद्यार्थ्यांची निष्ठा टिकून राहायला हवी, तरच शिक्षण ही प्रक्रिया माहिती देणारी न राहता, माणूस घडवणारी होईल. माणूस घडवणारी ही प्रक्रिया प्रत्येक युगातील सर्वकालीन गुरुतत्व आहे.

गुरू म्हणजे आयुष्याच्या मार्गावरचा प्रकाश दाखवणारा दीपस्तंभ...

प्राचीन काळी ऋषि, मुनि, आचार्य हे गुरू म्हणून शिष्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवत. परंतु २१ व्या शतकात गुरूच्या व्याख्येला आणि भूमिकेला एक नवा परिमाण लाभले आहे.

आजच्या युगात माहितीचा महापूर आहे. आंतरजाल, कृत्रिम बुद्धिमत्ता, समाज माध्यमे (सोशल मीडिया), या सर्वांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या आयुष्यात खोलवर होत आहे. प्रत्येकाच्या हातात माहिती आहे, पण तिचं ज्ञानात रूपांतर कोण करणार? हे काम आधुनिक गुरूंना करावे लागणार आहे. गुरू 'माहितीचा स्त्रोत' नसून 'सत्याचा शोध घेण्याचा, मार्ग दाखवणारा आहे, हे लक्षात आणून द्यायला हवे. २१ व्या शतकातील गुरू डिजिटल वर्गात आहे, झूमवरील चर्चेत आहे, यूट्यूबवरील शैक्षणिक चॅनलमध्ये आहे, कधी वर्कशॉप्सच्या स्टेजवर आहे. तो संवादात आहे, समुपदेशनात आहे, प्रेरणेत आहे.

गुणांसाठी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांला गुण मिळवून देतो. जीवनाचा अर्थ शोधणाऱ्याला जीवन समजवतो. अस्थिरतेच्या काळात आत्मविश्वास देतो. अशा वेगवेगळ्या भूमिकेतून गुरूंचे रूप अपेक्षित आहे. आजचा गुरू विचार करायला शिकवतो. शंकांचं स्वागत करतो, जिज्ञासेला खतपाणी घालतो, आणि मूल्यांचं बीजारोपणही करतो.

आजच्या गुरूने तांत्रिक ज्ञान आत्मसात केले असले तरी त्याच्या सहवेदना विद्यार्थ्यांपर्यंत पोचत नाही. गुरूंचा संयम, आणि सहिष्णुता विद्यार्थ्यांपर्यंत पोचायला हवा. ते पोहचले तर, घडणारे आयुष्य गुणांच्या पलीकडचे असेल...

या तंत्रज्ञानाच्या झगमगाटात गुरू-शिष्य नातं दुरावतयं... स्क्रीनमधून शिकताना, मानवी स्पर्श हरवतोय.. कारण खऱ्या गुरूची ऊर्जा ही त्याच्या नजरेत, स्पर्शात, शब्दांच्या जाणीवेत असते.

जो गुरू विद्यार्थ्याला शिक्षणासोबत जीवन जगायला शिकवतो, अशा गुरूचा आदर, विश्वास आणि आत्मिक बंध विद्यार्थ्यांबरोबर तयार होतो. हीच आपली खरी परंपरा आहे. जी काळाशी सुसंगत राहूनही हिंदू संस्कृतीची पखरण करते. ती आज २१ व्या शतकात जाणीवपूर्वक वृद्धिंगत करणे गरजेचे आहे.

- **माधूराज,** नागपूर, महाराष्ट्र

## हृदयस्पर्शी आठवणी

**अभय-** मला गाढ झोप लागली होती. बरेच दिवसात अशी झोप लागली नव्हती. रसिकाच्या आजारात झोप उडाली. रसिका शेजारीच झोपली होती. ती ओरडत उठली. तिचा आवाज ऐकून मी दचकून उठलो, रसिकाला हळूच हलवत म्हणालो,

'काय झाले, स्वप्न पडले का, दुखते आहे?'

तिला माझ्या डोळ्यातील काळजी दिसली.

"नाही, पण स्वप्न पडले." रसिका म्हणाली

"स्वप्न?"

"स्वप्नात मी धावत होते. अचानक कार आली. मला उडवले. छातीत दुखत होते म्हणून मी ओरडले! आणि जाग आली."

मला झालेल्या गोष्टी आठवल्या. रसिकाला व्हायरल इन्फेक्शन झाल होतं. ताप गेला, अशक्तपणा मात्र फारच होता. तो जाईल अशी अपेक्षा. महिना जाऊन कमी होईना. लंग्स क्लिअर, ऑक्सिजन, ब्लड काउंट, एक्सरे, ब्रीदिंग टेस्ट नॉर्मल. अस्थमाचे निदान झाले. इन्हेलर दिला. दम सुधारला नाही. चालताना मॅरेथॉन धावल्यासारखे वाटायचे.

रसिकाला हृदयाचा त्रास असेल असा संशय आला नव्हता. कार्डियोलॉजिस्ट अविनाशशी बोललो. एकोकार्डिओग्रॅम केला. त्याचा चेहरा गंभीर झाला. हृदयाचे पम्पिंग फक्त १५ %, त्यामुळे साध्या गोष्टी करताना श्वास लागायचा. मग स्ट्रेस टेस्ट, कार्डियाक कॅथेटर, जर काही ब्लॉकेज असेल तर ते स्टेंट टाकून सुधारता येईल ही अपेक्षा. ब्लॉकेज नव्हते. कार्डिओमायोपथी, दुबळे हृदय, कशामुळे, ह्याचे उत्तर नव्हते. महिन्यापूर्वी झालेल्या सर्दीला महत्व आले, अविनाशच्या मतानुसार व्हायरल इन्फेक्शन झाले. हृदयाला सूज येऊन अशक्त झाले. औषधे सुरु झाली. सुधारणा झाली नाही, तर ट्रान्सप्लांट करायला लागेल असेही सुचवण्यात आले. तीन महिने गेले. हार्ट ट्रान्सप्लांटच्या लिस्टवर टाकण्यात आले. त्यासाठी तपासण्या झाल्या. आता 'वाट' पाहायची. हार्ट ट्रान्सप्लांट म्हणजे हर्निया सारखे सोपे नव्हते.

दम लागणे अंग वळणी पडले. 'रोज मरे त्याला कोण रडे'. दुबळे हृदय, ventricular fibrillation होऊन अचानक मरण येऊ नये, त्यामुळे डिफिब्रिलेटर टाकला.

लक्षात एक गोष्ट आली. ट्रान्सप्लांटवर बोलताना रसिका अस्वथ होई. मी म्हणालो, तरुण वय, निष्णात सर्जन. देवाच्या कृपेने सर्व नीट होईल. ती म्हणाली,' आपल्याला हृदय मिळणे म्हणजे 'कोणी तरी मरणार ह्याची जाणीव होऊन मन अस्वस्थ होते'.' म्हणण्यात तथ्य होते. नव्या हृदयाची वाट पाहणे म्हणजे कोणाच्यातरी मरणाची वाट पाहणे, अश्यावेळी मी गीतेतील दाखला द्यायचो.' ज्याचे हृदय मिळेल तो 'तुझ्यामुळे ' मरत नाहीये.' कळत होते 'वळत' नव्हते.

एक दिवस फोन वाजला.

मी फोन घेतला. रसिकाच्या हृदयाला मॅच मिळाले आहे. एकदाका हृदय आणले की सर्जरी लगेच करायला लागणार. ताबडतोब या.

बॅग तयारच होती, हॉस्पिटलमध्ये गेलो. पुढचे दिवस कसे गेले देवास ठाऊक. सर्जरी यशस्वी झाली.

**रसिका-** साध्या सर्दीनंतर दम लागतो काय. तपासणीत कमजोर हृदय निघते. ट्रान्सप्लांट, हे वाईट स्वप्न तर नाही ना. आता ताण कमी झाला. मग मला 'ते' स्वप्न पडले आणि पुन्हा पुन्हा पडू लागले. झोप उडाली. रोज स्वप्न पडत नसे पण ते पडेल अश्या भितीनेच झोप येत नसे. काय करावे हे समजे ना.. काय स्वप्न पडते अभयने विचारता माझे दरवेळी तेच उत्तर, "मी गल्लीतून धावत होते, कार आली, मला उडवले!" अभय डॉक्टर असूनही बायकोचा आजार म्हटल्यावर तो हळवा व्हायचा.

**अभय-** ग्रह वक्री नक्कीच आहेत. आयुष्यात वादळ सुरु आहे. रसिकाच्या वीक हार्टने माझी झोप उडाली. हार्ट ट्रान्सप्लांट करावे लागेल कळल्यावर एक डोळा हसला, एक डोळा रडला. Bitter – Sweet अनुभव आला. सर्जरी झाल्यावर दिवस सुधारले असे वाटू लागले. आता रसिकाला 'ते ' स्वप्न पडू लागले. काय करावे ते समजेना. स्वप्न पडल्यावर जेव्हा ती जागी होत असे तेव्हा घामाने थबथबलेली असे. हार्ट रेट, ब्लड प्रेशर वाढायचे. हे नवीन हृदयाला पोषक नव्हते. पण करायचे काय? विचार आला अविनाशला फोन केला. तोही विचारात पडला. बरेच वेळा सर्जरीनंतर झोप उडते, पण हे स्वप्न, काय करावे सुचेना. त्याच्याकडे उत्तर नव्हते. मी नुसताच विचार केला नव्हता तर रिसर्च केला. मी विचारले, रसिकाचा डोनर कळू शकेल का?

"साधारणतः. डोनरची ओळख गुप्त असते. अश्या माहितीने स्वप्नाचे गूढ कसे उलगडणार?" त्याने विचारले. मी माझा रिसर्च सांगितला. कार्डियोलॉजिस्ट असल्याने माहिती काढून आणण्याचे ठरविले.

डोनरची परवानगी असल्यास माहिती मिळू शकते हे समजले. रसिकाला माझे संशोधन सांगितले. तिला नवल वाटले. डोनर सिएटलमधला, भेटायला तयार झाले.

**रसिका-** अभयने जेव्हा मला सांगितले की वारंवार तेच स्वप्न पडण्यामागे काहीतरी कारण आहे आणि त्याचा माझ्या ट्रान्सप्लांटशी संबंध आहे, तेव्हा माझा त्यावर विश्वास बसेना. मग त्याने अनेक केसेसबद्दल माहिती दाखवली.

५ वर्षाच्या मुलाला डोनर बद्दल विचारता तो म्हणाला, तो छोटा मुलगा आहे, त्याला पावररेंजर्स आवडतात मला आवडायचे आता आवडत नाहीत. डोनर, पावररेंजर्सशी खेळताना खिडकीतून पडून गेला. एका बाईला ट्रान्सप्लांट नंतर बिअर आणि तिखट मिरच्या आवडू लागल्या जश्या डोनरला आवडायच्या. थोडक्यात डोनरची मेमरी हार्ट ट्रान्सप्लांट बरोबर येते. त्यामुळे माझ्या डोनरच्या आयुष्याचा स्वप्नांशी संबंध असेल?

**अभय-** डोनरला भेटायचे ठरविले. मनात भीती होती. ह्यातून काय निघणार. विमानात हवा विरळ. काही त्रास होईल का? 'त्या' कुटुंबाची रिॲक्शन कशी असेल, बोलताना तर चांगली फॅमिली वाटत होती. मी तिकीट, हॉटेल बुक केले. मनात धाकधूक. विमानातून उतरलो. बॅगेज क्लेमकडे गेलो. ट्रान्सप्लांट केल्यामुळे रसिकाला दम लागत नव्हता.



**रसिका-** प्रवासाची तयारी, फ्लाईट, हॉटेल रिझर्व्हेशन. अभयनेच केले. सियाटलला उतरल्यावर बॅगेजक्लेमकडे चालू लागलो. फक्त कॅरी ऑन बॅग घेऊन चेक केली होती. वजन ओढायला नको.

'बॅग काढायला जाऊ नकोस.' त्याने दहा वेळा बजावले होते. मी महाराणीसारखी नुसतीच उभी होते. इकडे तिकडे पाहताना माझी नजर एका जोडप्याकडे गेली. ते नुसतेच उभे होते. ते प्रवासी नव्हते अशी शंका मला आली. अभयला बोलणार एवढ्यात बॅग दिसली. दीड दिवसाच्या गणपतीसारखे आम्ही दीड दिवस राहणार. मोठ्या बॅगेची जरूर काय? बॅग घेऊन अभय आला. त्याला माझी शंका सांगितली.

**अभय-** बॅग घेतली. रसिकाला म्हणालो उबर बोलावतो. तिने बाजूच्या जोडप्याबद्दल कुजबुजत सांगितले. कुजबुजायची जरुरी नव्हती. अमेरिकन्सला मराठी कळणे शक्य नव्हते. फोनवरच्या उबरच्या आयकॉनवर क्लीक करणार, तर ते आमच्याकडेच येताना दिसले.

' आपण कानडे का??' त्यांनी विचारले. उत्तर देत नाही असे पाहून म्हणाले,'मिशेल आमची मुलगी!'

डोक्यात प्रकाश पडला. हे मिशेलचे आई, वडील. मी रसिकाकडे पहिले. आम्ही मान डोलावली.

**रसिका-** माझी शंका खरी निघाली. काही कळायच्या आत तिने, मिसेस जॉन्सनने मला घट्ट मिठी मारली. काय करावे समजेना.' माझी गाडी आहे, घरी जाऊ'. ते म्हणाले. अभय म्हणाला, रूम बुक केली आहे, तुम्हाला त्रास कशाला? ते म्हणाले,"अहो त्रास कशाचा, तुम्ही आमच्या घरी आलात तर, आम्हाला आवडेल." काय उत्तर द्यावे, प्रश्न पडला मी अभयकडे पहिले.

**अभय-** त्यांना काय उत्तर द्यावे मला समजेना, रसिककडे पहिले, तर ती माझ्याकडेच, मी उत्तर देईन म्हणून पाहत होती. विचार केला, म्हणालो, आत्ता येतो, हॉटेलचे मग पाहू.

**रसिका-** आम्ही त्यांनाच भेटायला आलो होतो, पण एक प्रकारची बेचैनी वाटत होती. ह्यांची तरुण मुलगी गेली आणि मला जीवनाचे वरदान दिले.

फॅमिली रूममध्ये बसलो. डेबीने कॉफी बनवली. घरात मात्र माझी बेचैनी कमी झाली. मी ज्या कामासाठी आले होते तो प्रश्न विचारायचा होता. पण दुःखद प्रसंगाची आठवण काढून जखमेवरची खपली कशी काढायची?

**अभय-** सर्व सुरळीत चालले होते. मला मिशेलबद्दल विचारायचे होते. तिच्या जाण्याचा रसिकाच्या स्वप्नांशी संबंध असणार असे वाटत होते. पण विषय काढायचा कसा? डेबीने माझा प्रश्न सोडवला. चला तुम्हाला मिशेलची खोली दाखवते" म्हणाली. उठून तिच्या मागे गेलो.

'तिची' खोली विशीतल्या मुलीची असावी, तशीच होती आणि त्यांनी ती 'तशीच' ठेवली होती. भिंतीवर पोस्टर, डेस्कवर उघडे पुस्तक, बाजूला सेल फोन, खोली अशी होती की जशी काही मिशेल नुकतीच बाहेर गेलेली आहे. रसिकाकडे पहिले, ती ट्रान्स मध्ये होती. डेबी बोलत होती. मिशेलला इकडची वस्तू तिकडे झाल्याचे चालायचे नाही. मी ऐकत होतो पण रसिका कसल्यातरी धुंदीत होती. मी तिचा हात धरला, पण रिस्पॉन्स नाही. मला भिती वाटली. तेवढ्यात बाहेर कुत्रा भुंकू लागला म्हणून डेबी बाहेर गेली. मी रसिकाचा दंड धरला

आणि जोरात हलवले. 'रसिका' दबलेल्या पण ओरडून बोलतो आहे अश्या आवाजात हाक मारली. ती जागी झाली. डोळे आता नॉर्मल दिसत होते. डेबी परत आली. मी एक उसासा टाकला. रसिकाचा हात धरून रूममधून बाहेर आलो.

**रसिका-** काय झाले कळलेच नाही. खोलीत जाताना आठवत होते, नंतरचे ब्लँक. अभयने 'जागे' केले. आम्ही बाहेर आलो. आम्हाला मिशेलची गोष्ट कळली. गल्लीतून जॉगिंग करत रस्त्यावर आली आणि कारने तिला उडवले. अभय लक्ष देऊन ऐकत होता. आणि मी पण - पण मला ती गोष्ट माहीतच होती, का कशी, माहित नाही, पण मला ही अपघाताची गोष्ट माहित होती!!!!

**डॉ. शिरीष कीर्तने,** लॉंगवूड, फ्लॉरिडा

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## दरवळ

"दहा वर्षांच्या मुलाला तू एकटे सोडून जाशील का? तसेच आहे हे. ही नीड्स टू गो, ही कान्ट स्टे अलोन." डॉक्टर वेस्टमन त्यांच्या सोनेरी कडांच्या चष्म्याआडून शांतपणे शालिनीशी बोलत होते. त्या फिक्कट हस्तिदंती खोलीत ती कितीतरी तास बसली होती, आजही तसेच. डॉक्टर कोपर्डीकर, तिचे डॅड, इथे पेशन्ट होते. जगविख्यात शल्यविशारद, आता स्वतः रुग्ण, अल्झायमर्सचे.

स्टेज फोर, म्हणजे मनाने, स्मृतींनी केवळ साडे आठ ते दहा वर्षांच्या मुलासारखे वागणार होते. दोन दिवसांपूर्वी त्यांच्या घरातली वीज बंद करण्यात आली होती. ते बिल भरायला विसरून गेले होते. अंधारात मेणबत्ती लावायला गेले तर खुर्ची आणि कार्पेटवर ठिणगी उडून छोटीशी आग लागली. नशिबाने लागलीच मदत मिळाली. शालिनी त्यांच्या घरापासून अगदी दहाच मिनिटांवर राहत होती, म्हणून थोडक्यात निभले. शालिनी समोर आता दोन पर्याय होते, डॅडना अस्सिस्टेड लिव्हिंगमध्ये ठेवायचे किंवा तिच्या घरी न्यायचे. "लेट मी टेक हिम होम. इट्स फेस्टिव्ह टाइम, ही विल बी फाईन, राईट?"

शालिनी आशाळभूतपणे डॉक्टर वेस्टमनकडे बघत त्यांच्या मनाचा अंदाज घेत होती.

शेजारी बसलेले डॉक्टर कोपर्डीकर, निर्विकार चेहऱ्याने स्वतःच्या फुलारून आलेल्या हातावरल्या शिरा न्याहाळत होते. ह्या हातांमुळे हजारो, लाखो जीव वाचले असले तरी आता त्या हातांना त्याची अजिबात आठवण नव्हती. उलट सुलट नमस्कार केल्यासारखे करत ते बसून होते ढिम्म.

"हॅलो टीम. इट्स माय ऑनर टू प्रिझेन्ट बिफोर ..."

"व्हॉट द हेक शालू! प्लीज सी, व्हाय हॅव वी लॉस्ट द इंटरनेट..." अविची दोन्ही वाक्यं जोडून आली आणि त्यातील टिपेचा फरक लक्षात येताच शालिनी धावत आली. "काय रे? थांब बघते." खोलीच्या दाराशी डॅड दिसले, हातात घरातला राउटर. 'अहो डॅड...द्या ते...' वडिलांच्या हातून अलगद राउटर काढून घेतला, वरती अवि फोनच्या नेट वरून पुन्हा बोर्ड मिटिंगमध्ये शिरला होता, ह्याचा कानोसा घेत, राउटर पुन्हा जोडला आणि सगळे व्यवस्थित सुरु असल्याचा मेसेज त्याला करून ठेवला. "डॅड कशाला काढला राउटर? अविची महत्वाची मिटिंग सुरु आहे." डाव्या भुवईचे टोक प्रश्नचिन्हासारखे उगारत, ते तोंडातल्या तोंडात बोलू लागले, "मी आय-पॅडवर वाचलं, लेटेस्ट रिसर्च, ज्या खोलीत राउटर असतो, तिथे कार्सिनोजेन्स तयार होतात, नकोच घरात आपल्या. घरात नकोय असलं काही. काढून टाकला मी तो..."

त्यांच्यातल्या निष्णात तज्ञाचे कौतुक करावे, बुद्धिमान माणसाचा मान ठेवावा का ह्या गोंधळलेल्या मुलाला छातीशी धरावे, शालिनीला एक क्षण काहीच सुचेना. बाप म्हणावे तर डोळ्यात इतकी पुसट ओळख त्या नात्याची की फक्त देहाने ते इथे होते, मनाने, स्मृतीने ते केव्हाच इंद्रधनुषी पंखावर स्वार होऊन निघून गेले होते. पूर्ण नाहीसे झाले नव्हते, पूर्ण उरले नव्हते. हतबुद्ध होऊन त्यांच्याकडे बघत ती हळूच हात धरून त्यांना लिव्हिंग एरियामध्ये घेऊन आली. आईचे जुनेच वाक्य अगरबत्तीच्या धुराच्या लकेरीसारखे मनात दरवळत होते, "तुला तुझा डॅड कितीही लाडाचा वाटला नं, तरी त्याला सांभाळणे महाकठीण बरं, एक वेळ तुला मी परवडेन..." म्हणा तशी वेळ आलीच नाही, आई इतक्या अचानक गेली, ताप, मेननजायटिस आणि थेट मृत्यू. मधली सतरा वर्षे कशी गेली होती, कोणास ठाऊक. शालिनी अनाथ होती का नव्हती, तिलाच नीटसे उमगले नव्हते, मात्र गेली आठ वर्ष तिला सतत एकटं वाटत होतं, एकुलती एक होतीच ती, पण ह्या अल्झामर्सच्या वाटेवर एकटीच सोबत करत होती तिच्या डॅडला. थकली होती खरेतर. पन्नाशी उलटली होती, घरातून अव्हिक गेल्यावर, आता मनाला येईल तसे काही करावे, काय ते सुचायच्या आधीच तिच्या बाबांचे हे डायग्नोसिस पुढ्यात आलेले.

"शालू, यार..." अविपाशी ती रात्री साडे अकराच्या सुमारास आली. खोलीतला दिवा मंद होता, पंखा नेहेमीपेक्षा हळू फिरत होता बहुदा. अवि काय बोलणार ह्याचा अंदाज होताच तिला, तरी कुठे मनात थोडी अपेक्षा होती, त्यानं समजून घ्यावं. "बोर्ड मीटिंग?"

तिच्या पायावरच्या पांघरुणाचा त्रिकोण खेचत तो चक्क पाठ करून झोपून गेला.

त्याच्या उघड्या दंडावर किंचित गार हात ठेवत ती बोलू लागली, "अवि त्यांना नाही रे काही कळत, मुद्दाम नाही करत. डॉक्टर वेस्टमन म्हणत होते आता डॅड  जेमतेम साडे आठ किंवा दहा वर्षांचे आहेत, स्मृतींमध्ये...ही इज जस्ट लाईक अ चाईल्ड..."

"नॉट माय चाईल्ड शालू, नॉट टुडे... खूप महत्वाची मिटिंग होती, मी नेली वेळ मारून पण हे असं किती वर्ष सहन करणार आहोत आपण? आपल्या रिटायरमेंटचा हा प्लॅन नसू शकतो. तीन वर्षात मी रिटायर होईन तेव्हा ते डायपरमधले बाळ होतील, मग? एनीवे, मेक शुअर, परत असा काही गोंधळ होता कामा नये. मी इतका कठोर नाही गं, तुझी किती ओढाताण होते, बघवत नाही." त्याच्या समोरच्या भिंतीशी बोलत त्याचा आवाज विरत गेला अंधारात. पंख्यातल्या खिन्न पिवळ्या उजेडाकडे शालिनी टक लावून बघत होती, कढत अश्रू गालावरून मानेवर ओघळत होते. आवाज नव्हताच फुटत तिचा, टाहो फोडावा असे खूप होते, पण कोणासमोर? शेजारी पहुडलेल्या तिच्या नवऱ्याकडे बघत तिला लक्षात आले, संसारात, वर्षाच्या खूप समिधा पडल्या की त्यांचा धूर डोळ्याला बोचेनासा होतो किंवा तसेच पाझरत्या डोळ्यांनी बघण्याची सवय होऊन जाते. डॅडना तरी कुठे आई आठवते? इतक्या वर्षांच्या संसारानंतर जर स्मृती मिटल्या तर त्यात तुमचे प्रेम पण पुसले जाणार. काहीच शाश्वत नाही. प्रेम. स्मृती. डोक्यावरले आई वडिलांचे छत्र. सगळे तरंग.

"ऐक ना अवि, पुढल्या आठवड्यात दिवाळी, साने काकू म्हणत होत्या, त्यांच्या ग्रुपला श्री सूक्त म्हणायचे आहे, आपल्या घरी. पंधराजणी आहेत, इथेच बे एरियातल्या. लक्ष्मीपूजन आणि नरक चतुर्दशी पुढे मागे आलेत तर सकाळी अभ्यंग, संध्याकाळी लक्ष्मीपूजन आणि श्री सूक्त असं म्हणत आहेत...चालेल ना?" अविच्या संथ घोरण्यात तिने तिच्यापुरता होकार शोधला आणि दोघांच्या कॅलेंडरवर त्याचे नोटिफिकेशन पाठवून दिले.

त्यांच्या पाठीवरल्या पिकलेल्या केसांना बघून शालिनी गहिवरली एक क्षण. देखणा असलेला तिचा डॅड आता खरेच म्हातारा आणि विकल झाला होता. वृद्धत्व जवळच्यांनी मान्य केलं की सुरु होत असावं. तिने कोमट तेल हलक्या हाताने चोळले त्यांच्या पाठीवर. टाळूवर थोडे तेल ओतले तसे अनाहूत शहारलेच. आजकाल फार बोलत नसत, गप्प गप्प एकदम. जेवायला बोलावलं की येत, थोडेसे काही खात आणि गोड दिसले ताटात की स्वारी खुश असे. घश्यातला हुंदका निकराने मागे सारत तिने बाबांना थोडे उटणे लावले, ओवाळताना निरांजनाच्या ज्योती लककल्या एक क्षण डोळ्यात त्यांच्या आणि फुलबाजीने ओवाळलं तर लहानमुलांसारख्या टाळ्या पिटल्या. अवि अजून गाढ झोपेतच होता, नाहीतर कदाचित त्याने त्यांचा असा व्हिडियो काढून ठेवला असता. मृत्यूची धास्ती विचित्र असते, जिवंत क्षण कैद करून ठेवण्याची पराकाष्टा करत राहतात माणसं. आज छान अंघोळ घालून घेतली डॅडनी.

संध्याकाळी पूजा झाली तोवर शांत शांत मागे मागेच होते, मात्र सगळ्याजणी श्री सूक्त म्हणू लागल्या तसे उभे राहिले. शालिनी समोरच्या ताम्हणात थोड्या थोड्या अक्षता टाकत होती, आणि श्री सूक्ताचे अदृश्य बोल तिला मायेने कुरवाळत होते, डोळे मिटून ती त्या अदृश्यात आधार शोधत राहिली.

ऋणरोगादिदारिद्र्यपापक्षुदपमृत्यवः ।<br>
भयशोकमनस्तापा नश्यन्तु मम सर्वदा... श्लोक सुरु झाला, त्यात एक परिचित खडा स्वर मिसळू लागला, डॅडचा! पहिल्यांदा तिला समजेचना, कसं शक्य आहे? मग तिला अविच्या पावलांची चाहूल लागली, तो बहुदा व्हिडीओ करत होता, डॅडचा...

य एवं वेद ।<br>
ॐ महादेव्यै च विद्महे विष्णुपत्नी च धीमहि ।<br>
तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात्<br>
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥३७॥

धीरगंभीर तरी पोरसवदा लयीत त्यांच्या तोंडून अवघे श्री सूक्त आले! "माझ्या आईने मला शिकवलं, लक्षात आहे माझ्या, सगळं लक्षात आहे...." इतके म्हणून ते मट्कन खाली बसले.

शालिनीच्या डोळ्यात समोरच्या समईचे तेज लकाकू लागले, तांबरलेला नाकाचा शेंडा आणि मिटल्या हाताने ती तशीच बसून राहिली. यंदा दिवाळीत, तिच्या ओटीत आज काही क्षण का होईना समृद्धी आली होती.

- **प्राजक्ता पाडगांवकर,** अटलांटा, जॉर्जिया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## राजगिरा लाडू



यंदाच्या दिवाळीत बिना साखर, बिना गिल्ट गोड खाण्याचा आनंद! आपला पारंपारिकपणा जपून आजच्या जीवनशैलीला पूरक असे पौष्टिक लाडू!

**साहित्य-** २ कप राजगिऱ्याचे पीठ (Amaranth)
१/२ कप भाजलेलं सुकं खोबरं, १ कप खजूर, १ कप साजूक तूप,
१ कप बदाम, १/२ कप काजूचे तुकडे, १/३ कप खसखस, केशर

**कृती- १) पीठ भाजणे** - राजगिऱ्याचे पीठ एका जाड बुडाच्या कढईत किंवा पातेल्यामध्ये चालून मंद आचेवर सातत्याने हलवत भाजा.
नंतर त्यामध्ये साजूक तूप घाला. आणि परत पीठ खरपूस होईपर्यंत भाजा. पीठाचा रंग बदलतो आणि खमंग वास येऊ लागतो आणि मऊसर होते – तेव्हा ते भाजून तयार झाले असे समजा.

**२) केशर -** एका काचेच्या वाटीमध्ये केशर घेऊन ते microwave मध्ये १० सेकंद गरम करा. एका मिनिटाने ते बोटांनी चुरून भाजलेल्या पिठात घाला.

**३) बदाम, काजू, खसखस, सुक खोबरं -** एका दुसऱ्या भांड्यात तूप घालून त्यात बदाम, काजू आणि खसखस वेगवेगळी परतून घ्या. त्याचप्रमाणे सुकं खोबरंही भाजा.

४) मिक्सरमध्ये बदामाची पूड करून घ्या. तसेच बिया काढलेले खजूरही बारीक करून घ्या.

५) भाजलेल्या पिठामध्ये भाजलेलं सुक खोबरं, बदाम पूड, काजूचे तुकडे, खजूर, खसखस घालून एकत्र करा. सर्व मिश्रण नीट हलवा. गॅस बंद करा.

६) हाताला थोडं तूप लावून मिश्रण थोडं गरम असतानाच लाडू वळायला सुरुवात करा. लाडू वळताना एक बेदाणा लावावा. छान दिसतं !

**टीप-** १) पीठ चाळून घ्यावे म्हणजे गुठळ्या होत नाहीत.
२) आधी नुसतेच तूप न घालता पीठ भाजले तर तूप घातल्यावर भाजायचे श्रम कमी होतात.
३) लाडू वळताना मिश्रण फार गरम नको, पण थंडही होऊ देऊ नका
४) केशर गरम केल्यामुळे त्याचा रंग आणि वास छान सुटतो.



**फायदे-** राजगिरा हा ग्लूटेन-फ्री असून प्रथिनांचा(protein) उत्तम स्रोत आहे लाडवांमध्ये खजूर वापरल्यामुळे नैसर्गिक गोडवा मिळतो – साखर टाळता येते.

- **संध्या विरगी,** गाइथेर्सबर्ग , मेरीलँड

## बाप्पा मला सांगा नां!

नवसाला पावणाऱ्या बाप्पा ऐकून जरा माझं घ्या
उत्तरं माझ्या प्रश्नांची खरी आणि लवकर द्या
नवस बोलायला तुमच्याकडे लोक येतात लांबून
नवस बोलतात तुम्हाला तासन् तास थांबून
अकरा दिवसात लाखभर तरी नवस बोलले जात असतील
मला वाटतं सगळेच काही लक्षात तुमच्या रहात नसतील
काय सांगता? सगळे नवस लक्षात तुमच्या रहातातच
भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण केल्या जातातच?
काय हवंय कोणाला, त्याच्या बदल्यात तो देणार काय
नोंद त्याची कशी ठेवता मला जरा सांगाल काय?
कोणते निकष लावता तुम्ही एखाद्याला पावायला
लावता कां हो कोणाला अनवाणी धावायला?
नवस बोलला एक आणि फळ मिळालं भलतंच काही
खरं सांगा बाप्पा असं कधीतरी होतं की नाही?
असंही होत नाही म्हणता? खरंच तुम्ही आहात ग्रेट
द्याल कां हो अपॉइंटमेंट घेण्यासाठी तुमची भेट?
नवसाला तुम्ही पावलात पण बोलणाऱ्याने फेडला नाही
अशा एखाद्या भक्ताला देता कां हो शिक्षा काही?
माफ करा बाप्पा मला तुम्हाला थोडा त्रास देतोय
मलाही नवस बोलायचाय म्हणूनच सारं जाणून घेतोय

- **डॉ. सतीश कानविंदे,** ठाणे, महाराष्ट्र




Assisted Living
in Pune, India
LED BY U.S.-TRAINED EXPERT
Ms. Niharika Nagrani
Mount Sinai Hospital, NY
Cornell University, NY
AVANA
SENIOR CARE
+91 9090 0707 82
avanaseniorcare.com


श्री. नितीन व सौ. मानसी जोशी
यांच्यातर्फे
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

## मराठी अस्तित्व

भूमीवरी अमेरीकेच्या | पाऊल मराठी रोवले ||
परी न तुटले बंध | मातृभूमीशी ||
ऐकतो बोलतो जरी | इंग्रजी मी निरंतर ||
तरी नाही अंतर | मायबोलीशी ||
देशविदेशी अताशा | फिरतो मी सदया ||
उरी गोव्यातला गाव | चिरंतन ||
उदरभरण करीतो | नित्य नव्या ठिकाणी ||
राखिला मी ईमान | भाजी- भाकरीशी ||
देऊळ नाही सामोरी | ना घंटा निनादे ||
मंगेशाचे लेणे मनातल्या | गाभाऱ्याशी ||
शैल म्हणे मनी | राहो मराठीचा वास ||
ओठी अमृताहुनी गोड | मायमराठी ||

- **शैलेश पोतदार,** कॉपेल, टेक्सस

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## शब्दकोडे - उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ का | | २ बा | ळा | ३ जी | | ४ वि | जा | ५ पु | र | | ६ श्री |
| ७ शि | वा | जी | | ८ वा | ९ सो | टा | | णे | | १० श | |
| द | | ११ रा | ऊ | | नो | | १२ सी | | १३ श | हा | णे |
| | १४ रा | व | | १५ श्री | | १६ प्र | ता | प | | जी | |
| १७ जि | जा | | १८ म | | १९ तु | का | | | २० क | | २१ स |
| | २२ रा | म | दा | स | | २३ श | २४ क | | २५ स | २६ वा | ई |
| २७ रा | म | | री | | २८ मा | | २९ ल | क्ष्मी | बा | ई | |
| म | | ३० रा | | ३१ खा | न | ३२ दे | श | | पे | | ३३ घु |
| ३४ शा | ह | ज | हा | न | | श | | ३५ आ | ठ | ३६ व | ले |
| स्त्री | | ग | | | ३७ य | मु | ना | | | न | |
| | ३८ कों | ड | ३९ दे | व | | ख | | ४० रा | य | ग | ड |
| ४१ बं | डा | | व | | ४२ मे | | ४३ शा | म | | ड | |

## मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी मदतीची हाक

नमस्कार मंडळी,

गेले काही दिवस तुम्ही महाराष्ट्रातील बातम्या वाचत असालच. मराठवाड्यात भीषण पूर परिस्थिती आहे. जीवित आणि वित्तहानी झाली आहे. **बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे महाराष्ट्राच्या 'मुख्यमंत्री सहायता निधी'ला आम्ही १ लाख रुपयांची देणगी अर्पण करत आहोत.**

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या “समाजरंग” या उपक्रमामार्फत आपण या आपल्या बांधवांच्या पाठीशी उभे राहू शकतो.

मी सर्व मंडळाच्या अध्यक्षांना आवाहन करीत आहे की त्यांनी आपापल्या मंडळात "मराठवाडा पूरग्रस्त मदत निधी संकलन" (Marathawada Flood Relief Fundraiser) जाहीर करावे.

गेल्या काही दिवसांत मी 'ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन', 'महाराष्ट्र फाउंडेशन', ‘सेवा इंटरनॅशनल” तसेच 'सेव्ह इंडियन फार्मर्स' या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. या सर्व संस्थांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाला सहकार्य करण्याची तयारी दाखवली आहे. सध्या या संस्थांतर्फे मराठवाड्यातील पूरग्रस्त गावांमध्ये मदतकार्य सुरू आहे.

मी प्रशांत दामले यांना पण विनंती केली आहे की जेव्हा ते नाटक दौऱ्यावर येतील तेव्हा दौऱ्यातील मंडळात त्यांनी याविषयी दोन शब्द बोलून मदतीचे आवाहन करावे. त्याचप्रमाणे जर काही मंडळांनी पुढाकार घेऊन त्यांना या नाटकात मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही हिस्सा जर निधी संकलनाला दिला तर उत्तमच होईल. ‘फुल ना फुलाची पाकळी’ म्हणून केलेली आपली मदत खूपच परिणामकारक असेल.

मराठी अमेरिकन समुदायाने शक्य तो परीने आपल्या संकटग्रस्त बांधवांना मदत करावी ही नम्र विनंती.

अधिक माहितीसाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या “समाजरंग” संकेतस्थळाला भेट द्या:
https://bmmonline.org/samajrang/

आपला,

**प्रसाद पानवळकर,**
अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

## नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांची भेट

माझ्या आयुष्यात एक मोठी संधी चालून आली, मला नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांच्या लिंडाऊ परिषदेला, जर्मनी येथील लिंडाऊ शहरात, जून २०२४ मध्ये उपस्थित राहण्याचे आमंत्रण मिळाले आणि त्यामुळे मला अतिशय आनंद व उत्साह वाटलाच पण महत्वाचे म्हणजे तो माझा मोठा सन्मानही वाटला. १९५१ पासून, लिंडाऊ मध्ये नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांच्या परिषदांद्वारे वेगवेगळ्या पिढ्यांमधील, शास्त्रशाखांमधील आणि संस्कृतींमधील वैज्ञानिक संवादास प्रोत्साहन दिले जाते.

'लिंडाऊ नोबेल परिषद' या सभा अतिशय भव्य असतात. दर वर्षी एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील नोबेल विजेत्यांना या परिषदेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाते. आयोजक संपूर्ण जगातून निवडक पोस्टडॉक्टोरल फेलो, विद्यार्थी, नवथर शास्त्रज्ञ सआणि अशाच विशेष पाहुण्यांची निवड करतात. या चर्चांमध्ये जे घडते ते प्रेरणादायक आणि मनाला भिडणारे असते. संपूर्ण आठवडाभर या तरुण शास्त्रज्ञांना त्यांच्या क्षेत्रातील नोबेल विजेत्यांसोबत वेळ घालवता येतो.

या परिषदेत नामवंत शास्त्रज्ञांचे व्याख्यान असते, तसेच काही नियोजित कार्यक्रम असतात जिथे नोबेल विजेत्यांना युवक शास्त्रज्ञांशी संवाद साधता येतो — जसे की एकत्र जेवण किंवा निसर्गभ्रमण. विद्यार्थी खूप शिकण्यास उत्सुक असतात आणि यातून तारा जुळल्यास गुरू-शिष्य नातेसंबंध सुद्धा प्रस्थापित होतात.

एक रसायनशास्त्रज्ञ म्हणून मी आधीच अनेक नोबेल विजेते रसायनशास्त्रज्ञाना भेटलो होतो, म्हणून मी यावेळी भौतिकशास्त्रातील परिषदेसाठी उपस्थित राहण्याचे ठरवले.

लिंडाऊ हे लेक कॉन्स्टन्सच्या किनाऱ्यावरचे एक सुंदर बेट आहे, जिथे ऑस्ट्रिया, जर्मनी आणि स्वित्झर्लंड या तीन देशांच्या सीमा एकत्र येतात. येथेच दरवर्षी परिषद भरते, म्हणूनच याला लिंडाओ परिषद म्हणून जगात ओळखले जाते. उद्घाटन समारंभात जर्मनी, स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रियाचे शिक्षण मंत्री सहभागी झाले होते. त्यांच्या मागे नोबेल विजेते आणि त्यांच्यामागे आपल्या संशोधनाचे सादरीकरण करणारे निवडक विद्यार्थी होते. सांस्कृतिक कार्यक्रम टेक्सास A&M विद्यापीठ आणि बवेरिया राज्याच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. एक सुंदर नौका प्रवास आणि 'मेनाऊ' बेटावर एक दिवसाची सहल आयोजित केली होती. यावेळी ३० हून अधिक भौतिक शास्त्राचे नोबेल विजेते सहभागी झाले आणि त्यांनी 'मेनाऊ डिक्लरेशन २०२४ ऑन न्यूक्लियर वेपन्स' या ऐतिहासिक घोषणापत्रावर स्वाक्षरी केली.

या परिषदेत सहभागी होण्याचा अनुभव अविस्मरणीय होता. प्रत्येक महान शास्त्रज्ञाच्या सभागृहात प्रवेश करता वेळी अंगावर रोमांच उभे राहावे असा अनुभव येत होता. त्यांच्या कामाचे आपण अनुकरण केलेले असते, त्यांच्या संशोधनावर आधारित उपकरणे आपण वापरलेली असतात – हे प्रत्यक्ष अनुभवणे म्हणजे श्वास रोखून टाकणारी घटना होती.

**ब्रायन जोसेफसन** यांचे उदाहरण घ्या. त्यांनी केवळ २३ व्या वर्षी ट्रिनिटी कॉलेज, केंब्रिज येथून भौतिकशास्त्रात पीएच.डी. मिळवली. त्यांनी प्रस्तावित केलेली संकल्पना — जोसेफसन प्रभाव — सुपरकंडक्टिव्हिटी, क्वांटम टनेलिंग आणि जोसेफसन जंक्शनच्या शोधात महत्त्वाची ठरली. त्यांचं म्हणणं ऐकून काही प्राध्यापकांनी त्यांना म्हटले, "हे काही खास नाही; तुम्ही कदाचित भौतिकशास्त्र सोडाल किंवा नोबेल पारितोषिक जिंकाल." आणि प्रत्यक्षात ते ३३ व्या वर्षी नोबेल विजेते ठरले!



मी **डॉ. डोना स्ट्रिकलंड** यांनाही भेटलो. त्यांच्या लेझरवरील कामासाठी त्या प्रसिद्ध आहेत. त्यांनी युनिव्हर्सिटी ऑफ रोचेस्टर येथे पीएच.डी. करताना फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ गेरार्ड मुरु यांच्यासोबत "चर्प्ड पल्स ॲम्प्लिफिकेशन" तंत्र विकसित केले. यासाठी त्यांना



२०१८ मध्ये भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. हे तंत्र लेसिक डोळ्यांच्या शस्त्रक्रियेचा पाया ठरले.

मी एक्सोप्लॅनेट शोधणारे स्विस खगोलशास्त्रज्ञ **डिडिए क्वेलोज**, तसेच कोस्मिक बॅकग्राउंड एक्स्प्लोरर (COBE) प्रकल्पावर काम करणारे **जॉन मॅथर** यांनाही भेटलो. त्यांच्या कामामुळे बिग बँग सिद्धांत अधिक ठोस सिद्ध झाला.

प्रश्नोत्तराच्या वेळेस एक मजेशीर प्रश्न विचारण्यात आला: "१९५१ पासून आजवर या परिषदेला उपस्थित असलेल्या तरुण शास्त्रज्ञ लोकांपैकी किती जणांनी नंतर नोबेल पारितोषिक मिळवले?" उत्तर होते: फक्त दोन- **मॉर्टन मेलडल** आणि **डॅन शेच्टमन**.

त्यानंतर दुसरा प्रश्न आला, "किती जण या परिषदेसाठी अर्ज करून नाकारले गेले, पण नंतर नोबेल पारितोषिक विजेते झाले?" उत्तर दिले खुद्द नोबेल विजेते **क्लॉस वॉन क्लिट्सिंग** यांनी: “तो मीच आहे!” आणि त्यांनी गमतीने सांगितले की बाकीच्यांनी परीक्षा, मुलाखती अशा मार्गाने प्रवेश मिळवला, पण मी थेट स्टॉकहोमहून आलो!



**ह्या परिषदेला उपस्थित राहिलेले नोबेल विजेते– A ते Z :** अलॅन अस्पेक्ट, जॉर्ज बेडनॉर्ज, एरिक बेट्सिग, स्टीव्हन चू, योहान डाइसनहोफर, राईनहार्ड गेंझेल, वॉल्टर गिल्बर्ट, डेव्हिड ग्रॉस, एफ. डंकन एम. हल्डेन, थियोडोर हान्श, सर्ज हारोश, स्टेफन हेल, रिचर्ड हेंडरसन, गेरार्डस 'टी हॉफ्ट, ब्रायन जोसेफसन, टकाआकी कापिता, क्लॉस वॉन क्लिट्सिंग, जे. मायकेल कोस्टरलिट्झ, ॲन ल’हुलिए, जॉन मॅथर, हार्टमुट मिशेल, डब्ल्यू. ई. मोएर्नर, गेरार्ड मुरु, विल्यम फिलिप्स, डिडिए क्वेलोज, ब्रायन श्मिट, डॅन शेच्टमन, जॉर्ज स्मूट, डोना स्ट्रिकलंड, डेव्हिड विनलँड, कुर्ट वुथरिच, अडा योनाथ आणि अँटन झेलिंगर.

- **मुकुंद चोरघडे**, हिल्सबोरो, न्यू जर्सी
**(सक्रिय ACS सदस्य आणि २०२४ साठी ACS अध्यक्षपदाचे उमेदवार)**

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## पु. ना. गाडगीळ (पीएनजी) ज्वेलर्स - एक सोनेरी परंपरा

पीएनजी ज्वेलर्स हा १९३ वर्षे जुना महाराष्ट्रीयन ब्रँड आहे. कै. गणेश नारायण गाडगीळ यांनी १८३२ मध्ये सांगली येथून पीएनजी ज्वेलर्सची सुरुवात केली. कै. दाजीकाका गाडगीळ यांनी पीएनजी ज्वेलर्सचे प्रमुख दालन ९ फेब्रुवारी १९५८ साली पुण्यात लक्ष्मी रोड येथे सुरू केले. आज डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली जगभरात त्यांची ५८ दुकाने आहेत. २००८ मध्ये डॉ. गाडगीळ यांनी अमेरिकेत त्यांच्या पहिल्या दुकानाचे उद्घाटन केले. पीएनजी ज्वेलर्सने बृहन्महाराष्ट्र मंडळाला नेहमीच पाठिंबा दिला आहे. पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ आणि पीएनजी ज्वेलर्सचे अमेरिकेतील पदाधिकारी श्री. आशुतोष जोशी ह्यांच्याशी साधलेला हा संवाद २ भागांत आपल्यापुढे सादर करीत आहोत. पहिल्या भागात डॉ. सौरभ गाडगीळ यांची पार्श्वभूमी, त्यांचा पीएनजी ज्वेलर्ससोबतचा प्रवास, अमेरिकेतील दुकानांची मुहूर्तमेढ आणि भविष्यातील योजना यांचा आढावा घेण्यात आला आहे, तर दुसऱ्या भागात पीएनजी ज्वेलर्सचे अमेरिकेतील पदाधिकारी श्री. आशुतोष जोशी यांच्याशी एक दिलखुलास मुलाखत.

### भाग १: डॉ. सौरभ गाडगीळ

**पार्श्वभूमी: शिक्षण,परिवार, छंद:** पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ, यांचा शैक्षणिक प्रवास पुण्यातील कॅम्प परिसरातील सेंट व्हिन्सेंट स्कूलपासून सुरू झाला. पुढे त्यांनी बीएमसीसी कॉलेज, पुणे येथे पदवीचे शिक्षण डिस्टिंक्शनसह पूर्ण केले आणि सिम्बायोसिस, पुणे मधून परदेशी



व्यापारातील विशेष एमबीए पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) मध्ये इंटर्नशिपही केली तर कौटुंबिक व्यवसायाविषयी अधिक माहिती मिळविण्यासाठी सोन्याच्या बाजाराचा बारकाईने अभ्यास केला.

डॉ. सौरभ गाडगीळ यांचा २००० साली राधिका गाडगीळ यांच्याशी विवाह झाला. त्यांना दोन मुले आहेत.

शैक्षणिक आणि व्यावसायिक कामगिरीव्यतिरिक्त डॉ. सौरभ गाडगीळ हे बुद्धिबळ खेळातही तबरेज आहेत, त्यांनी अनेक राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभाग देखील घेतला होता.

**पीएनजी ज्वेलर्स बरोबर व्यावसायिक सुरुवात:** १९९९ साली, एमबीएच्या पहिल्या वर्षात शिकत असतानाच डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या आयुष्यात एक अनपेक्षित वळण आले. 'पीएनजी ज्वेलर्स'मध्ये निर्यात मालाशी संबंधित एक गुंतागुंतीचा प्रश्न उभा राहिला होता. परिस्थिती गंभीर होती, परंतु त्यावेळी मध्यस्थी करण्याची आणि तो प्रश्न सोडवण्याची संधी तरुण सौरभ गाडगीळ यांना मिळाली. त्यांनी समस्येवर केलेल्या कौशल्यपूर्ण तोडग्याने केवळ ती अडचण दूर झाली नाही, तर त्यांच्या व्यावसायिक प्रवासाला नवी दिशा मिळाली. पुढे एमबीए पूर्ण झाल्यावर ते पूर्णपणे कौटुंबिक व्यवसायात सामील झाले.

पुण्यात सुरू झालेल्या एक स्टोरची संख्या डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली आज ५८ आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये कौटुंबिक व्यवसायाचे कॉर्पोरेट संस्थेत रूपांतर करून (after IPO launch) भविष्याच्या दृष्टीने विस्तार करायला सुरुवात केली.

२००८ मध्ये, डॉ. गाडगीळ यांनी यूएसएमध्ये पीएनजी ज्वेलर्सच्या पहिल्या स्टोअरचे उद्घाटन केले.

**पीएनजी ज्वेलर्सच्या अमेरिकेतील विस्ताराची पायाभरणी:** भारतीय वंशाचे ग्राहक सोन्याबद्दल भावनिक असतात, त्यांच्यासाठी दागिना म्हणजे केवळ अलंकार नाही, तर परंपरेचा, आठवणींचा आणि गुंतवणुकीचा भाग आहे. अमेरिकेत, भारतीय लोक मोठ्या संख्येने राहतात. भारतीय, दक्षिण आशियाई, पारंपारिक दागिन्यांसाठी अमेरिका मोठी बाजारपेठ असली तरी लग्नसमारंभ, सण-उत्सव, कार्यक्रमांमध्ये पारंपारिक दागिने लोकांना थेट स्टोर मधून विकत घेता येत नव्हते. त्यामुळे भारताबाहेर विस्तार करण्याची योग्य संधी लक्षात घेऊन लोकांना/ग्राहकांना ऑनलाइन पेक्षा प्रत्यक्ष दालनात भेट पारंपारिक भारतीय दागिने खरेदी करण्याचा अनुभव देऊ या कल्पनेने पीएनजी ज्वेलर्सने अमेरिकेत सनीव्हेल कॅलिफोर्निया येथे आपले दालन सुरू केले आणि परदेशात आपल्या विस्तारासोबत विश्वासाचा पाया रोवला.

बाजारपेठेचा विचार केला तर भारतातील बाजारपेठ आणि अमेरिकन बाजारपेठ यात फरक आहे. तेथील कायदे, नियम, कर प्रणाली वेगळी आहे. अमेरिकेत अनेक ज्वेलर्स असले तरी भारतीय परंपरेचे दागिने मिळणे कठीण होते. त्यामुळे तेथील लोकांना आपली संस्कृती, परंपरा आत्मसात करता येईल तसेच यातून ब्रँडबद्दल परदेशात विश्वासार्हता निर्माण होईल या विचाराने अमेरिकेत दालन सुरू करण्याची कल्पना आली.

**मार्केट स्टडी:** अमेरिकेत स्टोअर उघडण्यापूर्वी सखोल मार्केट स्टडी करण्यात आली होती. या अभ्यासामुळे स्टोअर सुरू करण्यापूर्वी अनेक गोष्टी समजल्या आणि योग्य धोरण आखण्यास मदत झाली.

या अभ्यासातून अमेरिकन बाजारपेठेचे कायदे, नियम आणि कार्यपद्धती यांची माहिती मिळाली, ज्यामुळे भारतीय आणि अमेरिकन बाजारपेठेतील फरक स्पष्ट झाला. त्यामुळे भविष्यात येणाऱ्या अडचणींवर मात करणे सोपे झाले.

तसेच भारतीय ग्राहकांना केवळ ऑनलाइन नव्हे, तर प्रत्यक्ष स्टोअरमध्ये येऊन दागिने खरेदी करण्याचा अनुभवही घेता येईल. या दृष्टिकोनातून बाजारपेठेचा अभ्यास करण्यात आला.

**दुकानांसाठी जागेची यथोचित निवड:** अमेरिकेत कॅलिफोर्निया, न्यू जर्सी, टेक्सास या भागात भारतीय नागरिक अधिक प्रमाणात राहतात. या ठिकाणी मोठ्या संख्येने लोक एकत्र येऊन आपले सण, कार्यक्रम, समारंभ साजरे करतात. आधी सांगितल्याप्रमाणे, भारतीय नागरिक हा दागिनांच्या बाबतीत भावनिक असतोच परंतु महाराष्ट्राचा विश्वासार्ह ब्रँड म्हणून असलेली पीएनजी ज्वेलर्सची ओळख येथे दालन सुरू करण्यात पुरेशी ठरली. त्याच बरोबर अमेरिकन बाजारपेठेचा अभ्यास करून योग्य माहितीच्या आधारे योग्य स्थान निवडणे सोपे झाले.

**सुरुवातीचे अडथळे (कायदे, आयात-निर्यात, सुरक्षितता) आणि मदतीचा हात:** अमेरिकेत कायदे, परवाने आणि नियम भारतापेक्षा वेगळे आहेत. भारतातून अमेरिकेत निर्यात करताना कस्टम्स, ड्युटी आणि सुरक्षित ट्रान्सपोर्ट याचा विचार करावा लागतो. यावेळी पीएनजी ज्वेलर्सच्या टीमने योग्य संशोधन करून, नियमनाचा योग्य अभ्यास केला ज्यामुळे अमेरिकेत पीएनजी ज्वेलर्सचे दालन सुरू करताना आलेले अडथळे पार पाडण्यास मदत झाली.

**भविष्यातील योजना:** विस्ताराच्या योजनेबाबत डॉ. सौरभ गाडगीळ म्हणतात, "पीएनजी ज्वेलर्सचे पहिले उद्दिष्ट म्हणजे FY26 पर्यंत २५ नवीन स्टोअर्स उघडण्याचे असून यासाठी ४००–५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची योजना आहे. तसेच मार्च २०२८ पर्यंत एकूण १५० स्टोअर्स सुरू करण्याचे लक्ष्य आहे, जे स्वतःच्या मालकीचे आणि फ्रँचायझी अशा दोन्ही प्रकारांमध्ये असतील.

आपल्या परंपरेशी सुसंगत राहून, पीएनजी ज्वेलर्स भारतात पेशवा मार्गाचा अवलंब करत ऐतिहासिक नातं जपणाऱ्या प्रदेशांमध्ये आपले आधुनिक व पारंपरिक दागिने घेऊन विस्तार करत आहे. भविष्यात अमेरिकेतही विस्तार करायची योजना आहे.

ग्राहकांना योग्य दरात दागिने खरेदीचा अनुभव देणे तसेच आधुनिकतेसह आपली परंपरा जपत ब्रँडवर असलेला ग्राहकांचा विश्वास टिकवून ठेवणे हे पीएनजी ज्वेलर्सचे मुख्य उद्दिष्ट राहील.

भविष्यातल्या योजनांसाठी वृत्ताच्या टीमतर्फे पीएनजी ज्वेलर्सला अनेकोत्तम शुभेच्छा!

- **अनिता म. कांत व शुभदा सावरगांवकर (वृत्त-टीम)**

## शब्दफोड




**को**णत्याही भाषेत अशी रचना करणे शक्य आहे का, की जीतील शब्दांची फोड केल्यास नवोन अर्थपूर्ण ओळ निर्माण होऊ शकेल? मराठी भाषेत हा प्रयोग गंमतीचा व सहजसाध्य असावा या अंदाजाने हा खटाटोप! मला काही रचना साध्य झाल्या आहेत, त्या विविध चालींमधे चित्रांसह पेश करीत आहे. दिलेल्या चालीत रचना वाचल्यास त्यांना न्याय मिळेल असे वाटते.

*'शब्द फोडुनी आज वाजवा, अपुली अपुली पुंगी*
*ग-मति नसोनी गंमति असावा, बहुभाषाव्यासंगी'*

अरविंद नारळे, टोरांटो, कॅनडा

१ *मंदारमाला*



- ***'दीपावलीला, फराळास द्या आज, 'मंदारमाला-मसाला'च हा'***
  आज दिवाळी! फराळाला' मंदारमाला'नामक मसालाच द्या
- ***'दीपा' व 'लीला', फराळास द्या आज, 'मंदा, रमाला' मसाला-चहा***
  'दीपा' व 'लीला', आज 'मंदा' व 'रमा'ला फराळाला मसाला-चहा द्या

२ *वसंततिलका*



- ***'शिष्यास आज गुरुचा पटला विचार'***
  शिष्याला आज गुरूचा विचार मान्य झाला
- ***'शिष्यास आज गुरु चापट लावि चार'***
  शिष्याला आज गुरु चार चापटा लावतो

३ *मालिनी*




- ***'फल-कवच न येई, फार कामी जगाला'***
  फळाचे कवच जगाला विशेष उपयोगाचे नाही
- ***'फलक-वचन येई, फार कामी जगाला'***
  फळ्यावरील शब्द जगाला फार उपयोगी पडतात

४ *पंचचामर*



- ***'कुटीत गौ रमाकडे नि पोळ पाटलाकडे'***
  'रमा'च्या झोपडीत गाय अन पाटलाकडे बैल
- ***'कुटीत गौर माकडे नि पोळपाट, लाकडे'***
  झोपडीत गोरे वानर, पोळपाट व लाकडे!

५ *शिखरिणी*



- ***'चिनी देशामाजी करि तिल-वड्या जननि का?'***
  चीन देशात, माता तिळाच्या वड्या करते का?
- ***'चिनी दे शामाजी! करितिल वड्या जन निका'***
  अरे शामाजी! साखर दे. योग्य माणसे वड्या करतील

## शब्दफोड

६ *पृथ्वी*



- ***'न वाघ, नरकेसरी – करि शहामृगाचा वध'***
  वाघ किंवा सिंह शहामृगाचा वध करत नाही
- ***'न वाघ, नर, केसरी! करि शहा, मृगाचा वध'***
  वाघ, मनुष्य व सिंह नव्हे! 'राजा' हरिणाचा वध करतो

७ *शार्दूलविक्रीडित*



- ***'बालांना नच हासवे! विदुषका देऊ नका ही भजी'***
  (जो) मुलांना हसवीत नाही, त्या विदुषकाला ही भजी देऊ नका
- ***'बाला नान, चहासवे विदुषका दे ऊन काही भजी'***
  मुलांना नान व विदुषकाला चहाबरोबर काही गरम भजी दे

८ *चंद्रकांत*



- ***गजगज-शहरी, सान वास रे! जबर महागाई***
  गजबजलेल्या शहरांमध्ये वास्तव्याचे ठिकाण छोटे पण महागाई मात्र भरपूर!
- ***गज, गज शहरी सान-वासरे, जबर-महा गाई!***
  शहरोशहरी हत्ती, छोटी वासरे व दणकट गाई

९ *सूर्यकांत*



- ***नेतां खर-कटिं भांडी, दिसे लठ्ठसा न का मवाली तुला?***
  गाढवाच्या कमरेवर भांडी लादून नेत असलेला, लठ्ठसा गुंड तुला दिसला नाही का?
- ***नेतां खरकटि भांडीं, दिसे लठ्ठ, सान कामवाली तुला?***
  उष्टी भांडी नेत असलेली लठ्ठ, लहान मोलकरीण तुला दिसली का?

१० *साकी*



- ***रीस न जर वनिं, गाढवावरी नजर वाघ-सिंहाची***
  अस्वल रानात नसता, गाढवावर वाघ, सिंहाची नजर!
- ***रीस-नजर वनिं गाढवावरी! न जर वाघ-सिंहाची***
  रानातील गाढवावर अस्वलाची नजर नसता, वाघ - सिंहाची नजर

११ *आनंदकंद*



***नादात शब्द फोडा, कविता पहा सुरेख! द्याया अम्हां तुम्हाला कां दादही महाग?***
आवडीने शब्दफोड करा. सुरेख कविता पहा. आम्हाला द्यायला तुमची दादसुध्दा महाग झाली आहे का?
***ना दात? शब्द फोडा! कवि-ताप हा सुरेख. द्याया अम्हां तुम्हाला, कांदा, दही महाग?***
दात नाहीत तर शब्द तरी फोडा. रचनाकृतीने कवीला आलेला ताप सुखद आहे.
त्यावर कांदा व दही हे औषध तुम्हाला महाग वाटते का?

## Youth Section



**'Let Your Light Shine'**
**Artist:** Nikita Marathe
**Age:** 10 years
**Medium:** Acrylic paint on Canvas 11 x 14 in.
**Inspiration:** Photo of her cousin carrying the lamps for Lakshmi Pujan

## Diverging Musical Paths, One Shared Passion

**A reflection of the contrasting musical journeys of Rigved Barve and Shubhankar Kulkarni**



Shubhankar Saleel Kulkarni is a young versatile singer from Pune who recorded his first song when he was just 2 years old. He recorded his film playback at the age of 6 years that won him the National Award in India. He performs classics from English, Hindi and his mother tongue Marathi and Originals in his concert " Tale Of Melodies "

Rigved Barve is a young Hindustani classical musician from Cupertino, Bay area, California.

Rigved has won several awards for his vocal, harmonium, and tabla performances in many competitions and regularly performs in numerous concerts across the USA. They both met and shared their journeys.

It's a crisp autumn morning in California, and the early morning red-golden sunlight filters inside through the living room blinds, as I sit cross-legged on the carpet on the ground. The pluck of the tanpura's kharaj taar drones and the rich tone of the sur tabla resonates throughout my room, setting a peaceful, and meditative early-morning atmosphere as I wrap up my early morning practice before a busy day ahead, full of presentations and lab work at college.

Half a world away, in Pune, India, Shubhankar Kulkarni weaves his way through the bustling streets, on his way to his evening college classes. Earbuds in, he scrolls through his favorite jazz riff loops and guitar tracks. He hums softly under his breath, his voice carrying traces of the semi-classical roots he grew up with, now blending effortlessly with the swing of the background music.

Every musician's journey begins with the sounds they grow up with. For me, as a Hindustani Classical musician, it was the sound of tanpuras, tablas, harmoniums and eminent classical vocalists of the past and the present, weaving their magic in different raags and taals. While for Shubhankar, it was the popular semi-classical tunes at home, some of which were composed by musicians from his own family. Growing up while being completely surrounded by Indian traditional musical styles in every corner of his home, his personal compass directed him toward the grooves of contemporary world music, particularly styles that are relatively unexplored in India, such as hip-hop and jazz.

My musical journey thus far has been primarily focused on carrying our rich Hindustani Classical musical tradition and heritage across oceans, and spreading the beauty and joy that stem from the oldest form of music. Hindustani Classical music is a form with an endless amount of knowledge, nuances, and intricacies. Hence, growing up, my training encompasses rigorous daily riyaaz sessions, seeking online guidance from

my revered guru from Mumbai, collaborating with fellow classical music enthusiasts in California, and presenting and performing at various baithaks, competitions, and concerts. In California, where the environment is predominantly non-Indian, with each passing day, the communal connection to Indian Music seems to be fading. Therefore, each performance becomes an even more important juncture to showcase its depth and richness and to reinforce the connection with our ancient heritage.

On the other hand, Shubhankar's environment seems drastically different, as he grew up in India, the "fertile crescent" for cultivating the various forms of Hindustani Classical and Semi-Classical Music. However, instead of traversing the traditional path, Shubhankar has chosen to blend his musical background with the inherent energy of contemporary world music. Shubhankar's journey is anchored around carrying it across genres, simultaneously expanding musical horizons of both himself and everyone around him.



Though Shubhankar and I are different in many ways, and are separated by musical backgrounds, musical genres, and not to mention, more than eight thousand miles, we are united by our search for originality and our pursuit for what we truly love. While I strive to represent the propagation of rich Hindustani Classical musical traditions, far from its birthplace, Shubhankar symbolizes the spirit to reimagine the same tradition within new sonic landscapes. However, beyond all of this, our shared love, passion and dedication for music is at the heart of our personal musical journeys. Ultimately, we both cherish music as a powerful way to understand our true personal identity, and connect with the world around us.

- **Rigved Barve,** Cupertino, California

**Aarohi Sangle,**
**Age 8 Years**




## The Land I Love

For as long as I can remember I have always been excited at the thought of going to Bharat. The sights, smells, and sounds have always made me feel close to home. This is the feeling that I hope everybody feels when they go to Bharat as it is such a wonderful, beautiful place.

Through my ten years of living, visiting my family has always been an exciting prospect and I could go on and on and on and on about that topic. However, today I shall focus on my recent visits to Bharat because... well... this is an article about Bharat.

Both my grandparents live in Bharat. My mom's parents live in a house that has been standing for longer than my mother has lived! It is surrounded by a garden that I constantly sweep when I am bored, as there are always new petals and sticks falling from the plants and trees. I love helping my grandmother pick ripe mangoes off the tree with her and help her in the small kitchen as she cooks.

Finally, I can't talk about this house without talking about my dear great grandmother who I called Panji. She passed away last year but sometimes, when I miss her the most, I close my eyes and pretend she is still there waiting for me to visit her.

That house might be a bit creaky, and the wall might be peeling off, but that house is a place I will ALWAYS call home.

In contrast, I do not have any very prominent memories of my paternal grandparents' home. One thing, however, that I will always remember is the tiny garden in front of their home. My grandmother waters the plants every day and there are always cats walking around the community. Although I do not have many strong memories of their home, I will always love every time they visit or call me.

Trips to Bharat always include a special trip to somewhere I have not been before. In Pune (where I live with my Aaji and Aaba when I visit) I went to many places dedicated to or about Shivaji Maharaj, but my favorite one was Shivsrushti. It was a historical theme park that was dedicated to Shivaji Maharaj.

One room had a screen that showed one of Shivaji Maharaj's forts from an aerial view, and when the drone went up and down, the seats also went up and down! There was an entire section that gave you a lot of interesting information about Shivaji Maharaj's forts, along with 3D models that showed how many historical events happened in that time.



One of the shorter trips I took was to Pachgani. When my grandparents and my mother took me there, we saw a lot of interesting sights. We went to the table land, which is made up of five large plateaus—hence the name Pachgani. There I rode a horse named Baadal.

After I studied archeology in school, my grandparents decided to take me somewhere with a lot of history so I could see it for myself. Odisha, as you probably know, is known for its beautiful temples. I saw quite a few during my time there and my favorite one was the Konark Sun Temple because of its beautiful carvings and the fact that it was built and carved out of rock!!!



We also visited the Jagannath temple in Puri. When we got there, we took a few pictures outside, but we were not allowed to take phones inside. The inside of the temple was so crowded that at my height all I could see were people crowding around me. Nevertheless, the temple was still very beautiful with its many paintings that covered the walls.

Now that I am finishing up, let's go back to my title "The Land I Love". Now as I am writing this article, I truly feel proud to be from a country with such a rich history and diverse culture.

Bharat: a beautiful, strong, independent country! Now that's the land I love!

- **Asmi Kulkarni-Zambre, Age: 10 Years**



**Character 'Jinu' from the K-Pop Demon Hunters movie**

**Artist:** **Tejashree Moghe,** 7th Grade
Phoenix Marathi Shala Student

## Help Me, Please

Sometimes, a walk through the forest can truly calm your shaken nerves. But today? It multiplied the anxiety.

A few days ago, it was just a nice family hike. We had begun in the early morning with the buzz of conversations, strolling through the woods behind our backyard. Birds tweeting, sun shining, twigs crunching underfoot.

First, there was a simple rustle that lingered a bit too long—and footsteps that weren't ours.

I then heard some voices which I wanted to investigate, so I told my family I'd be back.

"Okay, but stay safe! We'll wait right here!" said my mom.

I followed a faint path that led to a small clearing. There, I saw an old cottage, overgrown with vines and rotting wood.

It looked like your average run-down cottage, with a lot more stuff than normal.

"Help, please. Please, help me."

The whisper grew louder.

"Help, please. Help! I SAID HELP ME!"

The barrel burst open, revealing a translucent figure with long hair that hid its face. Its limbs shook as it reached toward me.

I pushed the door open as I bolted, panting as I ran for my life. I pushed through the trees and into my parents' arms.

"Whoa, kid, what happened? You were gone for 20 minutes?"

Twenty minutes? I thought. But it felt like ten. Strange.

My family and I trudged back through the forest to our backyard, the grass and crunchy fall leaves crackling beneath our feet. No one knew about the ghost yet.

"So, kid? What did you do when you were gone?" my dad asked.

"Oh, nothing. Just heard some noises and wanted to check it out. Probably a fox."

That wasn't a complete lie.

When I stepped into the foyer, the familiar scent of pine and cooking oil hit me—my parents' trademark smell.

I went upstairs, but flashbacks kept coming. I imagined the ghost girl standing in front of me, staring through the dark hallway. Closing my eyes, I ran my hand along the wall and found the light. When the light came on, I checked. No ghost.

I changed clothes and relaxed on the couch. Just then, my little brother walked in. Without a word, he snatched the remote before I could grab it and ignored me. My parents walked in.

"Me and your father have decided to take you two to the beach!" said Mom.

"Ooh! Thanks, guys!" I said.

"Yay..." Owen muttered.

"Well, I think it's cool you're taking us to the beach," I said.

"Thank you, Zoey," my mom smiled, catching on.

My brother attempted, "Hey—"

"Did we say anything?" my mom and I asked in unison.

"Okay, okay. Both of you said thank you," my dad broke in.

-----

It's been an hour, and my brother's mouth is an SMG.

"Owen, for the last frickin'—"

"Zoey, language," my mom cut in.

"Okay, sorry. Just please stop talking so much about your show, Owen!"

"No can do, princess," he replied smugly.

My face burned with anger. I opened my mouth to reply, but instead… a black cloud wrapped around Owen.

"Hey! What is this?! Help me!"

"Agh!" I jumped back and hit the window. It cracked.

"ZOEY! What have you done to your brother?" my dad shouted.

"I… I don't know!"

He pulled over, the car shuddering to a stop.

"Zoey! Get out of the car—now!"

I winced. Mom dragged Owen out. The cloud was fading, but he looked dizzy.

"Well, I think—" Owen started.

"I don't care what you think, Owen! But you have to stop whining—"

"Well, I'm not the one who put someone in a black cloud!" he shouted back.

"Well—"

"Quiet! Enough from both of you!" my dad snapped. "Now get in the car. We're heading home, and you will be quiet."

Owen and I shuffled into the car.

Later, at home, I walked into the foyer and into the kitchen. Dizziness hit me. I stumbled to the fridge for water. Blink. Blink again. Darkness.

-----

I woke up in a cottage. Dimly lit, floorboards creaking underfoot. A bed, a run-down kitchen, a fireplace, lamps—and a barrel.

Wait… a barrel?!

I whipped my head around. The spirit was there.

"You," I snarled. "What am I doing here? How did you bring me here?"

"Well," she said, settling into a chair, eyes twinkling, "I could ask you the same thing, couldn't I?"

"What? What do you mean? Who are you?"

She raised an eyebrow. "I thought you knew. My name is Zoey. Zoey Comrade."

Zoey Comrade? But that's my name.

"What do you mean you're Zoey Comrade? My name is Zoey Comrade! You can't be me. Unless… are you me, but dead?"

"Finally, it's clicking," she smirked. I stumbled.

"I was asking you to help yourself."

"What?"

"Let me simplify. You're in danger. And I can't protect you—or myself. Not anymore."

"What danger? I'm just a girl."

But then I knew. For years, I'd been seeing unearthly creatures.

"Wait… this is Earth, right?" I asked.

"Well… that depends."

She caught my puzzled look.

"I mean, name-wise, sure. But behavior-wise? Not at all. Humans' lust for power has destroyed Earth. What you're seeing are forces of nature, trying to stop you. They see you as a world-conquering, world-destroying human."

"Wow. Didn't know I was so strong."

"These creatures will stop at nothing to protect Earth. This is their power. So… Zoey Comrade, do you accept this quest? Or would you rather see the Earth burn? The choice is yours."

A grin split across her face.

-----

I woke up again. This time, everyone was gathered around me.

"Zoey, are you okay?" Mom asked.

"Yeah. It's just too hot. I'll be right back, okay?"

"Wait—where are you going?" Dad asked.

"Just a walk in the forest."

I ran to the cabin. On the porch, a girl looked at me and smiled.

I turned toward home. Guess it's time to start saving the world.

**- Arnav Watkar, Age: 11 Years**



खूप मित्र असलेला ससा

जंगलात एका सशाला अनेक मित्र होते. त्याला ह्या गोष्टीचा खूप अभिमान होता. एकदा ससा खुशीत चालत होता. पण अचानक त्याच्या पाठीमागे जंगली कुत्रे लागले. हे बघून, ससा घाबरला आणि धावायला लागला. धावून धावून ससा दमला.

तेवढ्यात, त्याला वाटेत घोडा भेटला. ससा म्हणाला, "घोडेदादा, कृपा करून तु मला तुझ्या पाठीवर घेतोस का?" घोडा त्याला म्हणाला, "तुझ्याकडे भरपूर मित्र आहेत. ईतर मित्रांकडून मदत माग." हे ऐकून सशाला खुप वाईट वाटले. नंतर ससा परत धावायला लागला.

आत्ता वाटेत त्याला बैल दिसला. सशाने बैलाला तशीच विनंती केली, पण बैल म्हणाला, "एरवी मी तुझी मदत केली असती पण आत्ता मी महत्वाच्या कामासाठी निघालो आहे. त्यामुळे मी तुला मदत करू शकत नाही."

तशीच विनंती पुढे भेटलेल्या एका हरणाला करताच तो म्हणाला, "ससोबा, आत्ता माझी खायची वेळ झाली आहे. मला खायला काहीतरी शोधायचं आहे. म्हणुन अत्ता मी तुझी मदत करू शकणार नाही." ससा आता खूपच दुःखी झाला.

अचानक, त्याला रस्त्यात उंदीरमामा दिसला. सशाने तीच विनंती उंदराला केली. उंदीर म्हणाला, "हो मी तुझी मदत नक्की करेन." असे म्हणून सशाला त्याच्या छोट्या बिळात घेऊन गेला, आणि सशाचे प्राण कुत्र्यांपासून वाचवीले.

तात्पर्य: खूप मित्र असण्यापेक्षा एक सच्चा मित्र असलेला बरा.

- अर्णव देवकुळे, वय - १४ वर्षे



Family Tree
**Radha Marathe** Age: 9 Years

## Discovering My World!!

It all started out the summer of 2023 with a basketball camp. I discovered that I like playing basketball and should work on making my skills better so I could try out for my school team in the fall. I was determined to make that dream become a reality. So, what did I do, you ask? Well, I practiced any occasion I was able to go to the basketball court and practiced everything from my form to the focus on the hoop. To excel more, I was admitted into a basketball camp where we would practice every day for 4 hours. I was POSITIVE I would make the 6th grade basketball team as results of the work I put in. Then came the tryouts the first week of middle school. The wait was over. It was my time to shine.

The tryouts were good and so I was ready for the results that were going to come in the next day morning. The excitement built up in me, but there was a bit of panic. What if I hadn't made it? Well, I ignored the last thought. The next morning, I sprinted downstairs from my bed and asked my mom to drive to our school gym doors, where the rosters of the team members would be posted. On our way there, I was so hopeful I would make it that I didn't think of the other result that was lingering in the air. The second we got there; I practically jumped out of the car and ran to the rosters. I scanned my name for the 6th grade team. Nothing. But the hopes were still there, what if I had made the JV team? I scanned the JV roster. NOTHING. I scanned both again thinking I must have skipped over my name. But my name was nowhere to be seen. My hopes were crushed as if they were run over by ten buses stacked on top of each other.

But in a few days I got over my disappointment and life continued as usual. All my new middle school classes were going well. When I

was leaving my band class, something caught my attention. It was a form to join the Color guard. I grabbed it hurriedly and stuffed it in my backpack. “Color guard is the visual component of a marching band, using dance and equipment like flags, rifles, and sabers to enhance the overall performance. It adds a visual spectacle to the band’s music through synchronized movements and creative routines,” the form said. Honestly, I was so focused on basketball that I had completely ignored my other options. So, I made my decision. I was going to give it a shot.

My first practices were filled with a lot to learning and fun bonding days with the team. We were preparing for our fall show called Spooktacular, which is a Halloween themed performance that both the colorguard and the drumline do. October 26, 2023, my first EVER colorguard performance on the song “Thriller” by Micheal Jackson. Spooktacular was a fun experience, so I decided to try out for the winter season. What did I have to lose? I wasn’t even thinking about making it or not. I just wanted to try it out.

The week of colorguard tryouts had begun. Learn audition pieces on flags and dance right after school till it got pitch black outside. I was exhausted. I wondered if I would be able to handle it with my studying, homework, and tons of other extracurriculars.

After the last day of auditions, the results would be in the next morning, posted outside the band room. The next morning, I went to my locker, next to my friend's locker. I was too scared to check so I thought I would check it after my last period. But then out of curiosity I asked my friend, Lily, if I had made it. I was shocked to hear the results. Surprise, surprise! I had made it. I was beaming with joy the whole week, so proud of what I had accomplished.

After a few weeks, winterguard season had begun. Our coaches revealed our show theme called “I Wish” which visually represented the story of Pinocchio and the blue fairy turning him into a real boy. The following practices were stressful and completely draining. I had to manage my academics with it too. I often wondered if I had made the right decision. But when I stepped into my gorgeous blue fairy costume the night of my first championships, I knew I had chosen the right thing.

The next year, I had to try out again after the fall season. This time the theme was women’s right to vote. It was named “Read All About It”. But this season felt different. I started spinning a new piece of equipment called the riffle. As a female team, this show theme meant a lot to our team. We poured our souls in practices leading up to competitions and the grand finale: championships.

My team got our show set up on the floor of Western Kentucky University ready to swoop the audience in emotions with our beautiful talents. CHAMPIONSHIPS WERE A BLAST! We had so much fun and bonding time. But after the award ceremony, it was time to say goodbye to our whole team. It was really emotional to say our last goodbyes. It involved tsunamis of tears, but also the nostalgia and happiness of our hard work we put in our show. Our team had made bonds that could not be broken even when disasters were separating us.

Now every time I need motivation to keep going throughout practices, and in general life, I think of the time of my winter guard seasons. All the love and bonding that had happened between us team members. Fate had other plans for me when I didn’t make the basketball team. I am glad I failed then because I would have never met the love of my life. My bonds. My people. My world. Color guard.

**- Riya Ner, Spring Hill Tennessee Age:13**

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



**Artist: Amita Rajadhyaksha**
Dimensions:40″x60″
Medium: Acrylic
Price:Not for Sale
Mandal: MMLA



***Monarch***
**Artist: Alka Vaidya**
Dimensions:13″x17″
Medium: Watercolor
Price:$250
Mandal: MMBA



***Resting Buddha***
**Artist: Prerana Kulkarni**
Dimensions:12″x16″
Medium: Watercolor on wood panel
Price:$625
Mandal: MMLA



**Artist: Chitra Juvekar Mehendale**
Dimensions: 8″x8″
Medium:Water color
Price:Not for Sale
Mandal: Seattle Maharashtra Mandal



***Beauty of Kyoto***
**Artist: Mangala Tata**
Dimensions:16″x20″
Medium: Water colour
Price:$300
Mandal:MMLA



***Sketch***
**Artist: Aparna Deshpande**
Dimensions:9″ x 12″
Medium: Graphite on paper
Price:$175
Mandal: Marathi Vishwa NJ

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.

बृहन्महाराष्ट्र मंडळ

# दीपावली २०२५

## बृहन महाराष्ट्र मंडळ - उत्तर अमेरिका समिति २०२४-२६



प्रसाद पानवळकर
अध्यक्ष



नरेंद्र कल्याणकर
सचिव



संतोष साळवी
खजिनदार

### कार्यकारी समिती सदस्य



राहुल देशमुख



आनंद चौथाई



मेधा गोडबोले



गौरव पटवर्धन



पुरु ठाकरे

### बृहन्महाराष्ट्र मंडळ विश्वस्त



नितीन जोशी



मंजुषा नाईक



सुनील सूर्यवंशी




VISIT: 791 E EL CAMINO REAL, SUNNYVALE, CA 94087. CALL: 408 245 6764
WWW.PNGJEWELERS.COM